# प्रकरण 3

# उत्तर चालुक्यकालीन धार्मिक परिस्थिती

उत्तर चालुक्यकालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती पाहिल्यानंतर आपण तात्कालीन धार्मिक परिस्थितीबद्धलची माहिती जाणुन घेवु. भारतीय समाजावर प्राचीन काळापासून धर्माचा प्रभाव पडलेला आहे. भारताला धार्मिकतेचा प्राचीन वारसा प्राप्त झाल्यामुळे व विविध कालखंडात विविध धार्मिक विचार प्रवाह निर्माण झालेले असल्याकारणाने धर्म भारतीय समाजात खोलवर रूजलेला आहे. आधुनिक भारतीय समाजही धर्मावर निष्ठा ठेवणारा आहे. आपल्या संशोधन कालखंडात म्हणजे पूर्वमध्ययुगातील धार्मिक परिस्थितीचा विचार केला तर या कालखंडात अतिशय गुंतागुंतीची धार्मिक परिस्थिती दिसून येते. प्राचीन वैदिक धर्माचा पुढे ऱ्हास होवून इ.स.पूर्व 6 व्या शतकात जैन, बौंद्धासारख्या नास्तिकवादी धर्माचा उगम झाला. पुढे इ.स.च्या पहिल्या शतकापासून ते पाचव्या शतकापर्यंत या धर्माला ओहोटी लागण्यास सुरूवात झाली. हिंदू धर्माच्या पुनःर्जिवनाची सुरूवात झाली. इ.स.च्या 5 व्या शतकापासून ते 10 व्या शतकापर्यंत अनेक धार्मिक विचार प्रवाह भारतीय समाजात निर्माण झाले. या विचार प्रवाहांमध्ये सामंजस्याशिवाय संघर्षजन्य परिस्थितीही निर्माण झालेली दिसते. भारतीय समाज अशा विचार प्रवाहांनी युक्त असणाऱ्या विविध पंथसंप्रदायात विभागला गेला. उत्तर चालुक्यकालीन अशी धार्मिक स्थिती पाहण्याअगोदर आपण धर्म व संप्रदाय या संकल्पना जाणुन घेवु.

## धर्माची व्याख्या

धर्म हा मानवी समाजाइतकाच प्राचीन आहे. धर्म हा घटक वेळोवेळी विचारवंताच्या अभ्यासाचा विषय झाला आहे. काही पाश्चात्य व काही पौर्वात्य विचारवंतांची नावे उदाहरणादाखल या संदर्भात सांगता येतील. टायलर, फ्रेझर, मॅक्समुलर, स्पेन्सर, कांट, डरकाईम, वेबर इत्यादी पाश्चात्य विचारवंतानी धर्म–विचार केल्याचे आढळून येते. तर

भारतात जैमिनी, कणाद, व्यास, विवेकांनद, लोकमान्य टिळक, डॉ.राधाकृष्णन, डॉ.काणे, डॉ.दप्तरी व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादींनी धर्ममीमांसा केली आहे.

## धर्म शब्दाचा अर्थ

शब्दाच्या व्युत्पत्तीला धरून असलेल्या अर्थाच्या साहाय्याने धर्माची व्याख्या करण्याचा सिसेरोचा प्रयत्न प्राचीनतम होय. त्याने मानलेल्या व्युत्पत्तीचा जोर धर्म म्हणजे देवतांची पूजा या निष्कर्षाकडे घेऊन जाणारा दिसतो. 'धर्म' या भारतीय शब्दाचा इंग्रजी भाषेतील समानअर्थी शब्द म्हणून 'रिलीजन' या शब्दाकडे पाहिले जाते. 'रिलीजन' या शब्दाचे दोन भाग सिसेरो करतो. 'री' आणि 'लेगेर' म्हणजे स्वीकारणे, विचार करणे, चिंतन करणे म्हणजेच देवांविषयी काळजी बाळगणे. ही व्युत्पत्ती बरोबर असल्याचे मॅक्समूलरला वाटते. त्याच्या मते, ''रिलीजन हा शब्द आरंभीच्या कल्पनेप्रमाणे आदर, काळजी, पूज्य बुद्धी असाच असू शकतो.'' धर्म या शब्दाच्या उत्पत्ती संबंधीच्या वरील सिद्धांताशिवाय आणखीन एक धर्म शब्दाच्या व्युत्पत्ती संबंधीचा सिद्धांत सांगितला जातो. या सिद्धांताला पाश्चात्य धर्म विचारवंत सर्व्हियस, लॅक्टॅटियस आणि इतर काहीचा पाठींबा आहे. ते 'रिलीजन' हा शब्द 'रे–लिगेट' म्हणजे 'बांधून टाकणे', मनुष्यजात आणि दैवता यात एक दुवा सांधणे यापासून तयार करतात. वरील मतांशिवाय 'रेव्हिल' या विचारवंताना असे वाटते की, रिलीजन शब्द रे–लिगेट 'बांधून टाकणे' (वैचारिक, धार्मिक कल्पनेनुसार) या धातूपासून सिद्ध झालेला मानणे अधिक बरोबर आहे. या शिवाय तो पुढे म्हणतो –मानवी मन आणि स्वतःवर व जगावर ज्याची सत्ता आहे आणि ज्याच्या बरोबर भावनेने एकत्र येण्यात याला आनंद वाटतो, ते गूढ (वैश्विक) मन, यांना एकत्र आणणाऱ्या भाव बंधाने नियंत्रित झालेले मानवी जीवन म्हणजे धर्म.[1]

संस्कृत भाषेत असे काही शब्द आहेत की, त्यांचा यथातथ्य अनुवाद दुसऱ्या कोणत्याही भाषेत करणे शक्य होत नाही. 'धर्म' हा अशा पैकीच एक शब्द आहे. त्या शब्दाच्या अर्थाची अनेक परिवर्तने झाली आहेत. ऋग्वेदामधील सूक्तांमध्ये तो शब्द किमान छप्पन वेळा आला असून सामानतः 'धर्मन्' या नपुसकलिंगी रूपात विशेषण अथवा नाम म्हणून योजलेला आढळतो. वैदिक भाषेच्या अतिप्राचीनकाळाच्या स्वरूपात धर्म या शब्दाचा

---

1. देशमुख पंजाबराव, वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास, द्वितीय आवृत्ती, कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, नागपूर, 2001, पृ.क्र.7

नेमका काय अर्थ होत आहे हे सांगणे अवघड आहे. तो शब्द 'धृत्र' धारण करणे, आधार देणे, पोषण करणे या धातूपासून बनला आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. ऋग्वेदामधील काही थोडया वाक्यात तो शब्द धारण करणारा अथवा आधार देणारा अथवा पोषण करणारा या अर्थाने योजिला असावा. काही वाक्यात[2] उघड रितीने नपुंसकलिंगी योजिलेला असतो अथवा पुल्लिंगी किंवा नपुंसकलिंगी म्हणता येईल. अशा स्वरूपात योजिलेला असतो. बहुतेक सर्व ठिकाणी[3] धर्मन् या शब्दाचा अर्थ 'धर्मासंबंधी नियम अथवा धार्मिक विधी' असा असतो. काही वाक्यात[4] 'धर्मासंबंधी नियम' हा अर्थ तेथील संदर्भाला जुळत नाही आणि अशा वाक्यात त्या शब्दाचा अर्थ 'आचरणाची निश्चित तत्त्वे अथवा नियम' असा असावा.[5]

## 'धर्म' संकल्पनेची व्याख्या

पाश्चात्य व भारतीय विविध विचारवंतानी 'धर्म' या संकल्पनेचा अर्थ त्यांच्या विविध व्याख्याच्या माध्यमातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. धर्माचा सर्वसामान्य अर्थ समजावून घेण्यासाठी विविध व्याख्याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**सर एडवर्ड टायलर**, प्राचीन मानवी समाजाचे एक प्रसिद्ध अभ्यासक यांनी धर्म स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे. त्यांच्या मते, ''दैवी विभूतीच्या अस्तित्वावरील श्रध्दा म्हणजे धर्म होय.''

**सर जेम्स फ्रेंझर** यांच्या मते, ''मानवापेक्षा श्रेष्ठ असलेल्या शक्ती ज्या मानवी जीवन व निसर्ग यांचे दिग्दर्शन व नियंत्रण करतात.'' त्यांचे मन वळविण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे धर्म होय.[6]

**हर्डर –** ''दैवी सृष्टीक्रमाशी मनुष्याचे योग्य प्रकारे नाते स्थापन करण्याचा उपाय'' या व्याख्येत आपणास निसर्ग व मानवाच्या नात्यात धर्मसंकल्पना दिसते.

---

2. पितुं नु स्तोशं महो धर्माण तविशीम् द्य ऋ.1.187.1
ऋचा शुक्लयजुर्वेद 34.7 मध्ये आली आहे.
इमम०जस्पामुभये अकृण्वत धर्माणमग्नि विदयस्य साधनम् द्य ऋ. 10.92.2
3. ऋग्वेद (1.22.18), (5.26.6), (8.43.24), (9.64.1), इत्यादी)
4. आप्रा रजांसि दिव्यानी पार्थिवा श्लोकं देवः कृणुते स्वाय धर्मणे द्य ऋ.4.53. 3
धर्माणा मित्रावरूणा विपश्चिता व्रता रक्षेये असुरस्य मायया द्यऋ.5.63.7.इ.
5. भट यशवंत आबाजी (अनुवादक), भारतरत्न म.म.डॉ.काणेकृत धर्मशास्त्राचा इतिहास, पहिली आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, पुणे, 1967, पृ.क्र. 01, 02
6. बारबिंड भगवान पुरूषोत्तम, सामाजिक संस्था, तृतीय आवृत्ती, शारदा प्रकाशन, नांदेड, 1988, पृ.क्र.184.

**फिश्टे** जेव्हा ज्ञान अशी धर्माची व्याख्या करतो किंवा कोंते म्हणतो की, मनुष्य हाच एकमेव धर्म ज्ञानाचा खरा विषय आहे. धर्म म्हणजे, ''परमेश्वराचे ज्ञान होणे आणि त्याचे अनुकरण करून वागणे'' या सेनेकाच्या व्याख्येमध्ये एकाच ईश्वराच्या अस्तित्त्व आणि त्याच्या अस्तित्त्वाची मानवाला असणारी जाणीव गृहित धरलेली आहे. ती कशी उत्पन्न झाली याचा विचारच केलेला नाही. ''धर्म म्हणजे परमेश्वरावर, जगदर्त्यावर किंवा जगाच्या नैतिक सत्ताधाऱ्यावर तसेच पाश्चत्तापाच्या भावी स्थितीवर विश्वास'' ही बिशप बटलरची व्याख्या तर सर्वस्वी ख्रिश्चन धर्म तत्त्वावरून सूचलेली दिसतेय ती प्राथमिक अवस्थेतील धर्माला किंवा सुधारलेल्या धर्मापैकीही काहींना लागू करता येणार नाही. प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ दुर्खाईम यांनी धर्माची व्याख्या, ''जेव्हा काही पवित्र गोष्टी एकमेकांबरोबर समान किंवा गौन प्रधान भावाने अशा रीतीने संबंधित असतात की, ज्या मुळे विशिष्ट एकत्त्व असलेली एखादी व्यवस्था उत्पन्न होईल, परंतु जी व्यवस्था तशाच प्रकारच्या कोणत्याही व्यवस्थेच्या अंतर्गत असणार नाही. तेव्हा या सर्व आधारित आणि तत्संबंध विधी मिळून धर्म बनतो.'' रिलीजन म्हणजे, ''नैतिक सौंदर्य कल्पना विषयक, राजकीय आणि इतर प्रकारांपेक्षा भिन्न अशा फक्त धार्मिक शब्दानेच व्यक्तविलेल्या वस्तुचा समूह म्हणजे शब्दाद्वारा, कृतीद्वारा, रूढीद्वारा आणि संस्थाच्या द्वारा अतिमानवी शक्तींवर विश्वास असल्याची साक्ष देणारे आणि मानवाला त्याच्या संपर्कात आणणारे मानवी मनाचे आविष्कार'' असे मत **सिपीटील** यांचे आहे.[7] एकंदर पाहता वरील सर्व व्याख्या अपुऱ्या व एकांगी स्वरूपाच्या वाटतात. कोणतेही व्याख्या परिपूर्ण स्वरूपात मोडत नाही. असे असले तरीही मूळात 'धर्म' हा विषय सर्वव्यापी व सखोल स्वरूपाचा आहे. धर्मावर भौगोलिक प्रदेशानुसार तेथील मानवी वर्तन अशा विविध घटकांचा प्रभाव पडून त्या–त्या स्थानापुरते धर्माशी संबंध घटकाप्रमाणे विविध व्याख्यांचे स्वरूप दिसते. स्थुलमानाने 'धर्म व संस्कृती' या घटकाचे संशोधक, अभ्यासक, विचारवंत डॉ.आ.ह.साळुंखे यांची व्याख्या पाहणे आवश्यक ठरते. **'धर्म की धर्मापलिकडे?'** या ग्रंथातून धर्मविषयक सविस्तर मांडणी करतांना डॉ.आ.ह. साळुंखे म्हणतात, 'कल्पित असूनही वास्तव मानल्या जाणाऱ्या विशिष्ट अशा अती मानवी शक्तीला अनुकूल करून घेण्यासाठी मानवाने निर्माण केलेल्या उपासना पध्दती म्हणजे धर्म

---

7. देशमुख डॉ.पंजाबराव, वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास, द्वितीय आवृत्ती, कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, नागपूर, 2001, पृ.क्र.13

होय.''[8] मानवाच्या विकासासोबतच धर्माचाही विकास होत गेला हा विकास होत असतानाच मानव निसर्गातील शक्तीकडे आदरयुक्त भीती बाळगू लागला. जीवन जगत असताना आलेल्या संकटांवर मात करणारे शक्ती असे समजून या शक्तीला आपलेसे करणाऱ्या पध्दतीला व मार्गाला पुढे धर्म असे नामकरण प्राप्त झाले. धर्म शब्दाची व्युत्पत्ती सर्वसामान्यपणे ''धारयते इति धर्मः'' अशी केली जाते. जो एकत्र पकडून ठेवतो व रक्षण करतो तो धर्म आणि नीती नियम, रूढी तसेच कायदा धर्माचाच एक भाग आहे, असे समजतात. ही व्युत्पत्ती महाभारतातही आढळते.[9] परंतु महाभारतात वापरलेला हा शब्द अतिशय संदिग्ध अर्थाने वापरलेला दिसतो. यापेक्षा मनूची व्याख्या उत्तम उदाहरण ठरते.[10]

सामान्य व्यवहारात धर्म शब्द रिलीजनचा आणि मोरॅलिटिचा (नीतीचा) पर्याय आहे. पण प्रसंगानुसार रिलीजन किंवा मोरॅलिटी यापैकी एक अधिक प्रभावी असते. उदा. ''स्वधर्मे निधमं श्र्रेयः परधर्मे भयावहः'' या ठिकाणी धर्म शब्द रिलीजनच्या जवळजवळ समानार्थी आहे, तर ''अधम्मो निरयं नंति धम्मो पापेति सग्गति'' या पाली भाषेतील श्लोकात तो प्रभावी घटक म्हणून मोरॅलेटीचा पर्याय आहे, संस्कृत धर्म शब्दाचा पालीतील पर्याय धम्म हाही संस्कृतप्रमाणेच निरनिराळया भिन्न अर्थाने वापरला जातो, पण अधिक म्हणजे बौध्द तत्त्वज्ञानात तो एक अतिमहत्त्वाचा पारिभाषिक शब्द बनलेला आहे.[11]

## धर्माची निर्मिती

अगदी प्राचीन काळी गूढ शक्ती एका पदार्थातून दुसऱ्या पदार्थांकडे संक्रमित करता येण्यासारखी मानवी जीवन असेल आणि त्या गूढ शक्तीवर ताबा मिळविणे किंवा तिच्यावर नियंत्रण प्राप्त करणे हे ही उत्पत्तीकारक वाटले असेल, परंतू यात आणखी एका गोष्टीची भर घातली पाहिजे, ती म्हणजे काही पदार्थात असलेल्या मानाची, मानासंक्रात

---

8. साळुंखे आ.ह., धर्म की धर्मापलिकडे? पुनर्मुद्रीत द्वितीय आवृत्ती, 'लोकायत' प्रकाशन, सातारा, नोव्हेंबर 2010, पृ.क्र.09
9. ''धारणाद धर्म मित्याहू धर्मा धारतये प्रजःद्य
   यत् स्याद धारण संयुक्तं स धर्म इति निश्चयः द्यद्य''
10. ''वेद : स्मृति : सदाचार : स्वस्यच प्रियमात्मनःद्य
    एतच्चतुर्विधं प्राहू : साक्षाद् धर्मस्य लक्षणम्द्यद्य''
11. देशमुख पंजाबराव, वैदिक साहित्यात धर्माचा उगम आणि विकास, द्वितीय आवृत्ती, कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, नागपूर, 2001, पृ.क्र. 22

करता न येण्यासारखी आणि तिचा ताबा आपल्याला मिळविता न येण्यासारखे तिचे घटक होते. उदा. सुर्य, चंद्र इत्यादी माना.[12]

अशा रीतीने मानाच्या कल्पनेमध्ये ज्या अनेक गुणांची जोड होती. त्यातील दोन गुण म्हणजे दुसरेकडे नेता येणे आणि स्वतःमध्ये प्राप्त करणे हे होत. पण इतक्यानेही कार्यभाग होत नाही. आधुनिक समजुतीप्रमाणेही मानवी व्यक्तीत्त्वाचा गुण यात समाविष्ट होत नाही. आणि तो गुण अतिप्राचीन काळात देखील कोणत्या तरी रूपात होता. जेम्सने हे मान्य केले आहे. तो म्हणतो वस्तुतः चेतन तत्त्ववाद अनेक द्रव्यात्मवाद आणि मानव्यक्तितत्त्वारोपण या कल्पना (nimatism, animism and anthropomorphism) सतत साहयचर्याने होत्या आणि यासाठी त्या समकालीनत्त्वाने प्रकट होवू लागल्या. असे बहुसंख्य आणि बहुविध घटनांच्या स्पष्टीकरणासाठी समजता येईल. मेलॅनेशियन् अर्थाने मनामध्ये निश्चितच स्वयंप्रेरित किंवा एखाद्या चेतन तत्त्वाच्या प्रेरणेने या निघालेल्या यातुविषयक आणि धार्मिक कार्यकारीत्त्वाच्या सर्व बाबींचा समावेश होतो. यात शुध्द यातुकविषयक परिणामकारकतेच्या बाबीही समाविष्ट होतात. परंतु कमीअधिक प्रमाणात शुध्द धार्मिक बाबी, निदानपक्षी ज्या यातूपेक्षा धर्माशी अधिक संबंधित आहेत. अशा बाबी मात्र यात येवू शकत नाहीत. अशा रीतीने संक्रमणक्षम आणि स्वामीत्त्वानुकूल मानवरूपधारणक्षम अशी ही एक गूढ शक्ती या अर्थाने घेतल्यास माना या कल्पनेतच आपल्याला धर्माची उत्पत्ती शोधता येईल.

## पंथ–संप्रदाय

आपण वरील प्रमाणे धर्माबद्दलची विविध अंगाने थोडक्यात चर्चा केली. धर्माचाच एक घटक असणाऱ्या पंथ संप्रदायाबद्यल थोडक्यात तोंडओळख करून घेवू. पंथ, संप्रदाय हे दोन शब्द धर्माचेच अंगभूत घटक असून धर्मातून उदयास आलेल्या धार्मिक स्वरूपातील वैचारिक प्रवाहातून यांचा उदय घडून आला. स्वतंत्र धार्मिक विचार प्रवाह धर्माच्या मूळ चौकटीत राहूनच पंथ संप्रदाय आपले कार्य करीत असतात.

---

12. माना – मानवी शक्तीपेक्षा ही अधिक नैसर्गिक शक्ती असणारी दृश्य रूपातील नैसर्गिक घटक म्हणजे माना.

## पंथ व संप्रदायाचा अर्थ

पंथ व संप्रदायाचा अर्थ जाणून घेताना असे दिसते की, वेगवेगळया विचारवंतानी आपआपल्या परीने विविध अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासून केलेला आहे. त्या संबंधीची माहिती पुढीलप्रमाणे,

1. ''भारतातील हिंदू धर्म – संस्कृतीचे प्रधान अधिष्ठान म्हणजे भारतीय संप्रदाय, हिंदू धर्म म्हणजे सूत्र (दोर) असून सर्व संप्रदाय त्यात ओवलेले मणी आहेत.'' असा अर्थ महाभारतात आढळतो.[13]
2. ''उपास्य देवतेपेक्षा जिथे पंथ प्रवर्तक प्रबळ झाले, त्या संघटनेला पंथ असे नाव प्राप्त झाले.''
3. संप्रदाय म्हणजे ज्यात गुरू पंरपरागत उपदेश, चालीरीती, रूढी, धर्म भेद अथवा पंथ आणि दान अशी वैशिष्टे असतात त्या धार्मिक घटकाला संप्रदाय असे म्हणतात.
4. धर्मकल्पध्रुमच्या कोणत्याही शाखा–प्रतिशाखेच्या धर्मावलंबन करणाऱ्या संघटनेला संप्रदाय असे म्हणतात.
5. वेदोक्त ज्ञान–विज्ञान माननारा आणि वर्णाश्रम धर्माच्या मर्यादांचे पालन करणारा, अस्तिक्य भावाने ओतप्रोत भरलेला संघ म्हणजे संप्रदाय होय.[14]

एकंदर पाहता धर्म व संप्रदाय या संकल्पना एकमेंकावर अवलंबून आहेत. धर्म ही संकल्पना व्यापक दिसते. एका धर्मा मध्ये तत्त्वज्ञानाच्या किंवा आचरणाच्या फरकावरून पंथ संप्रदायांची निर्मिती होते. उदाहरण द्यावयाचे तर हिंदू धर्मात शैव, वैष्णव, शाक्त, तां़त्रिक, सौर अशा अनेक पंथ संप्रदायांची निर्मिती झालेली दिसते. धर्माचे एक अंग म्हणूनही पंथाकडे पाहता येते. बऱ्याच वेळा पंथातून अनेक उपपंथही निर्माण होतात. उदा. शैव पंथातून काश्मिरी, शैव, लकुलीश उर्फ नकुलिश, नाथ, वीरशैव लिंगायत इ.

---

13. महाभारत शांतीपर्व 349.64
14. अभ्यंकर शंकर वासुदेव, भक्तीकोश–भारतीय संप्रदाय, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र. 08

# उत्तर चालुक्य कालीन धार्मिक परिस्थिती

उत्तर चालुक्यांचा कालखंड हा पूर्वमध्ययुगीन असून या कालखंडात जैन, बौद्‌ध, आणि हिंदू हे प्रमुख धर्म होते. याशिवाय या धर्मात निर्माण झालेले काही पंथ, उपपंथही अस्तित्त्वात होते. आपल्या विषयाशी संबंधीत उत्तर चालुक्यकालीन धार्मिक परिस्थितीची तोंड ओळख करून घेवू.

## जैन धर्म

प्राचीन भारतीय कालखंडात उदयास आलेला हा एक प्रमुख धर्म, नास्तिकवादी धर्म म्हणून या धर्माकडे पाहिले जाते. या धर्मामध्ये 24 तीर्थंकर होवून गेले. त्यांची एक परंपरा या धर्मात दिसते. 24 तीर्थंकरापैकी इ.स. पूर्व 6 व्या शतकातील वर्धमान महावीर हे अधिक लोकप्रिय ठरले. जैन धर्म हा महावीरांचा धर्म म्हणून समाजात लोकप्रिय ठरला. वैदिक धर्ममतांच्या प्रवाहाने यज्ञयागप्रधान कर्मकांडाचा जेव्हा भारतीय समाजात अतिरेक झाला. त्याच्या विरोधात जैन धर्माने कार्य करण्यास सुरूवात केली.

संबंधित संशोधन विषयाच्या कालखंडाचा विचार केला असता असे दिसून येते की, हा धर्म पूर्व मध्ययुगात (उत्तरकल्याणी चालुक्य राजकालखंड)उत्तर भारताच्या तुलनेने दक्षिण भारतात अधिक लोकप्रिय ठरला. जैन धर्म म्हणजे 'जीन देवाने प्रवर्तीत केलेला धर्म'

## जैन धर्मातील पंथिक भेद

इतर धर्माप्रमाणे जैन धर्मातही पंथीक भेद दिसतात. आचरण पध्दत रूढी, परंपरा, तात्त्वीक मतभेद, बंडखोर प्रवृत्ती यातून स्वतंत्र वैचारिक प्रवाह निर्माण होवून विविध पंथ उपपंथ, जैन धर्मात निर्माण झाले आहेत. महावीरांच्या पूर्वी स्तंवीरकल्प व जीन कल्प या नावाचे दोन पंथ अस्तित्त्वात होते. स्तवीर पंथाचे लोक वस्त्रे वापरीत असत व जीनकल्प पंथातल्या एका शाखेचे लोक वस्त्रे धारण करीत नसत. महावीरांनी या दोन्हीही पंथाना एकत्रित करण्याचा प्रयत्न केला. महावीरांच्या निर्वानानंतर चंद्रगुप्त मौर्य यांच्या कारकिर्दीत जैन धर्मात पुन्हा पंथाची निर्मिती झाली. श्वेताबंर आणि दिगांबर या प्रमुख पंथाची निर्मिती झाली. या दोन पंथांच्या उदयाबद्दल असे सांगितले जाते की, मौर्य सम्राट चंद्रगुप्त यांच्या अंतिम कारकिर्दीत मगध प्रातांत फार मोठा दुष्काळ पडला. अशा प्रसंगी जैन गुरू भद्रबाहु यांच्या नेतृत्त्वाखाली सुमारे बारा हजार जैन साधू जीविकेसाठी दक्षिण भारतात गेले. पुढे

काही वर्षानंतर दुष्काळ संपल्यावर भ्रदबाहु यांच्या नेतृत्त्वाखाली दक्षिणेत गेलेले लोक जेव्हा मगध प्रांतांत परत आले तेव्हा त्यांना तेथे राहिलेल्या स्थुलभद्राने भरविलेल्या धर्मसंम्मेलनाची व धर्म ग्रंथाच्या एकीकरणाची माहिती समजली, आपल्या अनुपस्थितीत घडलेल्या या गोष्टीला भद्रबाहुच्या लोकांनी मान्यता दिली नाही. या मतामुळे जैन समाजात दोन पंथ निर्माण झाले,. स्थुल भद्रचा 'श्वेताबंर' व भद्रबाहुचा 'दिगांबर' या दुष्काळाच्या पार्श्वभूमीतून अस्तित्त्वात आले.[15]

### 1. श्वेतांबर पंथ

जैन धर्मातील प्रमुख व प्राचीन पंथांपैकी हा एक पंथ या पंथातले लोक शुभ्र वस्त्रे धारण करीत त्यामुळे या पंथाला श्वेताबंर पंथ म्हणून ओळखले जाते. श्वेतांबरामध्ये पुढे स्थानकवाशी व डेरावाशी असे दोन उपपंथ निर्माण झाले. स्थानकवाशी लोक मुर्तीजी पुजा करीत नाहीत. पुढे या पंथातून गच्च व तपागच्छ असे वैचारिक प्रवाह रूढ झाले.

### 2. गच्छ पंथ

इ.स. 10 व्या शतकात उदयोतन नावाचा एक श्रेष्ठ भंट्टारक होवून गेला. त्याच्या शिष्यापासून 84 गच्छ (पंथ) उत्पन्न झाले. निरनिराळया धर्म गुरूमध्ये मतभेद निर्माण होवून त्यातून असे विविध गच्छ (पंथ) उदयास आले. काही गच्छ केवळ स्थान भेदामुळे निर्माण झाले. गच्छांच्या मुख्य आचार्याला 'सुरी' व शिष्याला 'गणी' हे विशेषण लावतात.

### 3. ढुंढिया पंथ

श्वेतांबर पंथांची एक शाखा 'ढुंढिया पंथ' म्हणून प्रसिध्द आहे. या पंथाचे साधू बहुधा स्थानक नावाच्या मठात राहतात म्हणून त्यांना 'मठमार्गी' म्हणतात. या पंथात मूर्तीपूजेला स्थान नसल्यामुळे मंदिरांची आवश्यकता नाही. मनोविकारांचे दमन करावे व तीर्थंकरांच्या पवित्र आचरणाचे अनुसरण करावे असा या पंथाचा आचारधर्म विषयीचा संदेश आहे. स्त्री व पुरूषमलीन पांढरी वस्त्रे धारण करीत व नाकातोंडाला फडके बांधतात.

वरील जैन श्वेतांबर उपपंथाशिवाय हुजेरे, साधुमार्गे, स्थानकवाशी यासारखे श्वेताबंराचे उपपंथ आहेत.

---

15. अन्नदाते श्रेणीक (संपादक), जैन ऐतिहासिक भाग–2, प्रथमावृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबीवली, जानेवारी 2003, पृ.क्र. 4

### 4. दिगंबर पंथ

जैन धर्मातील एक प्रमुख पंथ, जैनांच्या, 'आवश्यक सूत्र' नामक ग्रंथात दिगांबर पंथाच्या उत्पत्तीसंबंधीची कथा आढळते.[16] शिवभूतीपासून मध्यंतरी खंडीत झालेला दिगंबर संप्रदाय पुनश्चः सुरू झाला असे समजतात. तीर्थंकर परंपरेतील महावीरांनी दिगंबर वृत्तीने तपश्चर्या केली व तपश्चर्यसाठी नग्नत्त्व आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. त्यामुळे दिगंबर पंथ उदयास आला असे मानतात. महावीरांपूर्वीचे तीर्थंकर पार्श्वनाथ हे श्वेत वस्त्र धारण करीत असत. या अंतिम दोन तीर्थंकराच्या वस्त्रधारण विषयक वेदामुळे श्वेतांबर व दिगंबर हे दोन प्रमुख संप्रदाय जैन धर्मात निर्माण झाल्याचे ही एक मत दिसते. स्थानिकवाशी व तेरा पंथी हे दिगांबराचे प्रमुख उपपंथ आहेत. दिगंबर पंथाची पीठे (गादया) कोल्हापूर, लातूर, कारंजा, इत्यादी ठिकाणी आहेत. श्वेताबंर पंथांची पिठे, (गादया) मात्र कोठेही नाहीत.[17]

## जैन धर्माचा दक्षिण भारतातील प्रसार

सम्राट अशोकाचा नातू 'संप्रत्ती' याने आपल्या कारकिर्दीत जैन धर्माला राजाश्रय दिला. त्यानंतर उत्तर भारतातील हेमचंद्राने राजाकुमार पाल याला जैनधर्माची दीक्षा दिली. या दोन राजांच्या प्रभावाने जैन धर्माचा विशेष प्रचार उत्तर भारतात प्राचीन काळात झाला. दक्षिण भारतात या धर्माचा प्रसार कोणत्या मार्गाने झाला व कसा झाला याबद्दल मतभेद आहेत. इ.स.पूर्व पहिल्या व दुसऱ्या शतकात ओरिसा प्रांतात जैन धर्माचा प्रसार झाला. ओरिसा प्रांतामधून हा धर्म दक्षिणेकडे प्रसारीत झाला असावा, दुसऱ्या एका मतानुसार याच सुमारास गुजरात आणि काठेवाडमध्ये प्रथमतः प्रसारीत होवून जैन धर्म तेथून महाराष्ट्र मार्गे, कर्नाटक दक्षिणेकडील प्रांतात प्रसारीत झाला असावा. दक्षिण भारतातील श्रवणबेळगोळ, विंध्वगिरी, चंद्रगिरी येथील शिलालेखावरून इ.स. पहिल्या, दुसऱ्या

---

16. – शिवभूती नामक एका प्रधान पुत्राने जैन धर्माची दिक्षा घेतली. त्याला एका राजाने एक रत्नकंबल (भरजरी शाल) समर्पण केले. त्या सुंदर वस्त्राबद्दल शिवभूतीच्या मनात फार आसक्ती निर्माण झाली. हे ओळखून त्याच्या गुरूने त्याचे तुकडे–तुकडे करून सर्व शिष्यांत वाटून टाकले. बाहेरून परत आल्यावर हा प्रकार पाहून शिवभूतीला फार वाईट वाटले. त्यावेळेपासून वस्त्रांचा सर्वस्वी त्याग करून तो दिगंबर वृत्तीने राहू लागला. गुरूने त्याच्या वर्तनावर टीका केली असता ज्याच्या अंगी नग्न राहण्याचे सामर्थ्य आहे त्यांने तसे राहण्यास काही दोष नाही, असे आपल्या कृत्याचे त्यांनी समर्थन केले.
17. वर्णकर श्री.भा., भारतीय धर्म व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, श्रीलेखन वाचन भांडार, पुणे, 1973, पृ.क्र. 161

शतकापर्यंत दक्षिणेत हा धर्म चांगलाच लोकप्रिय होता.[18] मौर्यकालखंडात मौर्य सत्तेचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य याच्या कार्यकिर्दीमध्ये जैन धर्म दक्षिण भारतात प्रसारीत झाला. असेही जैन धर्मात मानले जाते. महाराष्ट्रात जैन धर्म बिहार मधून इ.स. पूर्व 4 थ्या शतकात आला असे जैन परंपरा सांगते. यामागचे कारण मगध देशातील इ.स. पूर्व 4 थ्या शतकातील दुष्काळ व भद्रबाहु यांचे दक्षिणेतील आगमन यामुळे हा धर्म दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर परिसर व कर्नाटकातील श्रवणबेळगोळ या परिसरात तो प्रथमतः प्रसारीत झाला असावा, जैन धर्माची माहिती दक्षिण भारतातील लोकांना भद्रबाहुच्या दक्षिणेतील आगमनाच्या अगोदर होती. दक्षिण भारतात जैन धर्माचा प्रसार होण्याआधी हा धर्म कलिंग मधून आंध्रप्रदेशात तेथून तामिळनाडूत आणि तामिळनाडूमधून संपूर्ण कर्नाटकात प्रसिध्द झाला असल्याचे सांगितले जाते.[19]

## उत्तर चालुक्य कालीन जैन व्यापाऱ्यांचे कोरीव लेखातून आलेले काही उल्लेख

उत्तर चालुक्य काल खंडात हिंदू धर्मानंतर सर्वांत प्रसिध्द व लोकप्रिय धर्म म्हणून जैन धर्माकडे पाहिले जाते. सर्वसामान्यापासून ते राजकीय व प्रशासकीय प्रमुखांपर्यंतच्या अनेकांनी जैन धर्माचा स्वीकार केलेला होता. कल्याणी चालुक्यासोबतच तत्त्कालीन गंग, कदंब, शिलाहार या सोबतच कल्याणी चालुक्यांचे मांडलीक प्रशासक यांच्यामध्येही जैनांची वसती मोठया प्रमाणात असल्याचे कोरीव लेखातील उल्लेखावरून दिसते.

कोप्पल जिल्हयातील 'जमखंडी' तालुक्यातील 'तर्दोळ' या गावातील चालुक्य कालीन (इ.स. 1187) शिलालेखात चालुक्य वंशाच्या माहिती सोबतच जैन धर्मासंबंधीची विपुल माहिती दिसते. या शिलालेखात तर्दोळ येथील जिनालयाला दान दिल्याचा उल्लेख आढळतो. कोल्हापूरच्या रूप नारायण जैन बसदीचे आचार्य महानंदी यांच्या उपस्थितीत तर्दोळ येथील जैन बसतीला '72 मत्तर भूमी' व '1 मत्तर बागायत जमीन' या गावातील गावुंड शेट्टीने दिल्याचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात आलेला

---

18. गोखले शोभना, प्राचीन भारतीय इतिहासाची साधने, प्रथमावृत्ती, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
19. अन्नदाते श्रेणीक (संपादक), जैन ऐतिहासिक भाग–2, प्रथमावृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबीवली, जानेवारी 2003, पृ.क्र. 57

आहे.[20] इ.स. 1119 च्या ऐहोळ शिलालेखानुसार केशव शेट्टी नावाच्या जैन व्यापाऱ्याने आपल्या आईच्या इच्छेप्रमाणे व पत्नीच्या विनंतीवरून गावातील पूर्व व पश्चिमेकडे असणाऱ्या जैन बसदी येथे विहीर खोदली व लोकपालक मूर्ती बनवून तिची स्थापना केली. या जैन बसतींना भूमी व घर दान म्हणून दिले. दिवाबत्तीच्या सोईसाठी एक तेलघाणाही दिल्याचा उल्लेख प्रस्तुत ऐहोळ शिलालेखात येतो.[21] मरोळा (जि.बागलकोट) येथील कोरीव लेखानुसार इ.स. 124 साली नौलंब वंशीय प्रशासक राणी महादेवी हिने सर्व विद्येत निपुण असणाऱ्या जैन अनंतवीरमुनी व मरवळ (आधुनिक मरोळा) येथील जमीन दान दिल्याचा उल्लेख येतो.[22] इ.स. 1024 च्या कोप्पळ शिलालेखात जैन धर्माच्या दीक्षेविषयक माहिती दिसून येते. या शिलालेखानुसार जैन धर्म व्यापाऱ्यांमध्ये (शेट्टी) प्रसिध्द होता. या काळात अनेक व्यापाऱ्यांनी या धर्माचा स्वीकार केलेला होता. प्रस्तुत शिलालेखात उल्लेखानुसार रेवशेट्टी नौनंबशेट्टी, मधुरांतकशेट्टी यांनी रत्नत्रेय साधना (जैन त्रिरत्न) केली. रेवशेट्टी या व्यापाऱ्याने अभयनंदी पंडीत नामक जैन मुनींकडून गुरूव्रताचा स्वीकार करून 60 दिवस आराधना (उपवास) करून देहमुक्ती घेतल्याचा उल्लेख यात आहे.[23] चालुक्याचे मांडलिक नोलंब वंशीय राणी परियब्बाराणी हिने जैन धर्माचा स्वीकार केलेला होता. इ.स. 990 च्या कोप्पळ शिलालेखानुसार हिने जैन बसती उभारलेली होती. कोप्पळ हे स्थळ जैन धर्मियांचे प्रसिध्द व मोठे स्थळ असल्याचे येथे उपलब्ध असलेल्या चार शिलालेखातील उल्लेखानुसार दिसते. चालुक्यांच्या समकालीन शिलाहार राजा 'नाकरस' व राणी 'चंपकांबिकादेवी' यांचा जैन धर्मीय सामंत निंबदेवाचा मुलगा 'बिंबरसाने' आरेगाव येथील जैन बसतीला दान दिल्याचा उल्लेख तत्कालीन शिलालेखात दिसतो.[24] निबंरगी शिलालेखानुसार कलचुरी वंशीय राजा 'आमरस उर्फ आमुगीदेव' याच्या कालखंडात यळनींबरगी (आधुनिक निंबरगी) या गावातील गौंड (गांव प्रमुख), नागागौंड, भोगगौंड या

---

20. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.81 – 90.
21. Reddy Devarakonda, ibid, Page No.183
22. Reddy Devarakonda, ibid Page No.409 -411
23. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – III, Kopal District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 1999, Page No. 63-64
24. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No.73.

जैन अनुयायांनी 'नेमीनाथ' बसती बांधली. जैन आचार्य कौण्डकुंदांचार्य देशीचे, गुरू परंपरेचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखात येतो.[25] कलचुरी वंशीय शासक बिज्जल याने जैन धर्मियांना राजाश्रय दिलेला होता. माळकवठे येथील शिलालेखानुसार बिज्जलाची पत्नी रंभादेवी हिने माळकवठे येथील जैन बसदिला दान दिल्याचा उल्लेख आढळतो.[26] मराठवाडयातील बीड जिल्ह्यातील धर्मापुरी येथील जैन बसदीला व्यापारी संघाने दान दिल्याचा उल्लेख धर्मापुरी शिलालेखात येतो. जैन धर्माचे हे एक प्रसिद्ध स्थळ होते. हे प्रस्तुत शिलालेखावरून स्पष्ट होते.[27] लातूर जिल्हयातील रामलिंग मुदगड (ता.निलंगा) येथील उपलब्ध शिलालेखानुसार हे ही स्थळ जैन धर्माचे प्रसिध्द स्थळ असल्याचे दिसते. वरील व इतरही बऱ्याच उपलब्ध शिलालेखावरून जैन धर्माबद्दलची माहिती विपुल प्रमाणात उपलब्ध होते. उत्तर कर्नाटक, दक्षिण महाराष्ट्र व मराठवाडयात विविध व्यवसाय करणारे व्यावसायीक, व्यापारी व काही प्रशासकीय अधिकारी जैन धर्माचे अनुयायी होते. हे वरील काही कोरीव लेखाद्वारे स्पष्ट होते.

## दक्षिण भारतात जैन धर्माला मिळालेला राजाश्रय

कर्नाटकातील बदामी चालुक्यांनी जैन धर्माला राजाश्रय मिळवून दिला होता. यामुळे कर्नाटकात जैन धर्माचा प्रसार सुरू झाला. बदामी चालुक्यानंतर कर्नाटकात राष्ट्रकुटांनी सत्ता स्थापन केली. राष्ट्रकुट राजवंशातील बरेच राजे जैन धर्मीय होते. राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष याने जैन धर्माचा स्वीकार करून या धर्माला राष्ट्रकुटाचा राजाश्रय मिळवून दिला.[28] राष्ट्रकुट किंवा तत्कालीन रट्ट कालीन (संवदत्ती व बेळगावचे) महामंडलेश्वर, चौथा कार्तवीर्य याच्या कालखंडातील वेणूग्राम शिलालेखात[29] जैन मंदिरांना दान धर्म दिल्याचा उल्लेख

---

25. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No. 247.
26. Upadhya G.N., ibid, Page No.254 - 255.
27. Upadhya G.N., ibid, Page No. 141 - 142.
28. राष्ट्रकुट सम्राट अमोघवर्ष (इ.सन 814 ते 877) आदीपुराणकार स्वामी जीनसेनाचार्य यांचे शिष्य होते. ध्रुव, गोविंद (जगत्तुंग) कृष्णतृतीय इंद्रराज चौथा, या राष्ट्रकुट राजाने जैन धर्माचा स्विकार केला.
29. संख्येश्वरच्या शिलालेखात बेळगावचे प्राचीन नाव वेणूग्राम तर कोल्हापूर परिसरातील रायबागच्या शिलालेखात बेळगावचा उल्लेख वेळूग्राम असा आला आहे.

आढळतो.[30] कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात जीनालयांची स्थापना होवू लागली. इ.स.च्या आठव्या शतकापासून जैन धर्माशी संबंधित शिलालेखांचा पुरावा मिळतो. पुढे 10 व्या, 12 व्या शतकापर्यंत चालुक्य व यादवाच्या राज्यात शासनकर्त्याने जैन धर्माला दिलेल्या देणगी विषयक मजकुर शिलालेखातून आढळून येतात.[31] विक्रमादित्य 6 वा हा कलेचा आश्रयदाता होता. त्याच्या दरबारात वेगवेगळया जाती धर्माचे विद्वान व कलाकार होते. यापैकी काही जैनधर्मीयही होते. 'एक्कोजा', कल्याणचा, 'कल्लकरीगा', नागाईचा, 'नागोप्पा' व दावणगीरीचा 'महाकाळ' हे जैन धर्मीय शिल्पकार होते. नागोजीच्या शिल्पाचे वैशिष्ट हे होते की, त्याने चरकावर मोठे शिलाखंड तासून मुर्तीशास्त्रातील ओप–पॉलिशची पध्दत शोधून अनुसरली. या शैलीचे तंत्र वापरलेल्या दोन खडगासनस्थ भगवान पार्श्वनाथाच्या मूर्ती आजही हैदराबादच्या सालारजंग म्युझियम व लंडनच्या इंडिया हाऊस लायब्ररीत पाहावयास मिळतात.[32] सत्त्याश्रयानेही (इ.स.997 ते 1008 इ.स.) जैन मंदिराला देणगी दिल्याचा उल्लेख मिरज, जि.सांगली ताम्रपटात आलेला आहे.[33] चालुक्य राजवटीच्यानंतर मंगळवेढयाच्या कलचुरीवंशीय शासक बिज्जल याने चालुक्यांची राजधानी कल्याणी आपल्या ताब्यात घेतली, हा कलचुरी वंशी शासक बिज्जल जैनधर्मीय होता.[34] जुन्नी हे

---

30. स्वाती, समधीकृतपंच वाहा शब्द महामंडलेश्वर कार्तवीर्य देवं निजानूज युवराज कुमारवीर्य–मल्लिकार्जुनदेवं बेरसु वेणुग्राम स्कधांवार, दोळ्–साम्राज्य सुखमननुभावी सुप्तत्मामीय श्री करूणाग्रगण्यनुमखिळ मंत्रिजन वरेण्यनुमअप्प–बीचि– राजमांडिसिद रट्ट जिनालय, श्रीशांतीनाथदेवर नित्य पुजाभिशेका मोदलाद धर्मकार्य निमित्तमाणि तज्जिनालयाचार्य, श्री शंभुचंद्र, भट्टारकदेवरगे शक वर्षद 1127, रक्ताक्षी, संवत्सरद, शुध्द बिदीगे वड्डवार (शनिवार) दोळाद आद संक्रमण समय दोळ् नाल्छासिर्वर्महाजन गळ्सहित, मागी धारापूर्वकमाडि वेणुग्रामेयोळ् कोट्टस्थळवृत्ति –कन्नड शिलालेख
31. या कालखंडातील काही जैन धर्मीय शिलालेख–कळवण (जि.नाशिक) 11 वी शतक जैन मंदिराला देणगी, धर्मापुरी जि.बीड इ.स. 11 वे शतक कल्याणी चालुक्य राजाकडून जैन वसतीला दान, (बरेताकी शेट्टीचे दान), करडखेल जि.नांदेड येथील कल्याणी चालुक्य कालीन निगलकमळ जिनालयाला देणगी विषयक शिलालेख, निंबरागी दक्षिण सोलापूर येथील मंगळवेढा कलचुरी कालीन, 11 वे शतक, निमेनाथ वसतीच्या उभरणीविषयी शिलालेख
32. अन्नदाते श्रेणीक (संपादक), जैन ऐतिहासिक भाग–1, प्रथमावृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबीवली, जानेवारी 2002, पृ.क्र. 70
33. रायरीकर कल्पना, भालेराव मंजिरी, महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार, शिलालेख आणि ताम्रपट, प्रथमावृत्ती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2009, पृ.क्र. 52
34. देसिंग बोरगाव, जिल्हा सांगली, येथील शिलालेख, पार्श्वनाथ जैन मंदिराचा उभारणीचा उल्लेख माळकवडे, जि.सोलापूर, बाराव्या शतकातील शिलालेखात जैन बसतीला राजा बिज्जल व राणी रंभादेवी यांनी दान दिल्याचा उल्लेख.

कलचुरीचे जैन धर्मीय स्थळ होते. बिज्जलाच्या मृत्यूनंतर राजपदावर आलेल्या त्याच्या वंशियानी शैव पंथाच्या प्रभावामुळे जैन धर्माचा त्याग करून शैव पंथाचा स्वीकार बाराव्या शतकात केला. चालुक्य (कल्याणी) वंशीय राजा सत्त्याश्रयाचा काळात (इ.स. 997 ते 1008 इ.स.) जैनमुनी विमलचंद्र होवून गेला. यावरून हे सि्द्ध होते की, बाराव्या शतकापर्यंत जैन धर्म कल्याणी चालुक्यांच्या राज्यात लोकप्रिय होता.[35] चालुक्यांच्या समकालीन असणाऱ्या गंगवंशीय राजा रायमल्ल चौथा याचा मंत्री चामुण्डराय याने इ.स.980 साली श्रवणबेळगोळ परिसरात जैन बसदीची स्थापना करून दोन जैन मंदिरांची उभारणी केली.[36] असे म्हटले जाते की, जैन आचार्य सिंह नंदीच्या प्रेरणेतून दंडिय आणि माधव या गंगवंशीय राजपुत्राना प्रोत्साहन देवून कल्याणी चालुक्य समकाळात
गंगराज्याची स्थापना केली. हे राज्य पुढे अकराव्या शतकापर्यंत अस्तित्वात होते.[37] या वंशातील मारसिंह राजा कट्टर जैन धर्मीय होता. याच्या कारकिर्दीत जैन धर्माला चालना मिळाली.[38] राष्ट्रकुट, गंग राजवंशाप्रमाणे कदंब वंशातील राजे जैन धर्माचे उपासक होते. त्यांनी जैनधर्म प्रसारार्थ दाने दिल्याच्या नोंदी आहेत.[39] शिलाहारवंशीय राजांचे कोकणावर वर्चस्व होते. यांच्या तीन प्रमुख शाखा होत्या. (1) ठाणे व रायगड जिल्हयातील शाखा 2) दक्षिण कोकण आणि 3) दक्षिण महाराष्ट्र सातारा, कोल्हापूर, बेळगाव.) कोल्हापूर परिसरात राज्य करणाऱ्या शिलाहार शाखेची राजधानी 'क्षुल्लकपूर' म्हणजे कोल्हापूर ही होती. हे राज्य कल्याणी चालुक्य समकालीन म्हणजे इ.स. 8 व्या शतकापासून ते 12 व्या शतकाच्या दरम्यान अस्तित्त्वात होते. या वंशाचे मूलस्थान प्रसिद्ध जैनधर्मीय क्षेत्र तेर (तगर) जि. उस्मानाबाद हे होते. यामुळे यांच्यावरती निश्चितच जैन धर्माचा प्रभाव पडलेला असावा. तत्त्कालीन इतर राजवंशीय राजांप्रमाणे यांनीही जैन धर्माला राजाश्रय दिला.[40] या

35. रायरीकर कल्पना, भालेराव मंजिरी, महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार, शिलालेख आणि ताम्रपट, प्रथमावृत्ती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2009, पृ.क्र.51
36. शास्त्री के.ऐ. नीळकंठ, दक्षिण भारत का इतिहास, नववी आवृत्ती, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा, नोव्हेंबर 2006, पृ.क्र. 519
37. अन्नदाते श्रेणीक (संपादक), जैन ऐतिहासिक भाग–2, प्रथमावृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबीवली, जानेवारी 2000, पृ.क्र. 58
38. सांगवे विलास, जैन संस्कृती परंपरा व प्रभाव, प्रथमावृत्ती, अनेकांत शोधपीठ, बाहुबली, कोल्हापूर, 1991, पृ.क्र. 54
39. अन्नदाते श्रेणीक (संपादक), उपरोक्त, पृ.क्र. 59
40. सांगवे विलास, उपरोक्त, पृ.क्र. 55

कालखंडातील दक्षिण भारतातील प्रबळ असणारी सत्ता 'होयसळां'ची होती. होयसळांना राज्यस्थापनेची प्रेरणा देणारे आचार्य सुदत्त हे श्रेष्ठ जैन राजगुरू होते. होयसळांच्या काळात सुबक जैन शिल्पे व मंदिरे आकारास आली. विशेषतः राजा विष्णूवर्धन आणि राणी शांतलादेवी तसेच सेनापती गंगराज यांनी मंदिर निर्मितीला प्रोत्साहन दिले. या काळात जैन शिल्पकलेचा मोठा विकास झाला.[41]

इ.स.च्या 12 व्या शतकापर्यंत जनमानसात रूजलेला जैन धर्म या शतकानंतर मात्र सामान्यांपासून दूर जावू लागला. शैव पंथाचा प्रभाव या काळात दख्खनच्या परिसरात वाढल्या कारणाने हे झाले असावे. या काळापर्यंत जैनधर्मीयांना मिळणारा राजाश्रयही कमी होत गेला. पांडय, चोळ, पल्लव[42] शासकानी जैन धर्माच्या ऐवजी कशा प्रकारे शैव धर्माचा स्वीकार केला याची कथा तत्कालीन साहित्यात दिसून येते.[43] उत्तर चालुक्य राजा विक्रमादित्य 6 वा (इ.स. 1073 ते 1126) याचा नातू (मुलीचा मुलगा) बिज्जल जो

---

41. अन्नदाते श्रेणीक (संपादक), जैन ऐतिहासिक भाग–2, प्रथमावृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबीवली, जानेवारी 2000 पृ.क्र. 59

42. नीलकंठशास्त्री के.ए. यांच्या, ''दक्षिण भारत का इतिहास''(पृ.क्र.462) या ग्रंथात त्यांनी पौराणिक आख्यानाच्या आधारे एका कथेचे वर्णन केले आहे. त्यात जैन व शैव यांच्यातील संघर्षाचे वर्णन असून त्यात जैनाना पल्लवाचा मिळणारा राजाश्रय कसा थांबला या संबंधी कथा पुढीलप्रमाणे, '' ............ 63 नयनारांमधील पहिले स्थान तिरूनाडू क्करशुको हैजो तिरूगमुरचा बेल्लाल याला होते. बेल्लाल हा पल्लव राजा महेंद्रवर्मन प्रथमच्या समकालीन असावे. त्याचा जन्म कट्‌टर शैव कुटूंबात झाला असे असले तरीही आयुष्याच्या सुरूवातीस तो जैन धर्माकडे आकर्षिला गेला आणि जैन सन्यांसी बनुन पाटलीपुत्र (कड्‌डालर) च्या एका जैन मठात स्थायिक झाला. त्याच्या मोठया बहिणीला त्याने केलेले धर्म परिवर्तन पाहून वाईट वाटले. तीने भगवान शिवाकडे मदतीसाठी प्रार्थना केली. तिची विनंती ईश्वराने मान्य केली. धर्मसेन (जैन मठामध्ये तिच्या भावाचे नाव हेच होते) पोटदुखीच्या एका असाध्य रोगला बळी पडला. या रोगापासून त्याला वाचविण्यासाठी मठातील त्याचे मित्र व सहयोगी बरेच प्रयत्न केले पण काही उपाय झाला नाही. शेवटी तो आपल्या बहिणीकडे जावून या असाध्य रोगापासून मुक्त करण्याची विनंती करतो ती तीरूवदीगईच्या देवतेच्या आशिर्वादाने त्याला पुर्ववत आरोग्य संपन्न बनवते. धर्मसेनाने जैन मठ सोडल्या कारणाने बाकीच्या संन्यासीना याचा राग येतो. ते पल्लव राजा महेंद्रवर्मनची भेट घेवून धर्मसेनाच्या विरूध्द खोटे आरोप लावतात. त्याची विविध पध्दतीने परीक्षा घेतली जाते आणि बराच त्रासही देण्यात येतो असे असले तरी भगवान शिवाच्या आशिर्वादामुळे प्रत्येक संकटातून त्याची सुटका होते. हे सर्व पाहून स्वतः पल्लव राजा शैव धर्माचे श्रेष्ठत्व मान्य करून या धर्माचा तो स्वीकार करतो. तिरूनाडूक्करशुको या अप्परचे वरील जी चरित्र आलेले आहे त्यात सत्याचा भाग जरी कमी असला व ते काल्पनिक असले तरी आपणास महेंद्र वर्मनच्या त्रिचनापल्लीतील कोरीव लेखातील एका पदयात तो स्वतः आपला धर्म (जैन धर्म ....?) सोडून शैव धर्माचा स्वीकार केलेला उल्लेख आढळतो.

43. नीळकंठशास्त्री के.ऐ., दक्षिण भारत का इतिहास, नववी आवृत्ती, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा, नोव्हेंबर 2006, पृ.क्र.463

मंगळवेढयाच्या कलचुरी वंशीय शासक होता याच्यावर जैन धर्माचा प्रभाव होता तो जैनधर्मीय बनला. कल्याणक्रांती[44] नंतर त्यांच्या वंशजानी जैन धर्माचा त्याग करून वीरशैव लिंगायत धर्माचा स्वीकार केला. या शासकानी पुढे अनेक जैन बसतींचे व मठांचे शैव मठात रूपांतर केले. या काळातील आळंद येथील (कर्नाटक) विद्वान शैव ब्राह्मण एकांत रामय्या याने शस्त्राच्या जोरावर धर्मांतर केल्याचे कर्नाटकातील गुलबर्गा येथील जैन अभ्यासक विद्याचंद कोठारी यांनी "गुलबर्गा परिसर व जैन धर्म" या संशोधनपर लेखात म्हटले आहे.[45] 12 व्या शतकानंतर दख्खन प्रदेशात चक्रधराचा महानुभाव संप्रदाय वीरशैव लिंगायतांप्रमाणे लोकप्रिय ठरला. विशेषतः महाराष्ट्रात हा संप्रदाय लोकप्रिय बनला. या कालखंडात नाथ संप्रदायाचे गोरखनाथांनेही जैन अनुयायांना आपल्या पंथात सहभागी करून घेतले आहे. शिवाय यादवांच्या उत्तर कालखंडात मुस्लिम आक्रमणकाऱ्यांचा प्रवेश होऊन अल्लाउद्दीन खिलजी व त्यानंतर आलेल्या मुस्लिम शासकांनी मुस्लिम धर्माचा प्रसार होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्याचा परिणाम म्हणजे जैन धर्म कमकुवत होऊन हा धर्म पुढे नाममात्र बनला.

## बौद्ध धर्म

प्राचीन भारतातील प्रमुख व लोकप्रिय असणारा बौद्ध धर्म इ.स.च्या 8 व्या ते 12 व्या शतकापर्यंत अस्तंगत बनला. या कालखंडात बौद्ध धर्माला राजाश्रय मिळू शकला नाही. हा धर्म अनेक पंथात विभागला गेला. चीनी प्रवासी इत्सिंगच्या वेळी बौद्ध धर्माचे अठरा प्रकार पडले होते. तांत्रिकतेचा प्रभाव बौद्ध धर्मातील अनेक पंथांवर पडून तो विपरित अवस्थेत पोहचला. या परिस्थितीचा फायदा हिंदू धर्माने घेऊन आपले वर्चस्व पुन्हा एकदा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला गेला असे असले तरीही उत्तर चालुक्य कालीन कालखंडात बौद्ध अनुयायांची वसती होती. उत्तर चालुक्यांच्या राज्यात बरीच बौद्ध स्थळे अस्तित्त्वात होती.

---

44. वीरशैव लिंगायत बसवेश्वरांच्या अनुयायांनी कलचुरी वंशीय बिज्जल शासकाच्या विरोधात केलेले सशस्त्र आंदोलन

45. अन्नदाते श्रेणीक (संपादक), जैन ऐतिहासिक भाग–1, प्रथमावृत्ती, सुमेरू प्रकाशन, डोंबीवली, जानेवारी 2002, पृ.क्र. 70

## बौद्ध धर्माचा प्रसार व दक्षिण भारत

गौतम बुद्धाच्या समकालीन विविध राजवंशाच्या राजघराण्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. पुढे चंद्रगुप्त मौर्याचा नातू सम्राट अशोकाने कलिंग युद्धातून प्रेरणा घेवून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यावर गौत्तम बुद्धाने ज्याप्रमाणे धर्म प्रचारक ठीक–ठिकाणी पाठविले होते, त्याप्रमाणे भारताच्या सर्व भागात, पूर्वेकडे ब्रह्मदेशात आणि वायव्येस गांधार देशापर्यंत धर्मप्रचारक पाठविले. कोणकोणत्या प्रदेशात कोणाकोणाला प्रचारार्थ पाठविण्यात आले होते, त्याची सविस्तर यादी 'माहवंस' या ग्रंथात दिलेली आहे. अशोकाचा गुरू मोग्गलीपुत्त तिष्य याच्या आग्रहावरून राजपुत्र महेंद्र व राजकन्या संघमित्रा या दोघानांही बौध्द धर्माची दीक्षा देण्यात येवून सिलोनमध्ये धर्मप्रचारार्थ पाठविण्यात आले. महाराष्ट्रात महाधर्मरक्षिताला व अपरांतक देशात युनानी भिखू धम्मरखिताला पाठविण्यात आले.[46] धर्माची पवित्रता राखण्यासाठी एकंदर लोकांच्या धर्मचरणावर देखरेख करण्यासाठी व धर्मशिक्षणाचा प्रचार करण्यासाठी ''धर्म महामात्र'' नावाचे अधिकारी अशोकाने नियुक्त केले होते. सम्राट अशोकानंतर कुशानवंशीय कनिष्काने बौद्ध धर्माचा स्वीकार करून बौद्ध धर्माला राजाश्रय मिळवून दिला. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी तो प्रयत्नशील राहिला. अशोकानंतरच्या कालखंडात धर्मप्रचार होत असतांना, जे मतभेद व पंथभेद निर्माण होत गेले, त्याचा समन्वय करण्यासाठी एका मोठया धर्मसभेची आवश्यकता कनिष्काच्या काळात निर्माण झाली. कनिष्काने भरविलेल्या धर्मसभेची नक्की स्थान कोणते? याबद्धल मतभेद आहेत. या बाबतीत एक मत असे की, जालधंर जवळील 'कुवन' येथील बौद्ध विहारात ही सभा झाली. तर दुसरे मत असे की, काश्मिरमध्ये 'कुंडलवन विहारात' ती सभा झाली. कनिष्काचे गुरू पार्श्विक यांनी त्यांच्या आदेशानुसार वसुमित्राच्या अध्यक्षतेखाली सुत्त, विनय व अभिधम्म या तीन प्रमाणभूत ग्रंथावर एक–एक लक्ष श्लोकात्मक भाष्य ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ झाला. या भाष्यग्रंथाना उपदेश, विनय विभाशा व अभिधम्म विभाशा अशी नावे आहेत. संघटनेच्या या प्रयत्नातून महायान व हिनयान हे दोन प्रमुख संप्रदाय उदयास आले. गौत्तम बुद्धाच्या जुन्या स्मारकांचा उद्धार करण्यासाठी कनिष्काने बुद्धाच्या रक्षाकरंडकावर प्रचंड स्तूप

---

46. भदन्त तिस्सवंस (अनुवादक) विनयपिटक, प्रथमावृत्ती, सुगत प्रकाशन, नागपूर, 2006, पृ.क्र. 63.

उभारण्याचे कार्य केले. परदेशात बौद्ध धर्माचा अधिकाधिक प्रसार करणे, श्रुतीस्मृती पुराणोक्त धर्माशी समन्वय साधणे, असे द्विविध स्वरूपाचे कार्य कनिष्काने केले. या प्रयत्नातून बुद्धकालीन धर्माची मूळ स्वरूप व त्या धर्मातील मूळ धारणा यामध्ये फार मोठे परिवर्तन झाले. हा परिवर्तीत बौद्ध धर्म म्हणजे 'महायान' पंथ.[47] मौर्य कालखंडापासून (सम्राट अशोकाचा कालखंड) बौद्ध धर्माचा प्रसार दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक प्रदेशात झाले. म्हैसूर प्रांतात अशोकाचे शिलालेख याचा पुरावा देतात. याच काळात अनेकांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांच्या निवासासाठी व व्यापारी मार्गावर चैत्य, लेण्या, स्तुपाची उभारणी केली. महाधर्मरक्षिताने महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार कसा केला यासंबंधी उल्लेख 'महावंश' या बौद्ध धर्मग्रंथात आलेला आहे.[48]

महाराष्ट्रातील सर्वांत प्राचीन सात वाहन राजवंशियांनी ब्राह्मण धर्माप्रमाणे बौद्ध धर्माला राजाश्रय देण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडात महाराष्ट्र व कर्नाटक परिसरात बौद्ध धर्म स्थापत्यांची निर्मिती झाली. ''विहार – चैत्यग्रह कोरणे व त्यासाठी शिल्पसंघाला देणगी देणे हे अत्यंत पुण्यकर्म असून ते करणारा माणूस स्वर्ग लोकांत आनंदाने राहतो.'' असे अजिंठा येथील लेणी क्र. 26 च्या लेखात म्हटले आहे.[49] सातवाहन राजा कृष्ण हा वैदिक धर्माचा अनुयायी असला, तरी त्याच्या महामात्राने बौद्ध भिक्खू करिता एक लेणे कोरविले होते. गौत्तमी बलश्री वैदिक परंपरेचे आचरण करीत असले तरीही बौद्ध धर्मावर तिची निष्ठा होती. तिने आपला पुत्र 'सातकर्णी' याला सांगून नाशिकच्या भिक्खूना

---

47. वर्णेकर श्री.भा., भारतीय धर्म व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, 1975, पृ.क्र. 198

48. महारट्ठं इसी गन्त्वा सो महाधम्मरक्खितो।
महानारदकस्सपाव्हं जातकं कथयी तहिं ।।
मग्गफलं पापुणिंसु चतुरासीति सहस्सक ।।
तेरंस तु सहस्सावि पब्बतिंसु तसान्तिकें ।।
– तो महात्मा महाधर्मरक्षित महाराष्ट्रात गेला व तेथे त्याने महानारदकस्सप नामक जातकाची कथा सांगितली तेव्हा चौऱ्याऐंशी हजार लोक बौध्द मार्गाचे फलप्राप्त करते झाले आणि तेरा हजार लोकांना त्याने भिक्षु केले.

49. Mirashi V.V., The History of Inspriation of Satvans, 1st Edition, Maharashtra State, Board of Literature & Cultural, Bombay, 1981, Page No. 205

ग्रामदान करविले होते व त्यांच्यासाठी एकविशाल लेण्याची निर्मिती केली. याच काळातील तेर हेही एक बौद्ध धर्माचे दक्षिणेतील केंद्र होते.[50]

सातवाहनांच्या नंतर गुप्त समकालीन वाकाटकांची सत्ता महाराष्ट्रात सुरू झाली. अजिंठयाच्या एका लेखात विंध्यसेन द्वितीय याने कुंतल देशापर्यंत वर्चस्व प्रस्थापित केले. वाकाटकांच्या मांडलीकाने व अमात्यांनी अजिंठा, घटोत्कच व गुलवाडा येथील टेकडयांवर बौद्ध धर्माशी संबंधित चैत्य व विहारांची निर्मिती केली वाकाटकांचा मूळ पुरूष गृहपती वाकाटक हा बौद्ध मतानुयायी होता. याच काळात महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रदेशात बऱ्याच पैकी बौद्ध धर्माचा प्रसार झाला.[51] वाकाटकानंतर दख्खनच्या पठारावर उदयास आलेल्या बदामी उर्फ वातापी चालुक्य व राष्ट्रकुट या राज्यकालखंडात मात्र बौद्ध धर्माला मात्र उतरती कळा लाभली. या काळातील राज्यकर्त्यांचा व सर्वसामान्य प्रजेचे प्रमुख दोन धर्म होते. पहिला हिंदू व दुसरा जैन धर्म. बदामी चालुक्यानी काही बौद्ध भिक्खुंना राजाश्रय दिलेला होता. राष्ट्रकुटांची उपराजधानी कंधार हे बौद्ध धर्माचे प्रसिद्ध केंद्र होते. आजही अनेक बौद्ध मूर्ती तेथे आढळून येतात. या परिसरात आठव्या शतकात बौद्ध महायान पंथाचे वर्चस्व होते.[52] नवव्या शतकातील कोकणातील शिलहार राजवंशाच्या सामतांनी इ.स. 877 साली राज्यात अनेक बौद्ध विहारांची निर्मिती केली. बौद्ध विहाराच्या चैत्य व स्तुपाच्या पुजेअर्चेसाठी भूमिदान दिले जात होते.[53] उत्तर चालुक्य काळात शैव पंथ व जैन धर्मापुढे बौद्ध धर्माचा टिकाव लागू शकला नाही. मुळात दक्षिण भारताच्या तुलनेने प्राचीन काळापासून बौद्ध धर्म उत्तर भारतात अधिक लोकप्रिय होता.

---

50. देव शां.भा., तेर–पुरातत्त्व शोध निबंध माला भाग 1, संचालक पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, मुंबई पृ.क्र. 4–5.
51. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, दुसरी आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2004, पृ.क्र. 385
52. रायरीकर कल्पना, भालेराव मंजिरी, महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार, शिलालेख आणि ताम्रपट, प्रथमावृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, डिसेंबर 2009, पृ.क्र.98
53. नीलकंठशास्त्री के.ए., दक्षिण भारत का इतिहास, नववी आवृत्ती, विहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटना, नोव्हेंबर 2006, पृ.क्र. 477

## बौद्ध धर्म पंथात झालेला पूर्वमध्ययुगीन बदल

भगवान गौत्तम बुद्धाच्या निर्वाणापासून ते दहाव्या शतकापर्यंत बौद्ध धर्मात हिनयान व महायान या प्रमुख दोन पंथांशिवाय अनेक उपपंथ निर्माण झाले. पुढे या पंथावर इतर धर्म पंथांचा प्रभाव पडून हिंदू धर्माशी साम्य दाखविणारे अनेक पंथ उदयास आले. ही प्रक्रिया दीर्घ काळापर्यंत चालूच राहिली. समन्वयाच्या भावनेतूनही बौद्ध पंथात बरेच परिवर्तन घडून आले. हिनयान व महायान या प्रमुख पंथातून मंत्र जपाला महत्त्व देणारे अनेक तांत्रिक संप्रदाय निर्माण झाले.[54] या धर्मातील हिनयान या प्रमुख पंथापेक्षा महायान हा पंथ तांत्रिक कर्मकांडाचा अधिक स्वीकार केलेला दिसतो. महायान पंथात तात्त्विक व आचरणविषयक मतभेद निर्माण होऊन मंत्रयान, वज्रयान असे काही उपपंथ निर्माण झाले. महायान अनुयायांमधील बुद्धवचने पाठ करण्यास सोपी जावीत म्हणून छोटया स्तोत्रांचे रूप मिळाले. या स्तोत्रातून सुत्रे निघाली व सुत्रांचे मंत्र तयार झाले या अल्पाक्षरी मंत्राच्या जपाने अलौकीक सिद्धी मिळतात, अशी धारणा वाढली. इ.स.च्या पाचव्या शतकात मंत्रयान या शाखेचा उदय झाला. या पंथाचा आधारभूत ग्रंथ म्हणजे 'मंजुश्रीकल्प' हा होय. या मंत्रयानाचीच परिणती पुढे वज्रयान या पंथात झाली. याबद्धल अशी कथा सांगितली जाते की, बुद्धाच्या निर्वाणानंतर सुमारे शंभर वर्षानंतर प्रसिद्ध भिक्खू तुषित स्वर्गात गेला व तेथे त्याला मैत्रेयाने तंत्राच्या गुप्त तत्त्वज्ञानाची दीक्षा दिली. या तत्त्वज्ञानाचे कलम इ.स.च्या सहाव्या शतकात महायान पंथावर होऊन त्यातून तांत्रिक 'वज्रयानाचा' उगम झाला. महाराष्ट्रात या पंथाचा प्रसार महासिद्ध सराह याने केले.[55] शब्दरूप मंत्रात जारण, मारण, वशीकरण, उच्चाटन इत्यादीची शक्ती असते. बुद्धाच्या वेळीही ही 'गांधरी विद्या' एका विशिष्ट समाजात प्रचलित होती. या मिथ्याजीवी विद्येकडे

---

54. मंत्रयान, निर्वाण स्वरूपी 'निरात्मादेवी' च्या अलिंगणाचे महत्त्व सांगणारा 'वज्रयान' कालचक्रातून सुटका करण्यासाठी भूतप्रेतांची पुजा–अर्चा सांगणारा 'कालचक्रयान' (संस्थापक विभूतीचंद्र), ऐहिक उत्कर्षासाठी योगसिध्दीचे महत्व प्रतिपादन करणारा 'नाथपंथ' (संस्थापक – आदिनाथ, मच्छिंद्रनाथ), विषय सुखाचा उपभोग हा निर्वाण प्राप्तीचा सुलभ उपाय असे प्रतिपादन करणारा 'सहजियपंथ' (संस्थापक– कृष्णाचार्य उर्फ कान्हू, नववे शतक) या व्यतिरिक्त 'धर्ममंगल' व 'तंत्रमार्ग' यासारखे अनेक मार्ग पंथोपंथ लिहून त्यांचा प्रसार वाढल्यामुळे भगवान गौत्तम बुध्दाचा मूळ संदेश यामध्ये लुप्तप्राय झाला असे मत श्री.भा.वर्णेकरांनी ''भारतीय धर्म व तत्त्वज्ञान'' या ग्रंथात पृ.क्रं. 203 वर नमुद केले आहे.

55. मेश्राम प्रदिप, गणवीर श्रीकांत, संशोधन मुद्रा, प्रथमावृत्ती, कैलाश प्रकाशन औरंगाबाद, जुलै 2009, पृ.क्र. 261

न वळण्याचा बुद्धाचा आदेश नंतर कोणी मानला नाही. बुद्धाच्या मानवी सद्गुणांऐवजी त्याचे दैवी सद्गुण पुजेसाठी योग्य ठरले. सर्वशक्तीमान अशा अवतारी बुद्धाचे जपजाप्य सुरू झाले. या काल्पनिक बुद्धाच्या नावे भूते–खेते पळवून लावण्यासाठी मंत्र–तंत्र तयार झाले. जपाला सोईचे असणाऱ्या मंत्राचा सिद्धीसाठी वापर सुरू झाला.[56] यासाठी धन व परिश्रम आवश्यक बनले. यातून नवनवीन देवतांची निर्मिती झाली. आपल्या भौतिक मनोकामना पूर्ण करण्यासाठी लोकस्वाभाविकपणे या प्रार्थनाचा व मंत्र जपांचा उपयोग करू लागले. मंत्रयानी अनुयायांनी धनसंपत्तीच्या उपभोगाच्या विविध कल्पना निर्माण केल्या. स्त्री पूजा सुरू झाले. मंत्र, हट्टयोग व मैथून यांना क्रमाने स्थान मिळत जावून मैथून प्रभावी असा 'वज्रयान' नावाचा एक पंथ इ.स. आठशे ते बाराशे या उत्तरचालुक्य काळापर्यंत भरभराटीस आला. उत्तर चालुक्यांच्या राज्याजवळ असणाऱ्या श्रीशैल्य पर्वताच्या आश्रयाने या पंथाची वाढ झाली. या वज्रयानातूनच प्रसिद्ध चौऱ्याऐंशी सिध्द जन्मास आले. सरहपा या आदिसिद्धाने लोकभाषेत अद्भूत कविता रचल्या. याचाच प्रभावाने गुप्तपणे आचरली जाणारी वज्रयानी साधना सार्वजनिक बनली. वैदिक परंपरेत एक अमोघशास्त्र म्हणून वज्राला महत्त्व होते; पण या परंपरेत त्याचा शून्यतेचे एक प्रतीक म्हणून स्वीकार झाला. वस्तूजाताचे उमगस्थान शून्य असून ते वज्राप्रमाणे अभेद्य व अविनाशी अशी कल्पना वज्रयानी पंथात तथागत बुद्धापेक्षा वज्रधर बुद्ध श्रेष्ठ मानला गेला. आणि यातूनच स्थूल मानवी विकाराच्या स्तरावर पंथ वाढीस लागला. 'गुहयसमाजतंत्रात' वज्रयानी पंथाचे आचार व तत्त्वज्ञान सांगितले आहे. विविध सिद्धांची चर्चा आहे. शक्तीतत्त्वास प्राधान्य आहे. बोद्धीसत्त्वही शिवा प्रमाणे शक्तीसहीत निर्माण झाला. वज्रयानी शून्यतेचा उपासक असल्याने तो विधीनिषेधांच्या पलिकडचा आहे.[57]

वज्रयानाप्रमाणे बौद्ध धर्माशी संबंधित परिवर्तीत विचारप्रवाह 'सहजयानी मार्ग' या नावाने ओळखला जातो. वज्रयानी बौद्ध व शैव पंथ यांच्या मिश्रणातून अथवा शुद्धीकरणाच्या प्रवृत्तीतून, 'सहजयाना'ची संकल्पना बाहेर पडली असावी. या पंथाचा बहुतांश कल बौद्ध धर्माकडे आहे. अलिकडे ज्ञानेश्वरांचा 'नाथपंथ' या सहजयानी

56. बौद्ध मंत्र – 'ओम् मुने मुने महामुने स्वाहा' 'ओम् आंहूः ओम् तारे तुत्तारे तुरे स्वाहा'

57. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, दुसरी आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2004, पृ.क्र. 89

संपर्कातून उदयास आला अथवा ज्ञानेश्वरावर सहजयानी प्रभाव असावा असा तर्क केला जातो. वज्रयानातील वज्रसंज्ञा अच्छेद्य, अभेद्य, अविनाशी या अर्थी दृढ करण्यासाठी तिला सरहपा, कण्हपा, इंद्रभुती इत्यादी बौद्ध सिद्धांनी 'सहज' असे नाव दिले. 'सहज' शब्दाचा व्युत्पतीजनक अर्थ जन्माबरोबरच उत्पन्न होणारा, नैसर्गिक स्वरूपाचा असा आहे. वास्तविक पाहता सहजची व्याख्या देणेही अवघड आहे. जे स्वसंवेद्य, आपोआप जाणले जाणारे आहे. त्याचे वर्णन कसे करता येणार? शून्यता, करूणा, प्रज्ञा, उपाय इत्यादी धारणेतून 'सहज' तत्त्व विकसीत झाले. या पंथाचा प्रसार उत्तर भारतातील बंगाल, बिहार, ओरिसा या प्रांतात झालेला असला, तरी आंध्रप्रदेशाच्या पश्चिम भागातही या पंथाचे अनुयायी दिसतात. दिव्य देहधारणेसाठी कायाविध व शरीरधर्म खुला होण्यासाठी धनप्राप्त्यार्थ लोहवेध म्हणजे सूवर्ण मिळविण्याची किमया यांना प्राधान्य मिळवून यांच्या प्राप्तीसाठी श्री पर्वत, नागार्जुन कोंडा इत्यादी आंध्रप्रदेशातील सिद्धांच्या प्रयत्नातूनच सहजयान पंथ निर्माण झाला असावा.[58]

इ.स. 769 ते 809 इ.स.पर्यंतच्या काळातील 'सरहपाद' हे पहिले सहजयानी सिद्ध मानले जातात. या मेघावी योगी, सिद्ध पुरूषाने प्रथमच लोकवाणीत परमपदास 'निरंजन शुन्य' असे म्हटले आहे. कबीरांचा 'राम' निरंजनच आहे. या निरंजन पदाची महती नाथ पंथातही विशेष प्रकारची आहे. निरंजन म्हणजे निर्वीकल्प, सोज्वळ, निष्कलंक असे प्रकाशरूप, ईश्वरावतार 'अंजन' म्हणजे शबल होय. परंतु परमात्मतत्त्व, तेवढे निरंजन या निरंजन पदाची प्राप्ती करून घेण्यासाठी चित्तवृत्तींना त्यांच्या मर्जीवर सोडूनच शांत व समाहित अशी सहजावस्था प्राप्त होईल असेच सरहपाद सांगतात.

कल्याणी चालुक्य कालखंडात बौद्ध धर्म पंथ काही प्रमाणात टिकून होते. ते वरील प्रमाणे परावर्तीत अवस्थेत होते. कान्हेरी व कांम्पिल (जिल्हा उस्मानाबाद?) हे यावेळची बौद्ध केंद्रे होती.[59] या शिवाय कल्याणी चालुक्य कालखंडात सोलापूर व कोल्हापूर जिल्हयात बौद्ध धर्माचे अस्तित्त्व होते. शिलाहार राजा गंण्डरादित्यच्या काळात शके 1033 च्या ताळते ताम्रपटानुसार गण्डरादित्याने बौद्ध चैत्य बांधून पुजेसाठी देणग्या

58. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, दुसरी आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2004, पृ.क्र. 91

59. Altekar A.S., Rashtrakut & Their Times, 1st Edition, Oriental Book Agency, Pune, 1934, Page No. 309

दिल्याचा उल्लेख यात येतो.[60] बौद्ध धर्मातील हिनयान व महायान या प्राचीन पंथांचे रूपांतर पूर्व मध्ययुगात इ.स. 600 ते इ.स. 1000 या दरम्यान वज्रयान व सहजयान या पंथात झाले. पुढे यात मोठे परिवर्तन घडून आले. तंत्र मार्गाचा स्वीकार यात करण्यात आला. सहजयानावरती शैव पंथाचा प्रभाव पडून सिद्ध मार्ग विचारप्रवाहाची निर्मिती झाली. यातूनच नाथ पंथाचा पाया दक्षिणेत रचला गेला.

## हिंदू धर्म

उत्तर चालुक्य कालखंडात सर्वांत लोकप्रिय धर्म म्हणजे हिंदू धर्म. दहाव्या बाराव्या शतकापर्यंत या धर्मात शैव, वैष्णव, तांत्रिक या प्रमुख पंथाशिवाय त्यांचे अनेक उपपंथ निर्माण झालेले होते. आपल्या संशोधन विषयाशी संबंधित कालखंडातील काही हिंदू धर्मातील पंथाची थोडक्यात ओळख पुढीलप्रमाणे करून घेवू.

### वैष्णव संप्रदाय

हिंदू धर्मातील प्रमुख दोन पंथांपैकी वैष्णव हा एक पंथ भगवान विष्णू आणि त्यांच्या परिवारातील देवी देवतांना मानणारा हिंदू धर्मातील एक सामाजिक घटक विष्णू अनुयायी, वैष्णव संप्रदायी म्हणून प्राचीन काळापासून ओळखले जात. उत्तर चालुक्य राज्यात शैवांप्रमाणे वैष्णवांचीही संख्या बऱ्याच प्रमाणात होती. ऋग्वेदातील सूर्य, भग, सविता या नावाने ओळखले जाणारे देवता 'विष्णू' या नावाने नावारूपास आले व ते लोकप्रिय झाले. उत्तर चालुक्य समकालीन काही वैष्णव संप्रदाय पुढीलप्रमाणे,

### समकालीन काही संबंधित वैष्णव पंथ–उपपंथ

### आळवार वैष्णव पंथ

तामिळनाडूमध्ये वैष्णव समाजात आळवार नामक संताना पुज्य मानतात. आळवार वैष्णव पंथाचे तत्त्वज्ञान आळवार संतांच्या साहित्यात दिसून येते. आळवार शब्दाचा अर्थ 'परमेश्वराच्या भक्तीत निमग्न असणारा भक्त' असा आहे. मध्ययुगीन कालखडांत गोडगई, भूतत्तारपेई, तिरूमलीसै, नम्म, माधुरकवी, कुलषेखर, अंडाळ, पेरी, तोंडरडीप्पोडी, तिरूप्पाव आणि तिरूमगई या नावांचे बारा अळवार संत तमिळ प्रदेशात होऊन गेले. त्यांच्या काळ

60. मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, प्रथमावृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1974, पृ.क्र. 256

इ.स. पूर्व चाळीसाव्या शतकापासून ते अठ्ठाविसाव्या शतकापर्यंत मानला जातो. हा कालावधी अतिशोक्ती वाटते. इतिहासकार इ.सनाच्या चौथ्या शतकापासून ते आठव्या शतकापर्यंतचा काळ 'अलवार' संतांचा मानतात. या अळवारपैकी 'अंडाळ' ही स्त्री असून काहीजन शुद्रादी जातीतील आहेत. 'प्रबन्धम्' नामक तमिळग्रंथात या बाराही अळवारांच्या भावपूर्ण व विचार परिप्लुत गीतांचा संग्रह करण्यात आला आहे. तामिळनाडूतील वैष्णव संप्रदायामध्ये या प्रबन्धम् ग्रंथाची योग्यता भगवद्गीतेइतकी श्रेष्ठ मानण्यात येते. आळवारांच्या विचारप्रणालीत जातिभेद किंवा वर्णभेद यांना स्थान नाही.[61] दक्षिण भारतातील वैष्णव संप्रदायाचा प्रसार करणारा व वैष्णव पंथ दक्षिणेत प्रथम रूजविणारा अलवारांचा विचार प्रवाह नंतरच्या वैष्णव पंथाचा उदगाता ठरतो.

## निंबार्क व त्यांचा पंथ

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धांत कर्नाटकातील 'बेल्लारी' जिल्हयातील 'निंब' गावात 'जगन्नाथ' आणि 'सरस्वती' या तेलगू दांपत्यांच्या पोटी वैशाख शुद्ध तृतीयेस निंबार्काचा जन्म झाला. संप्रदायाचे अनुयायी यांना विष्णूच्या सुदर्शन चक्राचा अवतार मानतात. वेदान्त पारिजात सौरभम् (ब्रह्मसुत्रावरील भाष्य), दशश्लोकी, निंबार्कतत्त्व प्रकाशकः श्रृत्यन्तसुरद्रमुः श्रुत्यन्तकल्पवल्ली, श्रुतिसिद्धान्तमंजीरी, मध्यमुखमर्दनम्, वेदान्ततत्त्वबोधः व वेदान्तसिद्धान्तप्रदीप हे निंबार्कचार्याचे ग्रंथ आहेत. आपल्या ग्रंथातून आपला भेदाभेद सिद्धांत किंवा द्वैताद्वैतसिद्धांत निंबकाचार्यानी प्रतिपादन केला आहे. या सिद्धांतानुसार जगत, जीव, ईश्वर हे एकमेकापासून भिन्न व अभिन्नही आहेत. जीव आणि जगत यांना ईश्वरापासून स्वतंत्र अस्तित्त्व नसल्यामुळे हे तिन्हीही तत्त्वे अभिन्न आहेत. दशलोकी किंवा सिद्धांतरत्न या ग्रंथात निंबर्काचार्यांनी प्रतिपादनाचे सार समाविष्ट झाले आहे. या प्रतिपादनाच्या मुळाशी रामानुजांचे सिद्धांत असून त्यात थोडाफार फरक आढळतो. उदा. रामानुजाचार्यांनी नारायण व त्याच्या लक्ष्मी, भूमी आणि लीला या तीन स्त्रिया मानल्या. तर निंबार्काचार्याने कृष्ण, राधा व इतर गोपींना महत्त्व दिले आहे. निंबार्काच्या संप्रदायाला

61. वर्णेकर श्री.भा., भारतीय धर्म व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, 1975, पृ.क्र. 277

'सनक' संप्रदाय हे नाव पडण्याचे कारण या संप्रदायात सनक नावाचा थोर संत निंबार्कानंतर होऊन गेला. त्याचे नाव संप्रदायास पुढे प्राप्त झाले.[62]

## मध्वाचार्यांचा ब्रह्मसंप्रदाय

तेराव्या शतकातील दक्षिण भारतातील आणखी एक वैष्णव आचार्य व त्यांचा तात्त्विक विचार प्रवाह म्हणजे मध्वाचार्यांचा 'ब्रह्मसंप्रदाय' दक्षिणेतील उडूपी जवळ एक वासुदेवाचा अवतार प्रकट झाला. वैष्णव धर्माच्या प्रसारासाठी उडूपीच्या उच्युतप्रेक्ष नावाच्या यतीकडून त्यांनी संन्यासदिक्षा घेतली. यांचे या आश्रमातील नाव पूर्णप्रज्ञतीर्थ असून एक कट्टर द्वैती म्हणून त्यांचा लौकीक आहे. दक्षिण भारताची यात्रा केल्यानंतर यांनी आपल्या द्वैतीमताला अनुसरून गीतेवर भाष्य लिहिले. उत्तर भारताची यात्रा करून त्यांनी अनेक शिष्य मिळविले. हिमालयात व्यासाश्रमात प्रेरणा झाल्यावरून प्रवासातच यांनी ब्रह्मसुत्रावरील आपले भाष्य सिद्ध केले. यांनी अनेक नैयायिक मीमांसक, वेदांती बौद्ध पंडितांशी वादविवाद करून आपल्या द्वैतीमताचा प्रसार केला.

मध्वाचार्याच्या मते विष्णू हे सौर्वाच्च तत्त्व असून उत्पत्ती, स्थिती, संहार, नियमन, ज्ञान, आवरण, बंध व मोक्ष या आठांचा कर्ता विष्णूच आहे. भगवतांची कोणतीही कल्पना मिथ्या नसल्यामुळे त्यांनी जगत् ही सत्यास मानले. ईश्वराचा जीवाशी भेद, ईश्वराचा जडाशी भेद, जीवाचा जडाशी भेद एक जडाचा दुसऱ्या जीवाशी भेद व एका जड पदार्थाचा दुसऱ्या जड पदार्थांशी भेद असे पाच भेद ते मानतात. या भेदाच्या ज्ञानालाच त्यांनी मुक्तीचे साधन मानले आहे. जीव स्वभावतःच अल्पज्ञ व अल्पशक्तीचे असल्याने भगवतांखेरीज कोणतेच कार्य त्यांना करता येणार नाही. जीवांचेही त्यांनी मुक्तीयोग, निंत्यसंसारी, तमोयोग्य असे तीन भेद मानले आहे. यातील पहिल्याच प्रकारच्या जीवांना मुक्ती मिळते. परमानंद स्वरूप अशी मुक्ती म्हणजे वास्तव सुखाची अनुभूती होय. मलरहित निर्दोष भक्तीमुळे मुक्ती मिळते. अहेतुकी अथवा अन्यन्य भक्ती हे सर्वोत्तम रूप त्यांनी मानले. शास्त्राभ्यास व ध्यान धारणा यांनाही या संप्रदायात महत्व आहे. यातील अनुयायी

---

62. वर्णेकर श्री.भा., भारतीय धर्म व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, 1975, पृ.क्र. 288

कपाळावर गोपीचंदनाच्या दोन रेषा ओढतात. मध्ये गंध भस्माची एक काळी रेषा व त्यावर हळदीचा पिवळा ठिपका लावलेला असतो.[63]

## विष्णूस्वामी संप्रदाय

काळ आणि चरित्र यांची काहीच माहिती नसलेल्या विष्णूस्वामींवर बाळकृष्णाने एकच कृपा केली. वेणूवादन करीत असतानांच कृष्णाने त्यांना दर्शन दिल्याचे त्यांच्या अनुयायांचे मत आहे. मुक्तीपेक्षा भक्तीला श्रेष्ठ मानणाऱ्या या पंथाने वल्लभाचार्याच्या पुष्टीमताशी नाते असावे यांच्या मते ईश्वर हा सच्चिदानंदरूप असून तो आपल्या तहादिनीसंवत्ने आलिंगीत आहे. विष्णूस्वामींचा 'सर्वज्ञसूक्त' नावाचा ग्रंथ असून त्यात त्यांची मते व्यक्त झाली आहेत. माया ही ईश्वराधीन असून ईश्वर सत्, चित्त, नित्यपूर्णानंदमय, विग्रहधारी नृसिंह आहे. नृसिंह रूपी विष्णूचे उपासना या संप्रदायात असावी या पंथात ईश्वर व जीव भिन्न असल्याने हाही एक द्वैती संप्रदायच होय. 'श्रीधरटिका' म्हणून प्रसिध्द असलेल्या भागवतटिकेचे कर्ते श्रीधरस्वामी या संप्रदायाचे होते[64]

## पूर्वकालीन वारकरी संप्रदाय

'वारकरी' या शब्दाचा संप्रदायानुसार अर्थ वर्षातून आशाढी व कार्तिकी एकादशीला पंढरपूरची (वारी) यात्रा करणारा असा आहे. वारकरी संप्रदायात कृष्णभक्तीला विशेष महत्त्व असल्यामुळे श्रीकृष्णाला प्रिय असणाऱ्या तुळशीची माळा संप्रदायाची दीक्षा घेणाऱ्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. ही तुळशीमाळा धारण केल्यामुळे या पंथाला 'माळकरी' पंथ असेही म्हणतात.

या पंथाने तत्त्वज्ञानात अद्वैत मताचा पुरस्कार केलेला आहे. पांडूरंगस्वरूपी किंवा विठ्ठलस्वरूपी भगवान श्रीकृष्ण हे या संप्रदायाचे मुख्य उपास्य दैवत असल्याने विष्णूचा पूर्णावतार म्हणून श्रीकृष्णाचे चरित्र वर्णन करणारे 'श्रीमद्भागवत' हा या संप्रदायाचा परमग्रंथ आहे. वारकरी संप्रदायाचा उदय तेराव्या शतकात जन्मास आलेल्या

---

63. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, दुसरी आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2004, पृ.क्र.70
64. जोशी प्र.न., उक्त, पृ.क्र. 70.

श्रीज्ञानेश्वरांच्या आधीच म्हणजे निदान पंढरपुरास भक्त पुंडलीकाने पांडूरंगाची प्राणप्रतिष्ठा केली. तेव्हापासून झाला असला तरी सामान्यपणे श्रीज्ञानेश्वर हेच वारकरी संप्रदायाचे प्रमुख प्रवर्तक मानले जातात. वारकऱ्यांचे भक्तीस्थान पंढरपूर हे कल्याणी चालुक्यांच्या राज्यातील गाव कलचुरी कालखंडात वारकरी संप्रदायाचा उदय घडून आला असावा.[65] ज्ञानेश्वरांचे आजोबा बाराव्या शतकात पंढरपूरची वारी करीत असल्याचा उल्लेख सोलापूरच्या सिद्धरामेश्वर मंदिरात दिसतो. यावरून हे सिद्ध होते की, वीरशैव, नाथ संप्रदायाचा विकास काळ हाच महाराष्ट्रातील वारकरी चळवळीचा उदय काळ होता.

## शैव संप्रदाय

प्राचीन भारतीय पंथांपैकी एक प्रमुख पंथ म्हणून शैव पंथाकडे पाहिले जाते. या पंथाबद्दलचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

## शैव पंथाच्या प्राचीन खुणा

शैव पंथाच्या उदयासंबंधी मतमतांतरे दिसून येतात. मात्र एवढे नक्की की, इतिहासपूर्व हडप्पा संस्कृतीमध्ये शिवपूजेचे अवशेष अथवा खुणा प्राच्यविद्या विशारदांना आढळून आल्या आहेत.[66] मोहेजोदडो, हडप्पा व मेहरगढ येथे शिवाच्या मूर्ती, स्त्रीदेवता मूर्ती, छोटे शिवलींग, नंदी, त्रिशूल, सप्र, स्वास्तिक या सारख्या शैवपंथीय वस्तू आढळून आल्या.[67]

आधुनिक पाकिस्तानातील 'मेहरगढ' येथे पुरातत्त्व खात्यामार्फत केलेल्या उत्खननात देखील ज्या अनेक वस्तू सापडल्या त्यामध्ये स्वास्तिकाचेही प्रतिके होती.[68] पुर्नःउत्खनातही शिव संस्कृतीचे कांही अवशेष सापडले.[69] या शिवाय योगस्थ शिवाची मूर्तीही मिळाली.[70] प्रा.वसंत दिनानाथ राव म्हणतात, हडप्पा उत्खननातील दुसरा पुतळा

---

65. वर्णेकर श्री.भा., भारतीय धर्म व तत्त्वज्ञान, प्रथम आवृत्ती, श्रीलेखन वाचन भांडार, पुणे, 1975, पृ.क्र. 299.
66. वाडेकर देविदास दत्तात्रय (संपादक), मराठी तत्त्वज्ञान महाकोश, प्रथम आवृत्ती, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1974, पृ.क्र. 390.
67. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, प्रथम आवृत्ती, भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपुर, 2001, पृ.क्र. 43.
68. संपादक मंडळ, 2001, उक्त, पृ.क्र. 47.
69. संपादक मंडळ, 2001, उक्त, पृ.क्र. 05.
70. दिनकर रामधारीसिंह, संस्कृतीके चार अध्याय, चतुर्थ संस्करण, उदयांचल, पटणा, डिसेंबर 1960,पृ.क्र. 70.

असलेल्या नर्तकाची मूर्ती म्हणजे नटराज शिवमूर्ती होय. तेथील शिक्क्यावर सष्तंग व पदमानस्थ मूर्ती शिवाचीच असावी वल्कले नेसलेल्या पुरूषाच्या हातात धनुष्यबाण घेतलेली मूर्ती म्हणजे किरातरूपी शिवध्यान रूप असावे. नग्न प्रतिमा या शिवदेवतेच्या जनन क्रियेशी साहचार्य दाखविणारा म्हणता येईल. नग्न स्त्रीमूर्ती आणि पशुपती या वरून शिवशक्ती पूजा त्याकाळी प्रचलीत असणे संभवनीय आहे. त्रिमुख, महायोगी व पशुपती या तिनही प्रतिमांवरून शिवपूजेचे प्राबल्य त्याकाळी आढळते.[71] तत्त्कालीन भारतीय पुरातत्त्व खात्याचे जॉन मार्शल यांनीही उत्खननातील अवशेष शैव संप्रदायांशी संबंधित असल्याचे म्हटले आहे.[72] एकदंर पाहता शैव पंथाचा इतिहास प्राचीन असल्याचे दिसते. इ.स. पूर्व तीन हजार वर्षापूर्वीच्या अवशेषांमध्येही शैवांशी संबंधित धार्मिक अवशेष सापडतात.[73]

## शिव म्हणजे काय?

शिव देवतेला 'द्रविडीयन दैवत' म्हटले जाते. शिवाशी संबंधित आर्य आणि द्रविडीयन नावाची तुलना केली तर आर्य पेक्षा द्रविडीयन भाषेचा प्रभाव अधिक दिसून येतो. याला अधिक आधार शिवाला तमिळ भाषेत 'सिवन्' असे म्हटले जाते. ज्याचा अर्थ 'लाल' अथवा 'रक्तवर्ण' असा होतो.[74] शिवाची उत्पत्ती हरीच्या ललाटापासून झाली आहे. वाजसनेयी संहितेत शतरूद्रीयातच 'शिव' हा मुख्य देव म्हणून सांगितला आहे. (वाज. सं. 16.1–66ः तैसि. 4.5.1–11) येथे रूद्र आणि शिव एक असून त्याचे स्वरूप रानात भटकणाऱ्या एखाद्या तपसव्यासारखे आहे.[75] भारतातील शैवपंथ वैदिक धर्मातुनच उदय

---

71. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्म पंथ, इतिहास व तत्वज्ञान, प्रथम आवृत्ती, नटराज प्रकाशन, नागपुर, एप्रिल 1976, पृ.क्र. 33.
72. Among the many revelations that mahenjo-daro & Harappa have had in store for us, none perhaps is more remarkable than this discovery that saivaism has a History going back to the chalcolithic age or pec hapes even further still, and that it takes this place as the most ancient living faith in the world. (Mahenjo-daro & the Indus civilization, preface, P-VII)
73. Padajundaram S.Shiva, the saiva school of Hindusim, first published, George Allen & unwin Ltd. London, 1934, Page No.13
74. दिनकर रामधारीसिंह, उपरोक्त, पृ.क्र. 75.
75. डांगे स.अ., हिंदू धर्म आणि तत्वज्ञान, प्रथम आवृत्ती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, 1973, पृ.क्र. 288.

पावल्यामुळे त्याचा अंतर्भाव हिंदूधर्मातच करावा लागेल. कारण रूद्रशिव ही देवता वैदिक आहे. ऋग्वेदात हया देवतेच्या सामर्थ्याबाबत अनेक उल्लेख आढळतात. उदा. ऋग्वेदाच्या सातव्या मंडलातील (मं. 7–46–3 ) 'रूद्र हा आपले तेजस्वी शस्त्र आकाशात आणि पृथ्वीवर सोडतो. तसेच त्याच्या शस्त्रांनी गाई आणि माणसे मरतात.' विशेषतः हया देवतेच्या पशुपति या नावांने जो उल्लेख वेदात आढळले तो फार महत्वाचा आहे. कारण सिंधमधील मोहोंजोदारो येथील उत्खननात पशुपति, बैल आणि लिंग यांच्या ज्या प्रतिमा सापडल्या आहेत, त्या वरून कांही संशोधकांच्या मते ही लिंगपूजा वेदकालपुर्वी अनार्यात चालू होती. ही वैदिक आर्यांनी अनार्यापासून घेतली परंतु हे मत जरा मोघम वाटते. कारण एक तर मोहोंजोदरो येथे उपलब्ध झालेल्या वस्तूंचा काल निश्चित नाही. कारण त्या प्रतिमावरील अक्षरेच अजून कोणाला पुर्णपणे वाचता आले नाहीत. ती लिपीच बरीचशी अज्ञात आहे म्हणून सिंधू संस्कृती वेदसमकालीन किंवा नंतरची देखील असू शकेल. दुसरे असे की, वेदांत आणि सूत्र ग्रंथात हया लिंगपुजेचे उल्लेख आढळतात.[76]

## शिवलिंगोपासना

शतरूद्रियात 'कंदरवासी' यास सर्व प्रथम 'शिव', 'शिवतर', 'शंकर', असे म्हटले आहे. पुढे ब्राह्मण ग्रंथात रूद्राचे स्थान याही पेक्षा अधिक उंचावलेले दिसून येते. या काळात देवतेस इतर देवतांमधून प्रथक असे स्थान प्राप्त झाले होते.[77] ब्राह्मण काळाच्या शेवटी लिंगोपासना प्रचारात आली. या मागचे कारण प्रजननाच्या गहन गुढातून लिंगोपासना प्रचारात आली. पशुपक्षी, धनधान्य, वनस्पती, यांच्या निर्मितीच्या प्रक्रियेत प्राचीन मानवाने श्रध्देतून जो कार्यकारण संबंध प्रस्थापित केला, त्यातून लिंगोपासना रूढ झाली. जगातील बहुतेक प्राचीन संस्कृतीत निर्मिती संबंधीचे गूढ न उकलल्याने निर्मितीचे एक प्रतिक म्हणून लिंगोपासना रूढ झालेली आहे.[78] लिंग उपासना ऋग्वेदात व नंतर

---

76. भुसारी रघुनाथ महारूद्र, प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास, (इ.स.पूर्व 200 ते इ.स.1350), प्रथम आवृत्ती, मराठी साहित्य प्रदेश, आधंप्रदेश, हैदराबाद, एप्रिल, 1965, पृ.क्र. 48.
77. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, अन्योक्त, पृ.क्र. 1264.
78. मंचरकर रत्नाकर बापुराव, वीरशैव संप्रदाय, प्रथम आवृत्ती, डॉ. वा.ग. कल्याणकर गौरव समिती, प्रकाशन, श्रीरामपुर, सप्टेंबर 1989, पृ.क्र. 49.

महाभारतात आढळते. तसे पाहिले तर सिंधू संस्कृतीच्या अवशेषात शंकू आकाराचे लिंगासारखे दिसणारे अवशेष उपलब्ध झालेले आहेत. ऋग्वेदात लिंगपूजकांचा धिक्कार करण्यात आला आहे. महाभारतात लिंग पूजेचा विचार स्वतंत्रपणे करण्यात आलेला आहे.[79] शिवाच्या जननेन्द्रियांची उपासना लिंगरूपात करण्याचे निर्देश महाभारतात स्पष्टपणे दिले आहे.[80] शैव दर्शनात शिव लिंग म्हणजे शिव–शिस्न मानत नाही. त्यांच्या मते लिंग हे परब्रह्माचे प्रतिक आहे. काल, स्वभाव, नियती इ. कारणांचे हे कारण आहे. (स्वेता 1–3) परब्रह्म, साहस्त्रशीर्षादिसंपन्न विश्वपुरूष व शिव हे श्वेताश्वतर व महाभारत काळात एकरूप मानले जाऊन शिवलिंगाचा माथा सहस्त्रशीर्ष, खालील बाजू सहस्त्रप्राप्त व इतर बाजू असे मानण्यात आले असावे असे सी.व्ही. नारायण अय्यर यांनी म्हटले आहे. तरी लिंगपुराण अ.17 मध्ये ब्रह्मदेव व विष्णू यांच्या मध्ये श्रेष्ठ कोण हा तंटा व पुढे युध्द सुरू झाले. तेव्हा अग्नीस्वरूप लिंग प्रकट झाले. ब्रह्मदेव व विष्णू यांना त्या लिंगाचा आदी व अंत सापडला नाही अशी कथा आहे.[81] उत्तर वैदिक काळात शिवपूजा लिंग रूपात करण्यात येवू लागली.[82] वीरशैव कवी विरूपाक्ष यांच्या 'चन्नबसव पुराणात' ब्रह्मदेवाने तप केल्यानंतर महेश्वरांने रूद्ररूप आणि महाशक्तीने महाकाली रूप धारण केले. त्यामुळे ब्रह्मदेव भितीग्रस्त झाला. त्याने केलेल्या सौम्य रूपधारणतेच्या विनंतीवरून शिवशक्तीने अर्धनारीनटेश्वराचे रूप घेवून अकरा रूद्राच्या रूपाने सृष्टी उत्पत्तीच्या कामात ब्रह्मदेवाला मदत केली. लिंग हे शिवशक्तीचे प्रतिक मानले जाते.[83] सिंधू संस्कृतीतील लोक लिंगपूजक असून लिंग, वृक्ष, नद्या यांची पूजा करीत म्हणजे ते देवांच्या मूर्तीची पूजा करीत नसून लिंग व योनीच्याच प्रतिकाची पूजा करीत असावेत. ते शाक्त पंथाच्या पूजकाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात केले जात असून पूजेनंतर विसर्जन करीत. असे प्रतिपादन हरितालिका

---

79. तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र. 17.
80. यदुवंशी, शैवमत, प्रथम आवृत्ती, बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटणा, 1955, पृ.क्र. 25.
81. तगारे ग.वा., उपरोक्त, पृ.क्र. 17.
82. यदुवंशी, उपरोक्त, पृ.क्र. 23.
83. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्म पंथ, इतिहास व तत्वज्ञान, प्रथम आवृत्ती, नटराज प्रकाशन, नागपुर, एप्रिल 1976, पृ.क्र. 37.

व्रताच्या संदर्भात प्र.रा.देशमुख करतात. लिंग पूजेच्या मुळाशी प्रजनन क्रिया असून तंत्रशास्त्रात तिचा समावेश होत असावा.

भारतात बौद्ध कालखंडापासून ते मौर्यकालखंडापर्यंत हिंदू वैदिक धर्म सूप्त अवस्थेत होता. मौर्य कालखंडापासून बौद्ध धर्माचे महत्त्व समाजात कमी झाले. व परत हिंदू धर्माचे पुनःर्जीवन घडून आले. चंद्रगुप्त मौर्यांच्या दरबारातील ग्रीक वकील मेग्यास्थेनिस याने शिवभक्तीचा व विष्णुच्या भक्तीचा उल्लेख केला आहे.[84] त्यानंतर इ.स. पूर्व दुसऱ्या शतकातील पतंजलीने आपल्या ग्रंथात शिवभागवताचा व तसेच शिवमुर्तीचाही उल्लेख केला आहे. मौर्य घराण्यातील राजा अशोक यांच्या पुत्राने शैव पंथाचा स्वीकार केला होता.[85] शिवाशी संबंधित काही पुरातत्त्वीय प्राचीन अवशेष प्राप्त झालेली आहेत. दक्षिणेतील 'गुड्डीमल्लम्' नामक स्थानी एक लिंग मूर्ती प्राप्त झाली जिचा कालखंड इ.स. पूर्व दुसरे शतक निर्धारित केले गेले आहे. **(गणपती राव 'हिंदू आइकानोग्राफी' भाग 2 पृ. क्र. 63–66)** या शिवाय 'भीता' नामक स्थळी इ.स. पूर्व पहिल्या शतकातील एक लिंग मूर्ती प्राप्त झाली. **(गणपतीराव, 'हिंदू आइकानोग्राफी', भाग 2)**[86] महाराष्ट्रातील सातवाहन राजे शिवभक्त होते. त्यांच्या घराण्यातल्या पुरूषांची नांवे स्कंद, शिव, महादेव अशी शिव नामाशी संबंधित आढळतात. आजपासून दोन हजार वर्षापूर्वी कुशानराजांनी शैव पंथ स्वीकारला एवढेच नव्हे तर त्यांच्या नाण्यांवरही शंकर प्रतिमा कोरली. मथुरेला जे संग्रहालय आहे त्यात कुशाणकालीन उमासहित, महेश्वर मूर्ती आहे.[87] शिवाय शक राजांच्या शिक्क्यावंर 'वृषभ' (जो शंकराचा वाहन आहे.) चिन्ह आहे. यावरून प्रा.रैपसन म्हणतो की, 'बौद्ध कालापासून लोक शिवदेवतेच्याच चिन्हाची पूजा करीत त्या नंतरचा पार्शियन राजा गोंडफरनसिच्या शिक्यांवर शिवमूर्ती आहे. कुशाण राजा 'वीमव्रड फाइसीस' यांने शैवधर्म स्वीकारून स्वतःच्या नाण्यावर एका बाजूला स्वतःची प्रतिमा तर दुसऱ्या

---

84. देशपांडे ना.धो.(संपादक), सुबोध व सचित्र श्री.शिवपुराण, प्रथम आवृत्ती, मे शारदा साहित्य, पुणे, पृ.क्र. 4.
85. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्म पंथ, इतिहास व तत्त्वज्ञान, प्रथम आवृत्ती, नटराज प्रकाशन, नागपुर, एप्रिल 1976, पृ.क्रं.35.
86. यदुवंशी, शैवमत, प्रथम आवृत्ती, बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटणा, 1955, पृ.क्र. 90.
87. मोगलेवार सुधाकर, उपरोक्त, पृ.क्र. 35–36.

बाजूला नंदीसहित शिव कोरलेला आहे. त्याचा उत्तराधिकारी कनिष्क यांने बौद्ध धर्म स्विकारला असला तरी शिक्क्यांवर मात्र (Oesho) 'इषो' या नावाने अंकीत चि़त्र लाहोर म्युझियम शिक्का सूचीपटात आढळते. त्याच्याच राजवंशात मायासेना (Maaceno) म्हणजे 'महेश' ही चतूर्भूज शिवमूर्ती नंदीसहित आढळते.[88]

## पूर्व मध्ययुगीन दक्षिण भारतातील शैव साहित्य

पूर्व मध्ययुगात (सामान्यतः इ.स. 7 ते 12 वे शतक) शैव संप्रदायांवर आधारित तात्त्वीक स्वरूपातील साहित्याची निर्मिती दक्षिण भारतात झाली. शैव संप्रदायाचे तत्त्वज्ञान विशिष्टाद्वैतात मोडणारे आहे. बाराव्या शतकातील हरदत्ताचार्य सामान्यतः प्राचीन शैव लेखक असावेत. 'श्रृति– सुक्ति – माला' जो 'चतुर्वेदतात्पयं' या दुसऱ्या नावानेही ओळखले जाते. या ग्रंथात शैव संप्रदायांच्या वैशिष्टयांची रूपरेषा दिसते. त्याच्या हरिहर–तारतम्य या ग्रंथात सांप्रदायिक वाद–विवादाबद्दलची चर्चा केलेली आहे. हरदत्ताचार्याच्या नंतर श्रीकांत याने 'ब्रह्ममीमांसा–भाष्य' या ग्रंथात बादरायणाच्या सूत्राची शैव दृष्टिकोनातून व्यापक चर्चा घडवून आणली. श्रीकांतच्या स्वतंत्र तात्त्विक विचाराला 'शिवाद्वैत' या नावाने ओळखले जाते. याच शतकातील (बारावे शतक) अघोर शिवाचार्यानी भोज देवाच्या 'तत्त्वप्रकाशिका' व 'मृगेन्द्रागम' या महत्त्वपूर्ण तात्त्विक ग्रंथावर टीका केली. उमापती शिवाचार्यानी तेराव्या शतकाच्या सुरूवातीला 'पौष्कर संहितेवर' टीका करताना शिवदेवतेचे श्रेष्ठत्त्व मान्य करून त्याची पूजा केली पाहिजे असा उपदेश केला.[89] अशा प्रकारचे दार्शनिक शैव साहित्याची निर्मिती पूर्वमध्ययुगात मोठया प्रमाणात झाली.

## समकालीन काही संबंधीत शैव पंथ–उपपंथ

---

88. अभ्यंकर शंकर वासुदेव, (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र. 1268.

89. डांगे स.अ., हिंदू धर्म आणि तत्वज्ञान, प्रथम आवृत्ती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, 1973, पृ.क्र. 304–305.

वैष्णव संप्रदायाप्रमाणे शैव संप्रदायातही कालखंडानुरूप विविध आचार व विचार विषयक नवनवीन प्रवाह निर्माण झाले. त्यानुसार विविध शैवसंप्रदायाची निर्मिती झाली. आपल्या संशोधनाशी संबंधित विविध शैव संप्रदायाबद्यलची थोडक्यात ओळख करून घेवू.

## काश्मिरी शैवागम

परममहेश्वर, वसुगुप्तास कैलास पर्वतावर 'शिवोपल' नावाच्या शिखरावर प्रथम शिवसूत्रे मिळाली. प्रत्यक्ष शिवाकडून मिळालेली ही सूत्रे महत्त्वाची असल्याने सेवागमाचा उगम हाच मानला जातो. काश्मिरी ग्रंथमालेने ही शिवसूत्रे छापून प्रसिद्ध केली आहेत. नवव्या शतकातील वसुगुप्ताने प्रवर्तीत केलेल्या या शैवागमास, शैवदर्शनास प्रत्याभिज्ञादर्शन, संवितंत्र, स्पंन्दशास्त्र, शांभवाद्वैतदर्शन, त्रिकदर्शन अशी नावे आहेत.

या संप्रदायाची साहित्य संपदा मोठी आहे. क्षेत्रराजाचा शिवसूत्रविमार्शेनी, इ.स. 854 च्या सुमारास भट्टकल्लाराचार्य यांनी 'स्पंदकारिका' नांवाचा ग्रंथ लिहिला. इ.स. 880 च्या सुमारास सोमानंद नावाच्या आचार्याने 'शिवदृष्टी' नांवाच्या ग्रंथाद्वारे संप्रदायाचे महत्त्व विशद केले. उत्पलदेवाच्या 'ईश्वर प्रत्यभिज्ञा' नांवाचा प्रौढ व गंभीर ग्रंथ शैवागमाचे स्वरूप स्पष्ट करणारा आहे. दहाव्या किंवा अकराव्या शतकात अभिनगुप्ताचार्यांनी 'ईश्वर प्रत्याभिज्ञा विमर्शिनी' नांवाच्या ग्रंथाद्वारे पंथाचे रहस्य समजावून सांगितले व पंथाचा प्रसार केला. वरील प्रमुख ग्रंथाशिवाय तंत्रालोक, त्रतसार, स्वच्छंदतंत्र, तत्त्वप्रकाश, तात्पर्य दीपिका इ. काही ग्रंथ शैवपंथाचे स्वरूप स्पष्ट करतात. काश्मिरी शैवागमाचे प्रत्याभिज्ञादर्शन हे प्रथम उत्तरेकडे काश्मिर देशातच प्रकट झाले.

या शैव पंथात ज्ञान व भक्ती या दोन्हींचा मेळ आहे. शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानात भक्तीला स्थान नाही. द्वैतावर आधारलेली भक्ती ही अज्ञानमूलक व साधनरूप असते, पण शैवागमात भक्ती ही साध्य मानली गेली आहे. भक्तीला स्वतंत्र पुरूषार्थाचे मूल्य आहे. या दर्शनाला प्रत्यभिज्ञादर्शन असे नाव असण्याचे कारण म्हणजे ज्ञान वस्तूचेच आणव, शाक्त, शांभव इ. उपायांनी साधकाने आत्मचैतन्याने ज्ञान करून घेतले तरी गुरूच्या उपदेशावरूनच शिवाचे ज्ञान करून घ्यावयाचे असते. अद्वैतवेदान्ताची, मायावादाची, भूमिकाही या दर्शनाला मान्य नाही. अद्वैताची भूमिका त्याला मान्य असली तरी हे अद्वैत दोन पदार्थांच्या सामरस्याने निर्माण झालेले असते. अवैदिक अशा बौद्ध

मताचा प्रभाव शंकराचार्यांच्या अद्वैतमतावर असल्यानेच या पंथाने उपनिषद रचनांच्या आधारे प्रकट झालेल्या शिवसूत्रांचा अवलंब करून नाथ सांप्रदायिक शैवाचार्यांनी ईश्वरान्दयवाद अथवा शांभवाद्वयवाद नावाचे नवे दर्शन प्रवर्तित केले. श्रुतिवाक्यांनुसार आरंभी एकच अद्वितीय असे सत् नावाचे तत्त्व होते यालाच शिवसूत्रात 'चैतन्यात्मा' असे म्हटले आहे.[90]

## प्रत्यभिज्ञा

दहाव्या शतकात 'सोमानंद' नावाच्या काश्मिरी व्यक्तीने 'प्रत्यभिज्ञा' पंथ नावाचा वेगळा शैव पंथ काश्मिरमध्ये प्रवर्तीत केला. त्याचा, 'शिवदृष्टि' हा ग्रंथ व त्याचा शिष्य 'उदयाकर' याचे काही ग्रंथ प्रत्यभिज्ञा पंथात प्रमाणभूत मानले जातात. जीवाला शिवाच्या ऐक्याची जाणीव (प्रत्यभिज्ञा ''तेच हा देवदत्त'' या स्वरूपाचे ज्ञान) उत्पन्न झाल्यावाचून होवू शकत नाही. शंकराची नितांत उपासना केल्यावर साधकाच्या ठिकाणी मीच शिव आहे अशी प्रत्यभिज्ञा उत्पन्न होते. हा मौलिक भेद वगळला तर स्पंद पंथ व प्रत्यभिज्ञा पंथ यामध्ये विशेष भेद नाही. दोन्हीपंथामध्ये योग साधनेवर विशेष भर आहे.[91]

## नायन्मार शैव संप्रदाय

प्राचीन शैव संप्रदायापैकी दक्षिणेतील हा एक प्राचीन लोकप्रिय शैव संप्रदाय तामिळनाडूमध्ये दुसऱ्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत 'नायन्मार' म्हणून ओळखले जाणारे त्रेसष्ठ सत्पुरूष होऊन गेले. त्यापैकी अप्पार, सुंदरर, माणीवकवाचकर (वासगर), ज्ञानसंबंधर हे चार सत्पुरूश विशेष प्रसिद्ध झाले. अप्पाराचा जन्म शूद्र कुळात झाला होता. प्रारंभी त्याने जैन संप्रदायाचा स्वीकार केला होता. पण पुढे त्याच्या मनात शिवभक्तीचा उदय होऊन तो शैव झाला. माणीवकवाचकर हा चौथ्या शतकातला मदुरेचा पांडयवंशीय राजा अरिमर्दन याचा मुख्यमंत्री होता. पुढे त्याच्या अंतःकरणात शिवभक्ती प्रबंळ होऊन त्याने त्या श्रेष्ठ अधिकारपदाचा त्याग केला. सुंदरर हा जन्माने ब्राह्मण होता व भगवान शंकराची त्याच्यावर मोठी कृपा होती असे त्यांचे अनुयायी मानतात. ज्ञानसंबंधर

---

90. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, दुसरी आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2004, पृ.क्र. 81.
91. वर्णेकर श्री.भा., भारतीय धर्म व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, 1975, पृ.क्र. 228

हा सातव्या शतकात झाला. बालपणापासून त्याने शिवभक्तीपूर्ण काव्यांची रचना केली. तत्कालीन पांडय राजाच्या जैनधर्मीय सभा पंडीताचा ज्ञानसंबंधरने पराभव केला. त्यामुळे स्वतः राजाने शैव दीक्षा घेतली. 'तेवारंम्' नावाच्या प्राचीन तमिळ काव्यसंग्रहात या चार श्रेष्ठ नायन्मारांच्या शिवभक्तीपूर्ण काव्यांचा संग्रह केलेला आहे. बाराव्या शतकात मेयकण्डदेव नायक एका शैवाचार्यांने 'शिवज्ञानबोधम्' हा ग्रंथ लिहून तमिळनाडूतल्या शैव मताला दार्शनिक स्वरूप प्राप्त करून दिले. इ.स. च्या पहिल्या पाच शतकात दक्षिण भारतामध्ये बौद्ध आणि जैन या संप्रदायांचा विशेष प्रभाव होता. नायन्मार संतांच्या कार्यामुळे तो प्रभाव ओसरून शैव संप्रदायाचा विशेष संचार झाला होता. दक्षिणेतल्या अनेक शैव मंदिरात व त्याच्या गोपुरांवर नायन्मार संतांच्या मूर्ती असतात व भाविक लोक त्यांची श्रध्देने पूजा करतात.

तामीळनाडूमध्ये शैवांचे अकरा ग्रंथसंग्रह विशेष प्रसिद्ध आहेत. त्यापैकी पहिल्या तीन संग्रहांचा कर्ता ज्ञानासंबंधर असून तीन ते सहा पर्यंतच्या संग्रहाचा कर्ता अप्पर आहे. सातव्या संग्रहाचा लेखक सुंदरर हा साधू होता. या सात संग्रहांना देवारंम् (तेवारम्) अशी संज्ञा असून संप्रदायात त्यांना परम्प्रामान्य आहे. माणिक्यवासगर (माणिकवाचकर) याने लिहिलेल्या आठव्या संग्रहाला तीरूवासगम् असे नाव असून त्याला तमिळ शैवसंप्रदायाचे 'उपनिषद' मानण्यात येते.[92] दक्षिण भारतातील हा प्राचीन शैव संप्रदाय अतिशय लोकप्रिय बनलेला होता. अतिदक्षिणेकडील आधुनिक शैव संप्रदायावरती आजही त्याचा प्रभाव जाणवतो. जैन व बौद्ध धर्माला कडवा विरोध त्याकाळात या संप्रदायाने केला. शैव साहित्यात मोठी प्रगती घडून आणण्याचा प्रयत्न या संप्रदायाने केला. उत्तर चालुक्य कालीन विविध शैव पंथावर या पंथाचे कमी अधिक परिणाम दिसतात.

## मत्तमयुर पंथ

महाराष्ट्रातील दख्खनच्या पठारावर विकसित झालेला हा शैव पंथ थोडासा तांत्रिकतेकडे झुकणारा आहे. दारूकवनात (औंढानागनाथचा परिसर) हा पंथ लोकप्रिय होता. कलचुरी वंशाने स्वीकारलेल्या पाशुपत शाखेतील मत्तमयुर शाखेचा उदय मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर संस्थानात सामान्यतः सातव्या, आठव्या शतकात झाला असावा. ग्वाल्हेर

---

92. वर्णेकर श्री.भा., भारतीय धर्म व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, 1975, पृ.क्र. 233

संस्थानातील नरवारच्या दक्षिणेस 45 मैलांवर रणोद (प्राचीन रणिपद्र) नावाच्या खेडयात एका राजवाडा सारखा दिसणाऱ्या एका मठात विशाल शिलेवर कोरलेल्या लेखात मत्तमयुर उपपंथाच्या स्थापनेची कथा दिली आहे. ती पुढीलप्रमाणे,

पूर्वी दारूकावनात यज्ञानुष्ठान करून भक्तीने आपल्याकडे आलेल्या ब्रह्मदेवावर भगवान शंकरांनी अनुग्रह केला, त्याच्यापासून हा लोकोत्तर विशालशाखांचा मुनिवंश उत्पन्न झाला. या वंशात कदंबगुहाधिवासी, नंतर त्याचा शिष्य शंखमठिकाधिपती, त्यानंतर तेरम्बिपाल व त्याचा शिष्य आमर्देकतीर्थनाथ असे आचार्य या संप्रदयाचे होऊन गेले. आमर्देकतीर्थनाथाचा शिष्य पुरंदरनामक होता.........'' [93] हिंगोली जिल्हयातील औंढानागनाथचा जो बारा ज्योर्तिलिंगापैकी एक आहे हे स्थळ मतमयुर शैव शाखेचे प्रमुख केंद्र बनले. पुढे ही शाखा वीरशैव लिंगायत संप्रदायात विलीन झाली असावी.

## रसेश्वर संप्रदाय

आदिनाथ शंकरापासून या पंथाची निर्मिती झाल्याचे या पंथाचे सांप्रदायिक सांगतात. या पंथात शुक्र, सोमेश्वर, गोविंद भगवत्पदाचार्य, गोविंदनायक, चर्वेरी, कपील, व्याली, कापालिक, कुंदलायन इत्यादी आचारी होऊन गेले. रससिध्द नागार्जुनाचा 'रसरत्नाकर', गोविंद भगवत्पदाचार्य याचा 'रसहृदय', विष्णू स्वामींचा 'साकारसिध्दी' इत्यादी ग्रंथात या संप्रदायाची साधना साकारलेली आहे.

जीव व ईश्वर यांचे ऐक्य मानवी देहाच्या सुस्थितीवर अवलंबून असल्याने देहास सामर्थ्यवान व तेजस्वी बनविण्याची आवश्यकता या पंथात सांगितली आहे. देहास सामर्थ्य मिळते ते पारद वा पारा याच्या गुणधर्मामुळे. पारा म्हणजे रसेश्वर संसार सागर पार करणारा तो पारद अथवा पारा, असे रूपकानेही याचे वर्णन केले जाते. 'सुप्तस्थितीतील पारा हा माझ्याच इंद्रियापासून झाला.' असे शंकर पार्वतीला सांगतात. अर्भक हे पार्वतीचे बीज (रस) मानले आहे. या दोहांचे मिलन म्हणजे दारिद्रय व मृत्यु यांचा नाश करणारे. शिवाने म्हटले आहे –

'अभ्रकस्तव बीजं तुज मम बीजं तु पारदः।

93. जोशी मनोहर (संपा.), प्रसाद शिवदैवत विशेषांक, प्रसाद प्रकाशन, पुणे, 1970, पृ.क्र. 68

अनयोर्मीलनं देवि मृत्युदारिद्रयनाषनम्।।' (सर्वदर्षनसंग्रह 9–4)

देहत्यागानंतर मोक्षापेक्षा 'याची देही' मोक्ष देण्याचे सामर्थ्य पाऱ्याच्या रसायनात आहे. असे हे दर्शन मानते. नानाविध व्याधींनी व रोगांनी जर्जर होणारे शरीर मोक्षप्राप्तीसाठी दृढ, सशक्त, समर्थ, निरोगी, अभंग राखण्याचे काम पारदभस्म करीत असते. पारद रसायनाचे सेवन केल्यावर शरीर सदृढ व निरोगी बनते, सर्वव्याधी नष्ट होतात. आत्मज्ञान सुलभ होते अशी या दर्शनाची धारणा आहे. अभ्रक व पारा यांचे मिश्रण विशिष्ट यंत्राच्या सहाय्याने उर्ध्वपतित केल्याने शरीर आजरामर बनविणारा रस तयार होतो. मुर्च्छित, मृत व बंध या पाऱ्याच्या तीन अवस्था असून मुर्च्छिद पारा व्याधींचे निवारण करतो, मृत पारा आयुष्य देतो. बंध पारा आकाशात उडण्याचे शक्ती देतो, स्वेदन, मुर्च्छन, पावन, निरोधन, मारण इत्यादी विधी पाऱ्यांचे सांगितले आहेत. नाथपंथी, हटयोगी व रसेश्वरपंथी यांच्यात संबंध असत.[94]

## अराध्यशैव

बाराव्या शतकातील तेलंगणातील 'शैव संप्रदाय' मल्लिकार्जुन पंडिताराध्य या पंथाचा बाराव्या शतकातील प्रमुख प्रवर्तक वीरशैव लिंगायताप्रमाणे वेद, कर्मकांडाचा विरोधी पंथ. अराध्यशैव आणि लिंगायत पंथ यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध होते. चौदावे शतकातील मुस्लिम आक्रमणकाऱ्यांना विरोध व विजयनगर राज्याच्या स्थापनेत या पंथाच्या अनुयायानी मदत केली.[95] वीरशैव लिंगायत व अराध्यशैव यांच्यात तात्त्विक साम्यता दिसते. दोन्हीपंथ समकालीन आहेत. या दोन्हीवरती नाथ संप्रदायाचा प्रभाव जाणवतो. हा पंथ तेलगू भाषिक प्रदेशात लोकप्रिय ठरला. पुढे अराध्यशैवांना वीरशैव लिंगायत नावाने ओळखले जावू लागले.

वरील शैव संप्रदायांपैकी काही संप्रदाय प्राचीन काळातील असले तरी ते सर्व दक्षिण भारतातील आहेत. या सर्वांचा परिणाम आपल्या संशोधन विषयाशी संबंधित असलेल्या शैव पंथाशी येतो. वरील या पंथाशिवाय बरीचशी दक्षिण भारतातील समकालीन

---

94. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, दुसरी आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2004, पृ.क्र. 86

95. नीलकंठ शास्त्री के.ए., दक्षिण भारत का इतिहास, नववी आवृत्ती, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटना, नोव्हेंबर 2006, पृ.क्र. 476

शैवसंप्रदायाचा आपण थोडक्यात ओळख करून घेतली त्यांचाही निश्चितच कालामुख, नाथ, वीरशैव लिंगायत या संप्रदायाशी विविध अंगी संबंध आला.

## शैव तांत्रिक पंथ

भारतीय हिंदू धर्म परिवार शैव, वैष्णव, शाक्त, तांत्रिक, अशा अनेक शाखापरिवारांपासून बनलेला आहे. यांचा भुतकाळात आपापसात सतत सहसंबंध येत असलेला दिसतो. याचा उदय मात्र एकाच वेळी झालेला नाही. कांहींचा उदय वैदिक काळानंतरचा, तर काहींचा उदय वैदिकपूर्व कालीन असलेला संशोधकांनी मान्य केलेला आहे. शैव, शाक्त, तंत्र या बाबींकडे हिंदू धर्माची डावी बाजू म्हणून पाहिले जाते. या पंथात समाजातील कनिष्ठ लोकांचा वावर असलेला दिसतो. मूळ निवासियांचा व प्राचीन पंथ म्हणून शाक्त, तंत्र, शैव पंथाकडे पाहिले जाते. तंत्र पंथाचा शैव व शाक्त या पंथाशी जवळीकता दिसते. त्यांच्या तत्त्वज्ञानात आचार धर्मात बरेच गुण साम्य दिसतात. पूर्व वैदिक काळात व उत्तर वैदिक काळात विखुरलेल्या अवस्थेत तांत्रिक पंथ होता. प्राचीन काळापेक्षा पूर्व मध्ययुगात दक्षिण भारतासह उत्तर भारतात या पंथाचा खूप विकास झाला व तो भारताबाहेरही प्रसारित झाला. उत्तर चालुक्य समकालीन विविध शैव प्रवाहांचा अभ्यास करण्याअगोदर आपण तंत्र म्हणजे काय, तंत्राचे स्वरुप, तंत्राचा इतिहास इ. तंत्राबद्धलच्या काही बाबी जाणुन घेवु.

## तंत्र म्हणजे काय?

धर्माच्या विश्वकोशात तंत्र या शब्दाच्या अर्थाचा विकास सांगितलेला आहे. तंत्र या शब्दाचा एक अर्थ 'विणने' अथवा 'आवरण' आहे. नंतर मात्र याचा अर्थ 'सतत होणारी आर्थिक क्रिया' असा झाला. चिंतामणी भटटाचार्य यांच्या मते, 'तंत्र हे एक शास्त्र आहे ज्यास शिवाने पार्वतीपुढे प्रकट केले'. कारण कलियुगात वेद मंत्रास मर्यादित स्वरूप प्राप्त झाले, यज्ञ किचकट बनले शेवटी सर्वमान्य होणाऱ्या नवीन शास्त्राच्या आवश्यकतेसाठी तंत्रशास्त्राची निर्मिती झाली. तंत्र शिवाच्या मुखातून प्रकट झाल्याने तंत्राला 'आगम आगच्छतीति आगमः' असे म्हटले आहे. अभिनव गुप्तांच्या मते तंत्राचा अर्थ 'प्रसिद्धी शास्त्र' आहे. प्रसिद्धीचा अर्थ आहे मोठा व अपवर्गासाठी भौरव शिवद्वारे प्रकाशित विद्या् आणि या ईश्वरकृत ज्ञानाचे ज्या शास्त्रात वर्णन दिसते त्या शास्त्रांना 'आगम' म्हटले

जाते. शेवटी 'आगम ज्या शास्त्रांमध्ये गुरू शिष्य परंपरा शिव गुरू तर पार्वती शिष्य शिवाच्या व्दारे प्रकाशित होते त्यांना आगम म्हटले जाते'. पुरूष शक्तीला मानणाऱ्या तंत्राला 'शैव तंत्र' तर स्त्री शक्तीला मानणाऱ्या तंत्राला 'शाक्त तंत्र' असे म्हटले जाते.[96]

भक्तीकोश व संस्कृती कोशात 'तनू विस्तारे' या विस्तारार्थक धातूपासन 'तंत्र' शब्द बनला आहे. असा उल्लेख दिसतो. 'ज्याच्याद्वारे अध्यात्मज्ञानाचा किंवा तत्त्वज्ञानाचा विस्तार केला जातो ते तंत्रशास्त्र होय'.[97] मुनीशचंद्र जोशी आपल्या **'ऐतिहासिक संदर्भ मे शाक्त तंत्र'** या ग्रंथात तंत्राविषयी म्हणतात, ''महीन धागे या रेशे के लिए प्रयुक्त होनेवाला शब्द तन्तू भी इसी मूल का है, इसी प्रकार तंत्र को कभी कभी जुलाहे के तान बाने या इसी से मिलती जुलती पेचीदगी पर व्यवस्थित प्रक्रिया को परिभाषित करने के अर्थ मे भी लिया जाता है. दुसरे शब्द मे तंत्र शब्द का व्यवहार किसी भी ज्ञान या विधान की उस प्रणाली का बोध कराने के लिए भी किया गया है. जिसमे किसी एक मूल बिंदू से आरंभ होकर विस्तार की प्रक्रिया बढती है''. अमरकोशात तंत्राचा अर्थ 'प्रधान सिध्दांन्त' असा सांगितलेला आहे, जे वरील मताला पुष्टी देण्याचे काम करते. प्रामुख्याने शक्ती पुजेशी संबंधीत म्हणून तंत्राकडे पाहिले जाते पण शैव, वैष्णव, बौद्ध तसेच जैनांचे आपली स्वतंत्र तंत्र आहेत. शाक्ताचार्यांनी या विषयी तंत्र शब्दाची सुंदर व्याख्या केलेली आहे. त्यांच्या मते तंत्र असे ज्ञान आहे की, शुन्यापासून निर्माण होवून ती विस्तारते व ती साधकांची अथवा उपासकांची रक्षा करते. (यथाः तननात त्रायते इति तंत्रः)[98] 'तंत्र' हा शब्द वृद्धी आणि प्रसाराशी संबंधित धातुशी संबंध जोडणारा आहे. संतान, तणय, तंतू या शब्दांतून व्यक्त होणारी कल्पनाच तंत्र या शब्दाच्या मुळाशी आहे. कात्यायन श्रोतसूत्र, आपस्तंभ धर्मसूत्र आणि तैत्तिरीय उपनिषद् यांच्या मध्ये **'वंशवृद्धी'** या अर्थाने हा शब्द आलेला आहे. महाभारतात **'कुलस्यतंत्र'** हा शब्द वंशवृध्दी करणारे कर्म अशा अर्थाने आला आहे.[99] तंत्र

---

96. उपाध्याय विश्वम्भरनाथ, संत वैष्णव काव्य पर, तांत्रिक प्रभाव, प्रथम आवृत्ती, विनोद पुस्तक मंदिर, आग्रा, 1962, पृ.क्र. 3.
97. जोशी महादेव शास्त्री (संपादक), भारतीय संस्कृती कोश, खंड 3, प्रथम आवृत्ती, संस्कृती कोष मंडळ, पुणे, पृ.क्र. 795.
98. जोशी मुनिशचंद्र, ऐतिहासिक संदर्भ में शाक्त तंत्र, प्रथम आवृत्ती, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, 1989, पृ.क्र. 18.
99. गाडगीळ स.रा., लोकायत, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय गृह, मुंबई, मे 1974, पृ.क्र. 99

एक विशिष्ट प्रकारचे अध्यात्मिक ज्ञान आहे. कामिकागमाना नुसार तंत्र साहित्यात तत्त्व आणि मंत्र हे विषय मान्य केले गेले.

'तनोति विपुलान अर्थान तत्त्व–मंत्र–समन्वितान् त्राणमच कुरूते यस्मात तंत्रम इति अभिधीयते' अर्थात तंत्र ज्ञान आपल्या विस्तारित रूपामध्ये अनेक अर्थ, तत्व तसेच मंत्राचे दुसरे नाव 'आगम' असेही आहे.[100] युगपरत्वे मनुष्याचे आचार भिन्न होणार किंवा तसे होने युक्त असते. असे सांगून कलियुगास तंत्रमार्ग आचरावा असे कुलर्णन तंत्रात पुढील प्रमाणे सांगितले आहे.

'कृते श्रुत्युक्त आचारस्त्रेतायां स्मृतिसम्भवः

द्वापरे तु पुराणोक्तः कलावागमसम्मत'[101]

भारतीय कोश ग्रंथामध्ये 'तंत्र' शब्दाचे जेवढे काही अर्थ आहेत त्यापैकी 'शिवमुखोक्त शास्त्र' हे एक आहे. हे शिवोक्तषास्त्र 'आगम', 'यामल' आणि 'तंत्र' या तीन भागात विभागलेला आहे.[102] तंत्र हा शब्द 'तत्' आणि 'द्ध' यापासून बनलेला आहे. ज्यात 'तन्' या धातूचा अर्थ ज्ञानाचा विस्तार करणे.[103] म्हणजे जे ज्ञान घेण्याने विस्तारते ते 'तंत्र'[104] हिंदू धर्मात तंत्र अथवा आगम पांच सांगितले जातात. गाणपत्य, सौर, वैष्णव, शैव आणि शाक्त. गणेश आणि सूर्यपूजा समाजात कमी लोकप्रिय ठरली. यामुळे शैव तंत्राचा प्रभाव गणेश तंत्र व सुर्यतंत्रावर पडला.[105]

## तांत्रिक संप्रदायाचा इतिहास

तंत्र संप्रदायाचा इतिहास पाहतांना असे आढळून येते की, ज्या प्रमाणे भारतीय संस्कृतीची पाळेमुळे सिंधू संस्कृतीत आहेत. जसे जैन संप्रदायाचे अवशेष सिंधू संस्कृतीत आढळतात त्या प्रमाणे तंत्र संप्रदायासंबंधी पुरावे सिंधू संस्कृतीच्या उत्खननात आढळतात.

---

100. सिंह रामधारी 'दिनकर', संस्कृती के चार अध्याय, चतुर्थ संस्करण उदयांचल, पटणा, डिसेंबर 1966, पृ.क्र. 222.
101. जोशी महादेव शास्त्री (संपादक), खंड 3, प्रथम आवृत्ती, संस्कृती कोष मंडळ, पुणे, पृ.क्र. 796.
102. कवीराज गोपीनाथ, तांत्रिक वाड़म में शाक्तदृष्टि, प्रथम संस्करण, बिहार – राष्ट्रभाषा परिषद, पटना, 2000, पृ.क्र. 01
103. 'तन्यते विस्तायेते ज्ञानं अनेन, इति तन्त्रम्'
104. मिश्र रामप्यारे, वैष्णव पांचरात्रआगम, कतियपक्ष, प्रथम संस्करण, प्रतिभा प्रकाशन,दिल्ली,1994,पृ.क्र. 57
105. सिंह रामधारी 'दिनकर', संस्कृतीके चार अध्याय, चतुर्थ संस्करण, उदयांचल, पटणा, डिसेंबर, 1960, पृ.क्र. 222.

शैव व तंत्र हे दोन्ही संप्रदाय एकमेकांशी संबंध प्रस्थापित करतात. या दोन्ही पंथाची बरीचशी वैशिष्टये एक सारखी दिसतात. साहजिकच शैव संप्रदायाची ओळख सांगणाऱ्या अवशेषांसोबत तंत्र संप्रदायाची मुद्रा, प्रतिमा, दोरखंड, नरबळी प्रथा सिंधू संस्कृतीत आढळतात. पुढे वेद काळातील वैदिक वाङ्मयातही तंत्राबद्यलचे उल्लेख आढळतात. ऋग्वेदात जादूटोणा करणाऱ्यांचे वर्णन, अनार्य, अदेव, अनृतदेव असे केले आहे. (ऋ 721. 5,10.99.3) वेदकाळात लोक अशांना घाबरत असा उल्लेख केला गेला. (ऋ 7.104, 10.37) वेदकालीन ऋषी धार्मिक प्रसंगी वेगवेगळे मंत्र म्हणत. यामागचा त्यांचा हेतू मंत्र म्हणण्यामुळे वेगवेगळया शक्ती जागृत होतात यांनाच देवता असे म्हटले जाते. देवता शरीरातील विविध अवयवांमध्ये निवास करतात असाही विश्वास हे ऋषी व्यक्त करतात. (ऋग्वेद अनुक्ती, रामगोविंद त्रिवेदी, 3.62.10 प्रयाग 1954.)[106] ऋग्वेदाप्रमाणेच अथर्व वेदातही तांत्रिक बाबी दिसतात. अथर्व वेदातील जादू व व्यभिचार ही अंगे ज्याला उपवेद असेही संबोधले जाते ते तंत्रशास्त्राचे मूळ आहे. असेही कांही अभ्यासकांचे मत आहे. (षु. नी. स. द. 339) मात्र तंत्रशास्त्रात अंतर्भूत इतर तत्त्वांमुळे त्याला वेदसंहितेतून वगळले गेले असावे.

तांत्रिक तत्त्वज्ञानातील 'शिव शक्ती' संकल्पना वेद वाङ्मयात देखील आढळते. 'सदाशिवस्त्या' असे 'हंसोपनिषदात' तर तंत्र शास्त्रातील आद्यशक्तीचे श्वेताश्वतर उपनिषदात 'परास्यशक्तिर्विविद्यैव श्रुयते.' वर्णन केले आहे. तांत्रिक तत्त्वज्ञानाप्रमाणे कुंडलिनी म्हणजे ''मानवी शरीरात सुप्तावस्थेत असलेली अंतस्थ आध्यात्मिक शक्ती, साधनेमुळे ही जागृत होते व त्या साधकाला दिव्यत्त्व प्राप्त होवून तो परब्रह्म शक्तीत विलीन होवून जातो.''[107] अष्टाध्यायी सुत्र 5.2.70 हया ठिकाणी 'हातमाग' या अर्थाने तंत्राचा उल्लेख दिसतो. अपस्तंभ श्रोतसूत्र 1.15.1 येथे तंत्र हा शब्द अनेक अंगाचे विधान या अर्थाने येतो. शाखायन श्रोतसूत्र 1.224 याठिकाणी तंत्र हा शब्द कृत्य या अर्थाने वापरलेला आहे.[108] सांख्य योगात पुरूषाचे अनेकत्त्व सांगितले आहे. पुरूषाचे वर्णन

---

106. उपाध्याय विश्वम्भरनाथ, संत वैष्णव काव्य पर, तांत्रिक प्रभाव, प्रथम आवृत्ती, विनोद पुस्तक मंदिर, आग्रा, 1962, पृ.क्र. 8.
107. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र. 668.
108. कुमठेकर उदय, वेध चार्वाकाचा, प्रथम आवृत्ती, अभय प्रकाशन, नांदेड, मे 1994, पृ.क्र. 95.

अक्रियाशील तर प्रवृत्तीचे निर्मीतीक्षम असे सांगितले आहे. अश्वत्थाम्याने केलेल्या शिवपूजेच्या विधीचे तांत्रिक वामाचाराशी असलेले साम्य स्पष्ट आहे. महाभारतात जरासंधाने मांसाहार करून मांसापिंड पूर्ववत केला असा सभा पर्वत उल्लेख आहे. भागवत पुराणात तंत्राचा प्रभाव अगदी स्पष्टपणे दिसून येतो. भागवत पुराणात तांत्रिक विधीनुसार श्री विष्णुच्या पूजेचे वर्णन आढळते. (भाग 9.3.47.49) तांत्रिक पूजाविधी, मंत्र, कवच इ.चा पुराणात अनेक वेळा उल्लेख आला आहे. अग्निपुराणात अनेक तांत्रिक मंत्र व विधीचे वर्णन केले आहे. व दीक्षेचे महत्व सांगितले आहे. ब्रह्म पुराणांत एका विभागात 'ललितासहस्त्रनाम' समाविष्ट आहे, जे स्पष्टपणे तांत्रिक आहे.

मनुस्मृतीत अभिचार व मूल कर्मन विधीचे वर्णन आढळते. मात्र या कर्मांना पापात्मक म्हणून संबोधण्यात आले अनेक स्मृतीं मध्ये उदा. धर्म सिंधूत दीक्षेचे महत्त्व सांगितले आहे. स्मृतीप्रमाणेच योगामध्येही योगाचा व तंत्राचा एकमेकांवार बराच प्रभाव दिसून येतो. हठ् योगातील धेरंड संहितेत पंचवीस मुद्रांचे वर्णन केले आहे. शंभर श्लोकांमध्ये सांगितलेल्या या मुद्रांचे तंत्रशास्त्रात अनेक ठिकाणी महत्त्व सांगितले आहे. तंत्र आणि आयुर्वेद या दोन शास्त्रांचा एकमेकांवर बराच प्रभाव दिसतो. तंत्रशास्त्रात आयुर्वेदातील औषधी वनस्पती, रोग त्यावर उपचार यांचा अभ्यास केला आहे. तसेच काही आयुर्वेदिक ग्रंथामध्ये तांत्रिक पध्दतीचा प्रभाव दिसून येतो.[109]

प्राचीन विद्वान वसुबंधूने पाचव्या शतकाच्या सुरूवातीस आपला प्रसिध्द ग्रंथ अभिधम्म कोशामध्ये सूचित केले होते की, 'या काळातील धर्म आपले शेवटचे क्षण मोजत आहे. हे असे युग आहे, की ज्यात दुराचार आणि व्यभिचार मोठया प्रमाणात मोजले आहे. लोक मोक्ष प्राप्त करू इच्छितात. त्यांनी अत्यंत सावध राहिले पाहिजे'. सहाव्या आणि सातव्या शतकात देशात तांत्रिक संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार झाला. या तांत्रिक प्रथा विशेषतः महायान शाखांशी संबंध ठेवणाऱ्या होत्या. या शाखांमध्ये जादूटोणा यांच्या साहयाने ज्ञान प्राप्तीचे मार्ग सांगीतले जात होते. विनयतोश भट्टाचार्य म्हणतात. 'यात शंका नाही की, पाल सम्राटांच्या शासनकाळात तंत्र विद्येने महत्त्व मिळविले. नालंदा आणि विक्रमशिला सारख्या विद्यापीठात तंत्रविद्या नियमित अभ्यासक्रमात समाविष्ठ करावी

109. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र. 670.

लागली आणि त्या लोकांचे वर्ग चालविण्यासाठी तंत्रविद्याचा उच्च ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला जात होता. यासाठी नियमित शिक्षक ठेवावे लागे. या वरून असे सिद्ध होते की, 6 व्या व 7 व्या शतकापर्यंत संपूर्ण भारतात, समाज मनात तांत्रिक पंथाने मोठे स्थान प्राप्त केलेले होते. या मागची अनेक कारणे दिसून येतात. जसे की, वैदिक धर्माला पर्याय म्हणून बौद्ध व जैन धर्माची निर्मिती झाली. पुढे वैदिक धर्माप्रमाणे बौद्ध व जैन धर्मात वैदिक धर्माप्रमाणेच कर्मकांडे सुरू झाली. या पासून मुक्ती मिळविण्यासाठी म्हणून वैदिक हिंदू धर्माला व बौद्ध आणि जैन धर्मात पर्याय म्हणून पण वैदिक धर्माशी मिळता जुळता पंथ म्हणून तांत्रिक पंथाकडे सर्वसामान्य लोक आकर्षित झाले असावेत. सर्वसमावेशक असा हा तांत्रिक पंथ होता. **देवीप्रसाद चटोपाध्याय यांनी तांत्रिक संप्रदायाची उत्पत्ती जादूवाली अनुष्ठाने देवी पूजा तसेच उत्पादन कृषी वाढविण्यासाठी केली जाणारी आदिवासी कृषि समाजातून झालेली सांगतात.** ते पुढे म्हणतात तंत्रवाद हे लोकायत द्वारा स्वीकारलेला एक लोकप्रिय नाव आहे. ज्याचा संबंध अदिवासी तांडयाच्या अश्लिल रीति रिवाजांशी संबंधित आद्य भौतिकवाद होते. याहिपुढे ते म्हणतात, लोकायतदर्शन, सांख्यदर्शन व योग दर्शन हे ही तांत्रिक आचार विचारातून निर्माण झााले. तांत्रिकता अतिशय मूल्यवान असून तांत्रिकतेनंतर संख्या व योगदर्शनाचा उदय झाला.[110]

तंत्र हे लौकिक रूढी परंपरांचा श्रध्दांचा, अधंश्रध्दांचा आधार राहत आले आहे. तंत्राचा संबंध लोकधर्माशी आहे. लोकधर्माशी संबंध असल्यामुळे 'लोकेशू आयत 'असलेल्या लोकायताशी त्याचा कायम संबंध आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.

तंत्राचा आजवरचा अभ्यास दोन भिन्न दृष्टिकोनातून झाला आहे. एक दृष्टिकोन 'अध्यात्मवादी' आहे. तर दुसरा इहवादी आहे. अध्यात्मवादी प्रतिपादन मांडणाऱ्या विव्दवानांमध्ये जस्टिस सर जॉन वुड्रॉफ उर्फ आर्थर ॲव्हेलॉन, हर्बर्ट गुंथर, म.म. पंडीत, गोपीनाथ कवीराज, मनोरंजन बसू, मनिंदर मोहर बोस, इत्यादि विचारवतांचा समावेश होतो. या विद्वानाच्या मतानूसार तंत्र ही मोक्षप्राप्त करून देणारी सिद्धी प्राप्त करून देणारी एक अध्यात्मिक साधना आहे. दुसरा पक्ष तंत्राचे इहवादी प्रतिपादन मांडणारा आहे. या मध्ये जगभरच्या तांत्रिक पध्दतींचा अभ्यास करणाऱ्या फ्रेझर, मॉर्गन, थॉमसन, बिफ्रॉ इ.

---

110. दामोदरन के., भारतीय चिंतन परंपरा, प्रथम आवृत्ती, पिपुल्स पब्लिशिंग हाऊस, (प्रा.) लि., नई दिल्ली, 1970, पृ.क्र. 241.

समाजशास्त्राज्ञांचा मानववंश शास्त्रज्ञांचा समावेश होतो. या विद्वानांच्या चिंतनाचा आधार घेत भारतीय तांत्रिक परंपरांची चिकित्सा मांडणाऱ्या विचारवंतात देवी प्रसाद चटोपाध्याय, नरेंद्रनाथ भट्टाचार्य, हे बंगाली विचारवंत त्यांना अनुसरणारे डॉ.स.रा.गाडगीळ, शरद पाटील, इ. चा समावेश करता येईल. यांच्या मते तंत्र हे अध्यात्म नाही. तंत्र हे आदिम समाजाचे उत्पादन तंत्र आहे. यामध्ये यात्वात्मक सुफलीकरण विधींचा समावेश होतो. या प्रकारच्या विधि विधानांचा विकास प्राचीन काळातील कृषक संस्कृतीत झाला. त्या कृषक संस्कृती प्रामुख्याने मातृसत्ताक आहेत. ही भूमिका जगभरच्या आदिम समाजातील चाली–रितीच्या संदर्भात मांडण्यात आली आहे.[111]

आदिम तांडयामध्ये तंत्राने जादू शास्त्राची भूमिका निभावली होती. पण, ती निषेधात्मक ढंगानी युक्त होती. तंत्राचा उदय निसर्गात घडणाऱ्या घटनांमधील कारणांचा शोध न लागणे यातून झाला पण मध्य काळात शास्त्राने मुळात एक भूमिका निभावली. शास्त्राने विज्ञान सामाजिक घटनांक्रमांमुळे अज्ञानी लोकांच्या वैचारिकतेत मूळे घट्ट रोवली. पण ही शास्त्रासाठी पुनर्स्थापित करणारी वस्तू राहिली नाही. उलटरीतीने शास्त्राच्या प्रगतीची द्वारे बंद केली. ग्रामीण समाजाच्या विकासगतीत विरोध झाला. आणि आर्थिक मागासलेपणाला आणखीन मजबूत बनविले. सामाजिक प्रगतीला बाधा निर्माण झाली. सामान्य लोक वैज्ञानिकतेपासून दूर–दूर जावू लागले व जादूटोना, मंत्र तंत्र यांना शरण गेले. परिणामी व्यक्ती स्वतःच्या शक्तीवर विश्वास न ठेवता अध्यात्मिक शक्तीवर विश्वास ठेवू लागला हीच भारतातील तंत्रवादाच्या निर्मितीचे पहिले पाऊल आहे. असे के. दामोदर 'भारतीय चिंतन परंपरा' ग्रंथात म्हणतात.[112]

तंत्र केवळ पूजा किंवा प्रार्थना करणारी पध्दत नव्हती तर ती कर्मकांड असणारी किचकट पद्धत होती. या पद्धतीत मंत्र, मूद्रा, मंडल, अशा तांत्रिक गोष्टीचा समावेश होता. व्यक्तीच्या इच्छा आकांक्षापुर्ततेसाठी कांही मंत्राचा जप करणे आवश्यक मानले जाई. वुड्राफ यांच्या मते असे करणे म्हणजे भावना आणि इच्छा यांना प्रकट करण्यासारखे

---

111. कुमठेकर उदय, वेध चारवाकाचा, प्रथम आवृत्ती, अभय प्रकाशन, नांदेड, मे 1994, पृ.क्र. 104.
112. दामोदरन के., भारतीय चिंतन परंपरा, प्रथमावृत्ती, पिपुल्स पब्लिशिंग हाऊस, (प्रा.) लि. नई दिल्ली, 1970, पृ.क्र. 242

होते.[113]

## आगम ग्रंथाचा उगम

आगमांच्या निर्मितीसंबंधी परंपरेने आलेली एक कथा सांगितली जाते. ती अशी – ''गोदावरी काठच्या मंत्रकाली येथील मंत्रकालेश्वराच्या देवळासभोवती शैवाचे चार मठ होते. राजेंद्र चोल राजाला उत्तरेकडून दिग्विजयार्थ परत जातांना शैव भेटले. राजाने या शैवाना आपल्या राज्यात येवून राहण्यास विनंती केली. त्यानुसार ते तोंडैमंडल व चोलमंडल येथे राहिले व याच काळात आगम ग्रंथाची रचना झाली.'' पण या कथेवरून निश्चित असा कालखंडाचा बोध होत नाही. भारतीय संस्कृती कोशकारांनी आगम साहित्याची निर्मिती इ. स. पूर्व दुसरे शतक मानले आहे. श्री.म.पु.पाटील मात्र 5 व्या शतकापुर्वीच आगमांचा उदय विशद करतात. आगम निर्मिती विषयी दुसरी कथा अशी सांगितली जाते की, प्राचीन काळात बौद्‌ध, जैनादी अवैदिकांनी शून्यवाद, निरीश्वरवाद, निरात्मवाद, दुःखवाद, क्षणिकवाद, यासारख्या पाखंड मतांचा प्रचार सर्वत्र करून अज्ञानतेची दिशाभूल करून तिला गोंधळात टाकल्यानंतर जगतकल्याणार्थ आदिनाथ शंकरानी वैदिक धर्माचे रहस्य प्रकट करण्यासाठी 'महोदवगिरी' नामक हिमालयातल्या एका शिखरावरील शिलाखंडावर रहस्यमय अशी कांही सूत्रे लिहून ठेवली आणि त्या सूत्राचा प्रचार करून अवैदिक पाखंड मताचा निरास करावा असा परम माहेश्वर वसुगुप्त पंडीत यास स्वप्नांमध्ये आदेश दिला. याच शिवसूत्रांना 'शैवागम' असे नाव आहे. आगम म्हणजे काय? 'आगत् शिव वक्त्रालु गतश्च गिरिजामुखे,। मतं श्रीवासुदेवेन आगमस्तेन किर्तितः।।' या वचनाप्रमाणे या दर्शनाचे आगमन प्रथम शंकराच्या मुखातून झाले व ते पार्वतीच्या मुखात प्रविष्ट झाले व त्याला पुढे भगवान वासुदेवाने मान्यता दिली म्हणजेच वेदाप्रमाणे आगमाची निर्मिती ईश्वरप्रणित असल्याचे वरिल कथेवरून स्पष्ट होते. या शैवागमाचा प्रचार करणारा वसुगुप्त हा इ.स.च्या नवव्या शतकातील होता.[114] शैवागम शाक्तगम, पांचरात्र आगम तसेच बौद्‌ध तंत्र या आगमांचा रचना काळ इ.स.च्या सहाव्या शतकापासून ते जवळपास तेराव्या शतकापर्यंतचा

113. दामोदरन के., भारतीय चिंतन परंपरा, प्रथमावृत्ती, पिपुल्स पब्लिशिंग हाऊस, (प्रा.) लि. नई दिल्ली, 1970, पृष्ठ क्र. 243.

114. जोशी प्र.न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्रथम आवृत्ती, नितिन प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, 1972, पृ.क्र. 58.

आहे असे डॉ. विश्वभंरनाथ उपाध्याय 'संत वैष्णव काव्य पर तांत्रिक प्रभाव' या ग्रंथात म्हणतात.[115] शैवागमातील शिवसूत्रे 77 असून तीन उन्मेशात म्हणजे विभागांत आहे. शैवागमाचा प्रचार, करणाऱ्या वसुगुप्तांनी गीतेवर एक भाष्य लिहीले होते. नवव्या शतकाच्या अखेरीस या सुत्रावर भास्कर, वरदराज, क्षेमराज, यांनी वार्तिके लिहिली. क्षेमराजाने वार्तिके वृत्ती याचा अभ्यास करून लिहिलेला 'शिवसूत्रविमर्शिनी' नाव एक ग्रंथही उपलब्ध आहे.[116] डॉ.व्ही.व्ही.रामम्न आणि सूर्यनारायण शास्त्री यांच्या मते आपण उपनिषदाचाच एक अनुप्रणित एक भाग असून तो उपनिषदाचे स्वरूप विशद करतात. एका मतानुसार आगमाचा वेदाशी संबंध नसून ते स्वतंत्र साहित्य आहे. असे आगमाबध्दलची भिन्न भिन्न मते आढळतात.[117]

## तंत्राचे स्वरूप

तांत्रिकतेकडे पाहिल्यानंतर तांत्रिकतेच्या आचरण विषयक साधना पध्दती व तात्त्विकतेकडे पाहिल्यानंतर तंत्र या संकल्पनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे दिसते.

1. तंत्र ही एक यातुविद्या आहे. 'यातू' म्हणजे 'जादू' विश्वात एक विशिष्ट शक्ती आहे. तांत्रिक प्रक्रियांच्या सहायाने हया शक्तीस वश करता येते. असा तंत्राचा विश्वास आहे.
2. तांत्रिक प्रक्रियांचा उगम कृषक समाजात झाला. प्राचीन कृषक समाजात शेतीचे उत्पादन वाढावे यासाठी कांही यात्वात्मक विधी विधाने केली जात या विधींमुळे उत्पादन जास्त होते अशी श्रध्दा होती. अशा श्रध्दा आदिवासी समाजात आजही दिसून येतात.
3. तांत्रिक विधींचे स्वरूप सुफलीकरण विधीच्या स्वरूपाचे असते.

---

115. उपाध्याय विश्वंम्भरनाथ, शैव वैष्ण काव्य पर तात्रिक प्रभाव, प्रथम आवत्ती, विनोद पुस्तक मंदिर, आग्रा, 1962, पृ.क्र. 1. .
116. जोशी प्र.न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्रथम आवृत्ती, नितिन प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, 1972, पृ.क्र. 58.
117. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्म पंथ, इतिहास व तत्वज्ञान, प्रथम आवृत्ती, नटराज प्रकाशन, नागपूर, एप्रिल 1976, पृ.क्र. 54

4. तांत्रिक विधींमध्ये स्त्री विशेष महत्त्वाची समजली जाते. स्त्री ही सृजनाचे सुफलतेले प्रतिक मानले जाते. स्त्रीच्या सुफलीकरण शक्तीचा संबंध शेतीच्या उत्पादनाशी जोडला जातो.
5. सुफलीकरणविधी प्रामुख्याने मैथून प्रधान असतात. मैथूनाने उत्पादन वृध्दी होते. अशी श्रध्दा या प्रकारच्या विधी विधानांमागे असते. परिणामी तांत्रिक विधीमध्ये कामाचार, स्वैर, लैंगिकता याचे प्राबल्य दिसून येते.
6. मद्य, मांस, मुद्रा, मत्स्य, व मैथून यांस तांत्रिक तंत्र विधीत महत्व दिले जाते. यास 'पंचमकार' म्हणून संबोधिले जाते.
7. वरील प्रकारच्या साधना विधी विधान यामुळे तंत्र भोगवाद, सदृश्य, झालेले व इहवादाकडे झुकणारे ठरते.
8. तंत्रास काम मूलक विश्वोत्पत्तीचा सिद्धांत मान्य आहे.
9. यंत्र व मंत्र या प्रकारांचा तंत्रात अंतर्भाव होतो.
10. तांत्रिक विधी विधान सहभाषात्मक धातूच्या तत्त्वावर आधारलेले आहे.[118]

तंत्रशास्त्रात तंत्राचे पुढील तीन विभाग सांगीतले आहेत –

1. आगम – सृष्टी, प्रलय, देवतापूजा, पुरश्चण, शट्कर्मसाधना, व चतुर्विध, ध्यानयोग यांचे वर्णन असलेल्या ग्रंथाना 'आगम' म्हणतात.
2. यामल – सृष्टीत्त्व, ज्योतिष, नित्य, कृत्य, क्रम, सूत्र, वर्णभेद व युगधर्म यांचा विचार ज्यात केला आहे त्या ग्रंथाना 'यामल' म्हणतात.
3. तंत्र – सृष्टी लय, मंत्र, यंत्र निर्णय, तीर्थ, आश्रम, धर्म, कल्प, ज्योतिष, व्रत, शौचा शोच, स्त्री–पुरूष लक्षण, राज, दान, युगधर्म व्यवहार, अध्यात्म प्रायश्चित, चक्रपूजा, मुद्राइ, गोष्टीचे वर्तन ज्या ग्रंथात आहे त्यांना 'तंत्र' म्हणतात.

तंत्राचे वैशिष्टय 'क्रिया', हे आहे वैदिक ग्रंथात निर्दिष्ट केलेल्या ज्ञानाचे क्रियात्मक रूप प्रकट करणे हा तंत्राचा उद्येश होय विविध साधनांच्या द्वारे देवता व योगाच्या द्वारे अंतस्थ शिव शक्तीचे मिलन घडवून आणणे आणि मानवी जीवात्म्यावर विविध संस्कार

118. कुमठेकर उदय, वेध चारवाकाचा, प्रथम आवृत्ती, अभय प्रकाशन, नांदेड, मे 1994, पृ.क्र. 105.

करून तसेच त्याला पशुभावातुन दिव्य भावाच्या अवस्थेत नेऊन अद्वैतरूप आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडवणे. हा तंत्राचा उद्देश आहे.[119]

## तांत्रिकतेचा विकास

तंत्राचा विकास बौद्ध धर्मातून झाला. असे अनेक विद्वानांनी स्पष्ट केलेले आहे. गौतम बुध्दाच्या नंतर त्यांच्या पंथास भारतात साधनेच्या दृष्टीने विकृत रूप येत गेले. बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानाचा मूळ गाभा बाजूला राहिला. पुढे बौद्ध धर्माची विभागणी बौद्ध पंथामध्ये झााली. याच सुमारास हिंदू धर्मातील शंकराचार्य, कुमारिल, उदयन या सारख्या विव्दान प्रचारकांनी हिंदू धर्माच्या प्रसाराची धुरा सांभाळली. बौद्ध भिक्खूंना मात्र आपल्या धर्माचा प्रसार मात्र करता आले नाही. उलट बौद्ध असणारे हिंदू धर्माकडे वळू लागले. यातच बौद्ध धर्मात जादूटोण, मंत्र, तंत्र, धान धारणा, जारण मरण, मैथून असे आवडंबर माजले. बौद्ध संघात बऱ्याच स्त्रिया या भिक्खूनी म्हणून कार्यरत होत्या.[120] यातूनच तंत्रमार्गाचा नंतरचा विकास सुरू झाला. हा विकास महायान पंथातून साधूनी केला. महायान पंथात सदगुरूचे महत्त्व वाढून यातूनच नंतन मंत्रयान, 'सहजयान' अथवा 'वज्रयान' हा पंथ निर्माण झाला. यातूनच मंत्र धारिणी मंडले, चक्रे यावर भर देणाऱ्या तंत्रमार्गाची निर्मिती झाली. या तंत्र मार्गाचे आणखी विवेचन करण्यापूर्वी महायान पंथाच्या लोकाभिमुखतेकडे थोडे अधिक लक्ष देवून सर्व भूत मंत्राचे हित साधण्याची कळवळ स्वतः कष्ट सहन करून सर्वांचे कल्याण चिंतणे, सत्कर्म व भक्ती यांच्या साहयाने बोधीसत्त्वाची प्राप्ती करून घेणे, जगताला सारशुन्य व नश्वर मानणे. मंत्र, तंत्रावर विश्वास ठेवणे अशा कांही गोष्टी महायान पंथाने जनमानसांवर स्थिर केल्या. अधिक मानवीय लाकरम्य, सहज व समन्वयमूलक असा हा पंथ होता. या महायान पंथातून मंत्रायन, सहजयान अथवा वज्रयान पंथ निघून मध्ययुगीन साधनेस एक वेगळीच दिशा लागली. बौद्ध धर्माच्या ऱ्हासातून धर्म साधनेने तंत्र मार्गाचा स्वीकार केला. बौद्ध, शाक्त, कापालिक, शैव इत्यादी

---

119. जोशी महादेव शास्त्री (संपादक), खंड 3, प्रथम आवृत्ती, संस्कृती कोश मंडळ, पुणे, पृ.क्र. 796.

120. जोशी प्र.न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्रथम आवृत्ती, नितिन प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, 1972, पृ.क्र. 59.

पंथियानी तंत्रोक्त मार्गावर अनेक ग्रंथ लिहून तंत्रसाधनाची निर्मिती केली.[121] डॉ.विनयतोश भट्टाचार्य यांचा अंदाज आहे की बहुतेक बौद्ध भिक्खू तरूण व तरूणी होत्या. या साधकांना ब्रह्मचर्याचे पालन करणे अशक्य होते आणि यातूनच बौद्ध धर्मात तांत्रिकता निर्माण झाली. बौद्ध तंत्रवाद्याचा पहिले धर्मशास्त्र, गुहयसमाज तंत्र आहे. वज्रयानी साधक प्रज्ञा म्हणजे शुन्य याला निष्क्रीय ज्ञान मानत आणि त्यास स्त्री समजत. उपाय हे पुरूष तत्त्व असून ते क्रियाशील असते. या दोन्ही तत्त्वांच्या मिलनास वज्रयान सिद्धीसाठी आवश्यक मानत असत.[122]

बौद्धांप्रमाणेच जैन संप्रदायाचे अनेक उपपंथामध्ये तंत्राचा प्रभाव जाणवतो. ज्या प्रमाणे हिंदू धर्मियांना देवतांचे महात्म्य, त्याचे रूप, वेष, वाहन, मंत्र, इ. गोष्टीमध्ये विश्वास आहे. तशाच प्रकार जैन धर्मात तीर्थकरांची वेगवेगळी मंत्र आणि यंत्र आहेत. त्यांची अनेक महात्म्य कथा आहेत जे जैन पुराणांमध्ये जागो जागी आढळतात. भक्ती, देवी, दैवतांवर विश्वास, मंत्र साधना, पूजा, उपासना, सर्व कांही जैन मतात दिसते. याप्रमाणे लोकप्रिय जैनधर्माचे स्वरूप दिसते. या प्रमाणे लोकप्रिय जैनधर्माचे स्वरूप तांत्रिक मताहून वेगळे नाही हे दिसते.[123]

## समकालीन विविध शैव तांत्रिक संप्रदाय

### पाशुपत संप्रदाय

यजुर्वेदाच्या रूद्राध्यायात शिवाला पशूपती म्हटले असून याच्या उपासकानी हा पंथ वाढविला. इ.स.दुसऱ्या शतकात नकुलीश अथवा लकुलीश नावाचा एक शिवाचा अवतार गुजरात मध्ये झाला असे मत अनुयायी व्यक्त करतात. या लकुलीशाने पाशुपत संप्रदायाची घडी नव्यानी बसविली त्यांच्या तत्त्वज्ञानाला नकुलीश दर्शन असेही म्हणतात. कार्य, कारण, योग, विधी व दुःखांत या पाच पदार्थांच्या स्वरूपात या दर्शनाचे विवरण करण्यात येते. आत्मा व ईश्वर यांचा चित्ताच्याद्वारा संबंध योगामुळे येतो. जप, ध्यान इत्यादीमुळे

---

121. जोशी प्र.न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्रथम आवृत्ती, नितिन प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, 1972, पृ.क्र. 60.
122. सिंह रामधारी 'दिनकर', संस्कृती के चार अध्याय, चतुर्थ संस्करण उदयांचल, पटणा, डिसेंबर 1966, पृ.क्र. 228, 229.
123. उपाध्याय विश्वंम्भरनाथ, शैव वैष्णव काव्यपर तांत्रिक प्रभाव, प्रथम आवृत्ती, विनोद पुस्तक मंदिर, आग्रा, 1962, पृ.क्र. 38.

क्रियालक्षण योग साधतो; तर ज्ञान, निष्ठा, गती इत्यादीमुळे क्रियोपरम लक्षण योगाचे सिध्दी होते. या पंथात भस्मस्नान, भस्मशयन, उपहार, जप व प्रदक्षिणा, हसित, गीत, नृत्य, नमस्कार, डुडूक्कार[124] इत्यादी व्रतविधी महत्त्वाचे असून क्रायन, स्पंदन, मंदन, शृंगारन इत्यादी विधींनाही महत्त्व आहे. दुःखाची अत्यंतिक निवृत्ती म्हणजे दुःखांत असून त्यालाच परमपुरूषार्थ वा मोक्ष असे नाव आहे. मोक्षासाठी शिवाला शरण जाणे महत्त्वाचे आहे. म.म. हरप्रसाद शास्त्री 'ब्रहस्पतिसूत्र' या ग्रंथाच्या आधारे लोकायत आणि 'कापालिक' यांचा घनिष्ठ संबंध दाखविला आहे.[125] या पाशुपत मताचा प्रसार दक्षिण भारतातही उत्तरेप्रमाणे झाला. कापालिक, कालामूख, भैरव, वीरभैरव, रसेश्वर, इत्यादी संप्रदाय यातून विकसीत झाले.[126]

## कापालिक संप्रदाय

प्राचीन उग्र, शैव, तांत्रिक पंथापैकी एक पंथ. कापालिक, कपाली, महावृत्ती, सोमसिध्दांती व तांत्रिक या पर्यायी संज्ञा त्यांच्या आगम प्रामाण्य योग प्राधान्य या विशेषांपेक्षा लोकाविरूध्द विशिष्ट उपासना पध्दती चर्या व तंत्रमार्गावरील भर यामुळे तो पंथ वेदबाहय व असंख्य ठरला व त्याचा आगम शिवप्रणित असला तरी  हा वेद वाद विरूध्द पंथ लोकांना मोहात टाकण्यासाठी शिवाने प्रचलित केला असे कुर्मादी पुराणांचे मत आहे.[127] ''कपाली म्हणजे माणसाची कवटी धारण करणारा शिव त्याचे भक्त ते कापालिक होत.''[128]

स्मशानवासी, अंगाला चिताभस्म, हातात नरकपाल, व खटवांग, गळयात नररूंडमाला, जटांभोवती अस्थिमाला धारण करून, नरबली देणारा नरमांस भक्षक कापालिक आपल्या अंगी सिद्धीसामर्थ्य आहे. असा बकवास करीत मध्ययुगीन भोळसर

---

124. पाशुपत पंथात जीभ व टाळू यांच्या संयोगाने बैलासारखा आवाज काढला जातो.
125. गाडगीळ स.रा., लोकायत, प्रथम आवृत्ती, लोक वाङमयगृह, मुंबई, मे 1974, पृ.क्र.06
126. जोशी प्र.न., नाथ संप्रदाय, उदय व विस्तार, दुसरी आवृत्ती, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2004, पृ.क्र. 81
127. तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र. 197.
128. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र. 1341.

बहुजन समाजामध्ये दरारायुक्त आदर निर्माण करून भोळया भाबडया लोकांना (यात राजपुरूषही येतात). सिध्दी प्राप्त करून देण्याचे आमिष दाखवून कसा बनवता येत असले याची कल्पना आजसुध्दा गावागावात चालू असलेल्या परमार्थाच्या दुकानांवरून येईल.[129]

कापालिकांचा उल्लेख तत्कालीन शिलालेखात व साहित्यिक ग्रंथातून येतो. कुर्मादी पुराण, पल्लवाधिपती महेंद्रवर्माकृत, मत्तविलास (इ.स.600 ते इ.स.630) भवभुतिकृत मालती माधव (इ.स.900 ते इ.स.950), कृष्ण मित्रकृत प्रबोध चंद्रोदय (इ.स.1050 ते इ.स. 1100), यशपालकृत मोहराज पराजय (इ.स.1175च्या सुमारास) रामानूज ब्रह्मसुत्र (2.2.37), शंकराचार्याच्या समकालीन चरित्र लेखक आनंदगिरी यांच्या साहित्यात, वराहमिहीराच्या बृहतसंहितेत (इ.स.6वे शतक) आदी तत्कालीन साहित्यात कापालिक पंथाबध्दलची माहिती दिसते. शिवाय मध्यप्रदेश, कर्नाटक व आंन्ध्रप्रदेशातील शिलालेखांमध्ये कापालिक पंथाच्या अनुयायांसंबधी माहिती मिळते. सातव्या शतकातील चीनी प्रवासी हयू–एन–त्संग कापालिकांचे वर्णन करतांना म्हणतो, कापिशा मध्ये त्यांनी कांही अशा शैवपंथीयांना पाहिले की जे आपल्या डोक्यावर हाडांची माळा मुकूट म्हणून घातलेला होता. (हयू–एन–त्संग, भाग 01, पृष्ठ 55) आणखी एका ठिकाणी दुसऱ्या कांही तांत्रिक शैवपंथीयांचा उल्लेख केलेला आहे. जे गळयात मुंडमाळा हार म्हणून घातलेले आहे. (हयु एन त्संय भाग 01, पृष्ठ 76)[130]

कृष्णमिश्रकृत प्रबोधचंद्रोदय नाटकावर इ.स.चे अकरावे शतक, एक कापालिक आपल्या उपासनामार्गाचा उद्घोष पुढील प्रमाणे करतो. आम्ही मेंदू आतडी व महामांस यांना वसेने चरबी अभिधारित करून त्यांचे अग्नीत हवन करतो. ब्राह्मणांच्या कवटीतून सुरापान करून आमची पारणा होते. आणि नुकतेच ज्याचे मस्तक तोडले आहे ज्याच्या कंठातून रूधिरधारा वाहत आहेत, अशा पुरूषांचा उपहार बली देवून आम्ही महाभैरवाची अर्चना करतो.[131]

---

129 तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र. 219.

130. यदुवंशी, शैवमत, प्रथम आवृत्ती बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटणा, 1955, पृ.क्र. 154.

131. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र. 1341.

कापालिक मतात स्त्री साहचर्य अत्यावश्यक मानलेले आहे.गाथा सप्तशतीत (इ.स. चे पहिले शतक) कापालिक स्त्रीसंबधी गाथा आहे.[132]

**अर्थ**

'तरूण कापालिक स्मशानात बसली आहे. पुष्कळ वेळ लोटला तरी तिचे प्रसाधन संपत नाही. कारण ती आपल्या जाराच्या प्रेताची राख अंगाला लावित आहे. आणि त्यामुळे होणाःया सुखाने तिच्या अंगाला घाम येत आहे'.[133]

कापालिकाचे आरंभीच्या काळातले धार्मिक विधी व व्यवहार कसे किळसवाणे असत. त्याचे वर्णन वराहमिहीराने (इ.स.6 वे शतक) आपल्या 'बृहत्संहितेत' पुढील प्रमाणे केले आहे – 'केसाचे जानवे, गळयात मानवी मणक्यांच्या माळा, हातात रक्ताने माखलेली शिरे व जटेत हाडांचे तुकडे त्यांची आभूषणे असतात.'[134]

महाभारतात कापालिकांचा उल्लेख उग्ररूपात केलेला आहे. महाभारतातले शिवाचे लौकीक रूप रानटी, पहाडी, जातीजमातींनी आपल्या कल्पनेप्रमाणे कापालिक या नावाने दाखवले आहे. सामान्य असंस्कृतजनांना त्याचे हेच रूप प्रिय व पुज्य होते. या रूपात शिवाचा शाकिनी, डाकिनी, भूत, प्रेत, पिशाच्च, वेताळ इत्यादी भूत योनींशी संबंध होता. महाभारतातल्या या लोकप्रिय शिवाचे वर्णन पुष्पदंताने संक्षेपात केले आहे ते असे...

'स्मशानेश्वाक्रीडा स्मरहार पिशाचा सहचराः
चिंताभस्मालेपः स्त्रीगपि नृकरोरीपारिकरः
अमङःल्यं शीलं तवभवतू नामैव माखरील
तथापिक स्मर्तृणां वरद परमं पडलमासि'

---

132. मस्तिकान्त्रवसाभिधारितमहामांसाहुतीर्जुहतां
न है ब्रहमकपालकल्पित सुशपानेन नः पारणा
सद्य कृन्त कठोरकष्ठ विगलत्कीललघारोजज्वलैरर्च्यो नः
पुरूशोपहार बलिर्भिर्देवो महाभैरवः
जार मसाणसमुब्भुवभुइसुहफससिडिजिरडीए
सम्मर णवकावलिसाई उध्दलणारम्मो'. (गा.स. 408)

133. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्र. 1341.

134. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), उक्त, पृ.क्र.1341.

**अर्थ**

'हे मदन दहना, शंकरा, तुझाा निवास स्मशानात आहे तुझा भोवती भूत पिशांच्चा गराडा गराडा आहे. तुझा हाती नरकपाल आहे. गळयात नरूडांच्या माळा आहेत. असा तू सर्वार्थी अमंगळ पण भक्तांचे पात्र तू सदैव मंगल करतोस'.[135]

शिवाचे हे कापालिक रूप असलेले दिसते. प्रबोध चन्द्रोदय या नाटकात सोमसिद्धंत या कापालिकाचे वर्णन येते. यात सांगीतले की, तो मद्यपान व स्त्री क्रीडा करून मोक्षास जातो.[136] भवभूतीच्या (इ.स.8वे शतक) 'मालती माधव' नाटकात 'अघोर घंट' नांवाचा एक कापालिक व त्याची शिष्या कपालकुंडला यांचा प्रवेश आहे. नाटकातील नायिका मालती हिता कपालकुंडलेने चामुंडेला बळी देण्यासाठी धरून आणलेले असते. या वरून आठव्या शतकापुर्वी कापालिकांमध्ये नरबली प्रथा होती. दक्षिणेतील श्रीशैल्य पर्वत हे कपालिकांचे केंद्र होते. असे सांगितले आहे. सौदामिनी नामक एक बौध्द भिक्षूणी श्रीशैल्य पर्वतावर कापालिक साधना शिकायला गेल्याचा उल्लेखही मालती माधवात आहे. [137] तांत्रिक कापालिक पंथाचा मूळ गाभा असलेल्या कुण्डलिनी आणि चक्रांचा स्पष्ट उल्लेख 'मालती माधवात' सापडतो. तो असा – 'जो इळादि सोळा नाडिंच्या मध्यभागी पद्माच्या स्वरूपात उपस्थित आहे.जो आपल्या भक्तांच्या हृदयात स्थान मिळवून त्यांना सिद्धी देण्याचे कार्य करते तसेच स्थिर चित्ताने साधक ज्याला शोधतात. त्या शक्तींनी व्याप्त असे शक्तीस्वामी अर्थात शिवाचा जय हो.'

तांत्रिक शक्तीविषयी पुढे मालती माधवात कपालकुडला म्हणतो,[138] 'प्रतिदिन शंडग न्यासदि केल्यानंतर मी हृदय कमल किंवा अनाहत चक्रमध्ये शिवाचा साक्षात्कार करतोय

---

135. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), भक्तीकोश, प्रथम आवृत्ती, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, मार्च 2001, पृ.क्रं. 1267.

136. 'मन्तोण तन्तो ण अ किं पे जाणं
मडड पिबा तो महिलं रमा मो
रण्डा चण्डा दिक्खिदा धम्मादारा
भिक्खा मोज्जन चम्म्खंड च सोडता
मुत्तिं भणन्ति हरि ब्रह्ममुखादि देवा,
एक्केण केवलमुमा दइएण दिरढो
माणंच जो किं पि गुरूप्पसादा
मोक्ष जामो कुलमग्गलग्या
मंज्ज मंस पिडजाए खज्जर अ
कोलो धम्मं कस्स गो भो दि स्स्मो
भगणेण व अपढणेण कदुक्कि आए
मोक्खो सपं सुर अके लि सुरासेहि'
(कर्पूर मंजरी 1/22.24)

137. अभ्यंकर शंकर वासुदेव (संपादक), उपरोक्त, पृ.क्रं.1341.

138. 'नित्य न्यस्तशडंग चक्र निहितं हृत्पद्ममध्येदित प्श्मन्ती शिवरूणिणं लयवशादात्मान मध्यागता नडीनामुदय क्रमेण जगता पंचामृता कर्शना।' (मा.मा.5, 211)

आणि आपल्या आत्याबरोबर बाहेरीत इंन्द्रियांना एकत्र करून इडादी नाडियांना जागवून पंचभूते अथवा पंचतत्त्वात्मक शरीरात आकर्षण उत्पन्न करून आकाश संचारी बनते.'[139]

## कापालिक तत्त्वज्ञान

कापालिक पंथाचे अधिकृत ग्रंथ वा प्रकरणग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे त्याचे तत्त्वज्ञान विद्या उपासनापध्दती दिनचर्या, इत्यादी बद्धलची माहिती त्यांच्या विरोधकांच्या ग्रंथावरून मिळते. ही माहिती विपर्यस्त असली तरी कांही निष्कर्ष स्थुलमानाने काढता येतात. ते स्वतःला व इतरही त्यांना पाशुपत मानत असल्यामुळे शैव आगमावार आधारलेली पाशूपतांची 1. पति कारण, 2.पुश कार्य, 3. पाश ही तत्वे, ते मानत असावेत, वैदिक व अवैदिक भारतीय धर्म, मोक्ष, दुःखान्त या ध्येयासाठी प्रयत्नशील असत. तसे कापालिकही असावेत पण सोम सिध्दांती या नावांवरून त्याची मोक्ष विषयक कल्पना दुःखद अशी नकारात्मक नसून महासूख जारी अवस्था अशी भावात्मक असावी. उमासहित शिव ज्या युगमध्द अवस्थेत असतो. ते परमसुख असणारी अवस्था इतके उत्कट महासूख ज्या अवस्थेत आहे. तो मोक्ष असे त्यांच्या सोमसिध्दांतही या नावावरून वाटते. त्यांच्या इतर संज्ञा चर्चात्मक असाव्यात नर कपाल धारण करणारे खाण्यापिण्यासाठी वापरणारे म्हणून कापालिक किंवा कपाली मोक्षासाठी महाव्रत पाळणारे ते महावृत्ती ब्रह्मदेवाचे पाचवे मस्तक तोडल्यामुळे शिवाकडून जी ब्रह्महत्या घडली तिचे परीमार्जन करण्यासाठी जे व्रत त्याने केले त्या प्रमाणे महाव्रत करणारे महाव्रती ब्रह्महत्त्या निवारक महाव्रतात पुढील बंधने असतात.

1. पर्णकुटी बांधून वनात राहणे
2. त्रिकाल स्नान
3. ब्रह्महत्याची स्वतः वाच्यता करून भिक्षा मागणे.

---

139. जोशी मुनिशचंद्र, ऐतिहासिक संदर्भ में शाक्त तंत्र, प्रथम आवृत्ती, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, 1989, पृ.क्र. 45.

4. हत्त्या केलेल्या ब्राह्मणाचे कपाल किंवा हत्त्या झालेल्याचे कपाल उपलब्ध न झाल्यास दुसऱ्याचे कपाल काठीवर घेवून खट्वांग वावरणे व हे व्रत बारा वर्ष करणे. पुढे बौद्ध धर्माच्या सहचर्यामुळे यांच्या मध्ये तंत्रोपासन शिरली व त्यांनी घृणास्पद ठरण्यासारखी तंत्रोपासना केल्यामुळे त्यांना तांत्रिक संज्ञा प्राप्त झाली.[140] उत्तरकालीन कापालिकांमध्ये सिद्धी प्राप्तीसाठी पंचमकारात्मक तंत्र साधना नरबली इत्यादीचे प्रस्थ खुप माजले व तो पंथ घृणास्पद ठरला. त्यांची मोक्ष कल्पना केवळ दुःख शून्यता नसून वर उल्लेखल्याप्रमाणे रतिसुखाची परमावधी असलेली अवस्था आहे.

भक्तीपेक्षा हृदयोगावर व मोक्षा पेक्षा सिद्धीवर भर देवून व संध्या भाषेतील पंचमकार, महासुख इत्यादी पारिभाषिक शब्दांचा रूढार्थ घेवून उत्तरकालीन कापालिकांनी आपल्या पंथाला कमीपणा आणला.[141] कापालिक पंथाचा सविस्तर अभ्यास करणारा ऑस्ट्रेलियन पंडीत डेव्हिड लॉरेन्झन म्हणतो– "Alhough the above allusions to Kapalika asceticiom and Yoga are few and not very detail, it is evldent that the authors were aware that the Kapalikas were not simple hedonists," विविध ग्रंथातील कापालिक साधना व योग या विषयी उध्दारणे देत लॉरेन्झन म्हणतो की, 'ही उद्धरणे संख्येने जास्त नसली व सविस्तर नसली तरी त्या ग्रंथकाराची एवढी मात्र खात्री होती की, कापालिक हे केवळ इंद्रीय जन्यसुखवादी, भोगवादी, नव्हते'. कापालिक सोम सिंद्धांती होते ते भक्तीमार्गी असल्याचेही लॅरेन्झनेने नोंदविले आहे. कापालिक पंथाची साधना पंचमकारयुक्त असली तरी जडवादाशी त्यांचा सुतराम संबंध नाही असे लॉरेन्झनने स्पष्टपणे म्हटले आहे. "In tantric practice the partaking of wine and meat has both a hedonistie and euchoristic aspect but is in no way connected with materalism"[142] तंत्र मार्गी साधनेतील मद्य व मांस यांचे सेवन भोगावा. सदृश्य असले तरी त्यांचा जडवादाशी अर्थाशी संबंध नाही. भोग वादातून जाणाऱ्या या साधनेची अंतिम उद्देश मुक्ती प्राप्त करणे हाच राहत आलेला आहे.

---

140. तगारे ग.वा., शैव दर्शन, प्रथम आवृत्ती, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, 1987, पृ.क्र. 220.

141. तगारे ग.वा., शैव दर्शन, उक्त, पृ.क्र. 223.

142. Lorenzen David N., The Kapalikas and Kalamukhas, First Published, University of California Press, Berkeley and Los Angeles 1972, Page No. 112

ऑर्थर ॲव्हेलॉन उर्फ जस्टीस सर डॉन कुड्रॉफ याने देखील आपल्या तंत्रविषयक संशोधनात तंत्राची उद्दिष्टये पूर्णपणे अध्यात्मिक असल्याचे मान्य केले आहे.[143]

गुणरत्न कापालिकांना कामसाधना म्हणतो, गुणरत्नाच्या टीकाकार मणिभद्र म्हणतो, कापालिक हे नास्तिक आहेत, ते पूर्ण शरीरावर भस्म लावतात. ते योगी असतात. त्यात ब्राह्मणा बरोबर इतर जातीचे लोक असतात. एकदा कापालिक बनले की मग स्वतंत्र अशी जात राहत नाही. ते आत्मा, पाप, पुण्य आदी बाबी माहित नाहीत. विश्वाची निर्मिती ते चार किंवा पाच महाभुतांपासून झाली असे मानतात. मद शक्ती जशी भुताच्या संयोगाने निर्माण होते. तव्दत चेतना ही भूत्स योगातून निर्माण होते असे मानतात. ते मद्य मांस करतात आणि अगम्य स्त्रियांशी संभोग करतात. दरवर्शी विशिष्ट दिवशी एकत्र येवून मूक्त समागम करतात. धर्म व काम हयात फरक करीत नाहीत.[144]

कापालिक ही शैव तंत्राची एक वेगळी शाखा आहे. कालांतराने कापालिक स्वैरचारी झालेले दिसतात. सामाजिक, नैतिक कल्पना जेव्हा बदलत जातात. तेंव्हा त्यावर हुकूम त्यांच्या कर्मकांडाचा अर्थवाद होवून त्यांचे उदात्तीकरण केले जाते. कापालिक मूळ तंत्रापासून विभक्त झाल्याने सामाजिक जडण, घडणीच्या प्रक्रियेत मागे राहील्याने त्यांनी उत्तर काळात निंदानालस्ती होणे क्रमप्राप्त ठरते.

## वामाचारी किंवा कौलाचारी संप्रदाय

पूर्व मध्य युगात वामाचारी अथवा कौलाचारी या नावाने ओळखला जाणारा शैव संप्रदाय अस्तित्त्वात होता. हा ही शैव संप्रदाय तांत्रिक स्वरूपाचा होतो. वामाचारी संप्रदाय कौलाचारी या नावानेही ओळखला जातो. वामाचार अथवा कोलाचार संप्रदायी प्रामुख्याने

---

143. कुमठेकर उदय, वेध चार्वाकाचा, प्रथम आवृत्ती, अभय प्रकाशन, नांदेड, मे 1994, पृ.क्र. 124.
144. हडेकर डी.वाय., चार्वाक ऐतिहासिक आणि तात्त्विक मीमांसा, प्रथमावृत्ती, सुगावा प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी 2000, पृ.क्र. 42.

कामाच्या आधुनिक आसाम या प्रदेशात केंद्रित आहेत. हा संप्रदाय उग्र संप्रदाय म्हणून ओळखला जातो.[145]

के. दामोदरन यांच्या मते तांत्रिक संप्रदाय प्रामुख्याने दोन गटांशी संबंधित आहेत. 1.वामाचारी संप्रदाय आणि 2. दक्षिणचारी संप्रदाय.[146] दक्षिणोत्तर संप्रदायीच्या मते वासना तसेच यौन उत्तेजनांना दाबून न ठेवता त्यांचा विकास केला पाहिजे. त्यांच्या विकासाचा स्तर वाढला पाहिजे. यासाठी प्रयत्न केले पाहिजे. या विरूध्द वामाचारी संप्रदायाच्या मते आपल्या अनुदात्त रूपातच वासना आणि यौन क्रिया मोक्षाप्रत जाणारा सर्वात विश्वसनीय मार्ग आहे. दक्षिणाचारी संप्रदायाचे अनुयायी पुरूषतत्त्व अधिक भर देतात. तर वामाचारी अनुयायी स्त्री तत्त्वांवर परंतु दोघांमध्येही यौन क्रियांना धार्मिक सिध्दांतापर्यंतचे स्थान दिले गेले.[147] या उलट उदय कुमठेकर आपल्या वेध चार्वाकाचा या ग्रंथात तांत्रिक साधनामार्गाचे वामाचार, दक्षिणाचार व मध्यमाचार असे तीन प्रकार पाडतात. त्यांच्या मते प्रत्येक मार्ग पुन्हा अंतर्गत व बाहय अशा दोन प्रकारांत विभागला जातो. तंत्राचे विभाजन 'कादी' आणि 'हादी' अशा दोन विधानांमध्ये केले जाते.

वामाचार शब्दाचा अर्थ वामा आणि आचार या दोन शब्दांपासून बनलेला आहे. वामा म्हणजे स्त्री आणि आचार म्हणजे धार्मिक विधी थोडक्यात स्त्री प्रधान विधी तो 'वामाचार'.[148] तंत्रमार्गात वामाचार तंत्र सर्वश्रेष्ठ तंत्र समजले जाते. किंबहुना वामाचार तंत्र हेच खरे तंत्र. वामा म्हणजे 'स्त्री', ज्या साधनेत स्त्रीचा उपयोग केला जातो. ती साधना वामाचारी समजली जाते. जी समाजअमान्य आहे. अशा प्रकारचे तांत्रिकतेवर आरोप केले जातात पण शब्दशः अर्थ न घेता त्याचा भावार्थ अतिशय महत्त्वाचा आहे. पण पुढे मात्र भावार्थ न समजल्यामुळे शब्दशः अर्थ घेवून तशीच विधी करण्याची प्रथा पडली. यामुळे तंत्रमार्गाला बदनाम व्हावे लागले. तंत्रज्ञान हे अतिशय गूढ आणि रहस्यमय असते. सहसा

---

145. दासगुप्ता एस.एन., मिश्रा पि. (अनुवादक) भारतीय दर्शन का इतिहास, प्रथम संस्करण, राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, 1957, पृ.क्र. 2.
146. गाडगीळ स.रा., लोकायत, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय गृह, मुंबई, मे 1974, पृ.क्र. 84.
147. द्विवेदी पारसनाथ, भारतीय दर्शन, प्रथमावृत्ती, श्रीराम मेहरा ॲण्ड कंपनी, आग्रा, 1973, पृ.क्र. 332.
148. गाडगीळ स.रा., लोकायत, उपरोक्त, पृ.क्र. 84

प्रत्येक ओळीचा अर्थ सहसा समजत नाही. कौतिकाचार्थात पंचमकारांचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगीतलेला आहे.

साधक मद्य (विजया), मांस (आर्द्रक), मत्स्य (जम्बीस), मुद्रा (धान्यजा), आणि मैथून (शक्ती समागम), प्राप्त करावे. योनी पूजा यांचा अर्थ पृथ्वी पूजा. निसर्गाची उत्पत्ती ही पृथ्वीच्या गर्भातून म्हणजे योनितून झाली. या मुळे या योनिला तांत्रिक साधनेत अतिशय महत्त्व प्राप्त झाले.[149] महाराष्ट्रात ज्ञानदेवांच्या काळी या पंथाचे प्रचलन महाराष्ट्रात होते. त्याचे स्वरूप वामाचारी होते आणि भक्तीप्रधन संप्रदाय त्याला तिरस्कृत मानीत असे.[150]

या ठिकाणी ज्ञानदेवांनी त्रिपुराशक्ती, यंत्र, क्षेत्रपपती, भैरव, चक्र, आन चक्रांमध्ये खिचडीने भरून ठेवलेली नैवद्याची पात्र असे तांत्रिकांच्या अडयांचे पूर्ण चित्र उभे केले आहे.[151] ज्ञानदेवांनी अभिचार प्रधान परमारक आगमाचा समावेश केलेला दिसतो. हे ध्यानात घेतले पाहिजे. या मार्गाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी यातून स्पष्ट होते.[152]

एकंदर पाहता मध्ययुगात भारताच्या कानाकोपऱ्यात कुठे ना कुठे तांत्रिकतेचा प्रभाव दिसून येतो. या कालखंडात समाज मनात तांत्रिकतेने घर करून ठेवले. त्यामुळे तांत्रिकतेचा मूळ अर्थ बाजुला पडला व अश्लिलतेची धार्मिकतेवर छाप पडली. या मागची कारणे जाणून घेतांना रामधारीसिंह दिनकर 'संस्कृती के चार अध्याय' ग्रंथात पुढील मत मांडतात, ''वामाचारियों का विश्वास है की जे चिज मनुष्य को नीचेक गिराती है, वही उसे उपर भी ले जाती है. इसी विश्वास के कारण वाममार्ग ने मद्य, मासं, मीन मुद्रा, और मैथून से युक्त पंचमकार पुजा का प्रचलन हुआ, जिससे कितनी ही बुराइयॉ उत्पन्न हुई और शाक्त धर्म दुषित एवं कलुषित समझा जाने लगा, किन्तु, तंत्रो मे इस पुजा का जो रूप समझाया गया है, वह गर्हित नाही हे. पहली अवस्था मे अनके बदले किसी और वस्तुके सेवन का विधान है, तीसरी अवस्था मे योगी की प्रधानता दिखायी गयी है, और पंचमकार मे से प्रत्येक कारस्थान योग अथवा मनोविज्ञान की कोई न कोई क्रिया ले लेती

---

149. कुमठेकर उदय, वेध चार्वाकाचा, प्रथम आवृत्ती, अभय प्रकाशन, नांदेड, मे 1994, पृ.क्र.124

150. 'ना तरी संहारे त्रिपुरेचिं यंत्रे।, कि प्रलय भैखां चिक्षेत्रे।
नाना युगांतचक्रि पात्रे।, भुतखिचां वोडविली।।'

151. 'आता लोपला अभिचारू।, तेया करिन जीर्णोध्दारू।
तिष्ठीन परमारू।, यागवरि।।'

152. द्विवेदी पारसनाथ, भारतीय दर्शन, प्रथमावृत्ती, श्रीराम मेहरा ॲण्ड कंपनी, आग्रा, 1973, पृ.क्र. 332.

है. तंत्र साधना की इस स्थितीका दुरूपयोग करते बौद्ध सिद्धोंने जनता को चक्कर मे डाल दिया था. मोगतो वे पंचमकार काही करते थे और बोलकर नाम भी वे मदिरा, मांस, और नारी के ही लेते थे, किन्तू जनता समझती थी कि, उनका आशय कुछ और है''.[153]

## अघोर संप्रदाय

हा शैव संप्रदाय असून तो शाक्त मताकडे झुकलेला दिसतो. अघोर पंथास 'औगर', 'औघड' इ. नावाने ओळखले जाते. हा पंथ, यजुर्वेदाच्या रूद्राध्यानात शिवाच्या अघोरतनुचा उल्लेख आढळतो.[154] भारतात शिवाच्या अघोररूपी मूर्ती आढळतात. या मूर्ती 'कपाली' मूर्ती सारख्या दिसतात.[155] अघोर उपासना दक्षिणेत अघोरीश्वर या नावाने आढळते. भारतीय संस्कृती कोशकांरानी पंथाचा संबंध पाशूपत व कालामुख, संप्रदायाशी जोडला असून हुय–एन–त्संग या चिनी प्रवाशाने या पंथो उपासकांचा उल्लेख केला आहे. माहेश्वरांच्या 32 व्या कल्पातील कृष्णवर्णीय रूप असा वायुपुराणात दाखला आहे. चौदा हातांचा, आयुधे धारण करणारा व नृत्यासाठी सिध्द असणारा हा शिवावतार ब्रह्मदेवाच्या वराने माजलेल्या मरूत नामक दैत्याच्या संहारासाठीचा अघोराचे रूप घेतल्याचा उल्लेख भारतीय संस्कृती कोशकार करतात. ही मूर्ती चतुर्भूज, अष्टर्भुज व मुंडमालाधारी असून भुतप्रेतांच्या सान्निध्यात ही स्मशानवास करते अशी कल्पना आहे.[156]

या पंथाचे अनुयायी अंगाला राख फासून गळयात कवटयांच्या माळा घालतात, नग्न हिंडतात, कांही झाडांची पाने व साली नेसतात. 'चामुंडा' ही त्यांची देवता असून तिला नरबळी देतात. प्रेताचे मांस खातात व त्याचे पाणी फडकात गाळून पितात. त्यामुळे अद्भूत सामर्थ्यतता येते अशी धारण आहे.[157] या प्रकारास 'अतिलिया' हे नांव आहे. थेबेनो, वार्ड हॉड या पाश्चात्य ग्रंथकारांनी त्यांचे मांत्रिकत्व गोरखनाथभक्ती मानून अबूचा पहाड

---

153. दिनकर रामधारीसिंह, सांस्कृतिके चार अध्याय, प्रथम संस्करण, राजपाल ॲन्ड सन्स, दिल्ली, 1956, पृ.क्र. 224.
154. ढेरे रा.चिं., महाराष्ट्राचा देव्हारा, प्रथम आवृत्ती, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, पृ.क्र. 51, 52.
155. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्मपंथः इतिहास व तत्वज्ञान, प्रथमावृत्ती, नटराज प्रकाशन, नागपूर, एप्रिल 1976, पृ.क्र. 63
156. यदुवंशी, शैवमत, प्रथम आवृत्ती बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटणा, 1955, पृ.क्र. 146.
157. मोगलेवार सुधाकर, उपरोक्त, पृ.क्र. 64.

ही आद्यभुमी सांगितली. अठराव्या शतकातील किनाराम या पंथातील प्रसिद्धाचार्य होय. 12 व्या शतकात होवून गेलेले अघोर शिवाचार्य हे 5 व्या शतकातील श्रीकंठ या शैवाचार्याचा अनुयायी असल्याची ग्वाही पं. महादेवशास्त्री देतात. याने मृगेंदसंहितेवर टीका लिहली असून ती प्रमाण आहे. यास (अघोर संप्रदाय) कांही जण वीरशैव समजतात. याचा अर्थ असा की त्याने कालांतराने वीरशैव पंथ स्वीकारला असावा.[158]

हा पंथ शाक्त मताशी जवळचा असणारा शैव तांत्रिक पंथ आहे. या पंथाचा उल्लेख प्राचीन ग्रंथात आढळतात. पुढे हा पंथ मोठया प्रमाणात दक्षिणेत विकसीत झाला हा पंथ नांवाप्रमाणे अघोर दिसतो. सर्व सामान्य लोक या पंथाचे अनुयाची होते. पुढे दक्षिणेत वीरशैव संपद्रायाचा उगम 12व्या शतकात होताच अनेक अनुयायांनी वीरशैव पंथाचा स्वीकार केला.

## भैरव संप्रदाय

वामाचार व कामवासना यांचे दर्शन घडविणारा हा पंथ आहे व त्याचे गाथा सप्तशती, मैत्रीउपनिषद, कथासरित्सार आदी ग्रंथातून वरील दर्शन घडते असे भारतीय संस्कृती कोशकारांनी स्पष्ट केलेले आहे.[159] (खंड 3 पृष्ठ 241—243) शिवाच्या क्रुर रूपावर आधारित मूर्ती मध्ये सर्वाधिक प्रचार त्याच्या भैरव मूर्तीचा झाला. या मध्ये शिवाकृती भितीदायक त्याचे शरीर दिगंबर अथवा कृत्तिवासा आणि सप्रवेष्ठित दाखवले जाते. कधी, कधी मुर्तीत एक काळा रंगाचा कुत्रा उभा राहीलेलाही दिसतो. याकडे पाहिल्यास प्राचीन वैदिक रूद्राची मुत्यू देवता सारखी आठवण येते. या पंथाचा उगम 'वज्रयानी' परंपरेतून निघाला नसून तंत्र किंवा शाक्त पंथाकडे मात्र बोट दाखविता येण्यासारखे आहे. या पंथाचे केंद्र श्रीशैल्य पर्वत होते आणि मालव व अभिर या उत्तरेकडील प्रदेशात या पंथाचा अधिक प्रसार झाला.

---

158. संपादक मंडळ, वीरशैव विश्वकोश, खंड 1, प्रथम आवृत्ती, अखिल भारतीय मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर, डिसेंबर 2001, पृ.क्र. 70.

159. मोगलेवार सुधाकर, वीरशैव धर्मपंथ : इतिहास व तत्त्वज्ञान, प्रथमावृत्ती, नटराज प्रकाशन, नागपूर, एप्रिल 1976, पृ.क्र. 64.

उत्तर चालुक्य कालखंडात हिंदू, जैन व बौद्ध हे धर्म व त्यांचे विविध संप्रदाय अस्तित्वात होते. यात काही तांत्रिक संप्रदायही होते. हा कालखंड मुळात धार्मिक दृष्टीकोनातून परिवर्तनवादी कालखंड म्हणून ओळखला जातो. बौद्ध धर्माच्या तुलनेले हिंदू व जैन धर्मपंथ, तत्त्कालीन समाजात अधिक लोकप्रिय होते. याच कालखंडात हिंदू धर्मातील प्रमुख वैष्णव व शैव या दोन पंथापैकी वैष्णव पंथाच्या तुलनेने शैव पंथ अधिक लोकप्रिय असल्याचे तत्त्कालीन शैव संप्रदायाशी संबंधित विविध कोरीव लेखावरून दिसते. याशिवाय अकराव्या, बाराव्या शतकापर्यंत लोकप्रिय असणारा जैन धर्म मात्र पुढे विविध शैव पंथामुळे व भक्ती चळवळीमुळे त्यांच्या लोकप्रियतेत ओहोटी लागलेली दिसते. याच काळात विविध तांत्रिक संप्रदायही समाजातील सर्वसामान्यासोबतच प्रशासकीय अधिकारी व राज्यकर्त्यामध्ये लोकप्रिय असल्याचे विविध कोरीव लेखांवरून दिसते. एकंदर पाहता या कालंखडातील धार्मिक परिस्थितीही गुंतागुंतीची व परिवर्तनीय स्वरूपाची दिसते. संशोधनाच्या पुढील घटकात आपण आपल्या संशोधन समस्येशी संबंधीत विविध शैवप्रवाहांबद्धलची माहिती जाणुन घेवु. आपल्या संशोधन समस्येशी संबंधीत प्रमुख घटकात याचा समावेश होतो.